# Agrticultural Land use Planning and Development of Bhagdari Vilalge in Akkalkuwa Tehsil of Nandurbar District (Maharashtra).

**Dr. Ghodke J.V.**
Asso.prof &Head DepartmentoftheGeography
Kala mahavidyalaya , Nandurghat Tq. Kaij Dist.Beed.

**Introduction :**

Land is main resources of human well being. Land utilization or land use pattern control socio – economic activities of man. Agricultural activities are the result of the decision made by the farmers after appreciation of the biologial constaints, possibilities, of cultural assets, choice, and of the economic implication (Tyagi, 1986).

According the Dent, Frank.J. (2995) population increase leads to the adoption of more intensive systems of agriculture, both in the form of shortened fallow periods and by adopting new technologies. Such measures may compel cultivators and agricultural labour to work harder and more regularly to raise 'total factor productivity'. Besides, increasing popuylation density may encorage division of labour and the development of communication and education. He has exposed how increase of population pressure causes massive changes in agricultral system of a region.

**Objectives :**

The main objective of present study is to analyze and the study Agricultural changes due to physical and socio – economic variables in Dab village.

- To study of land use in Bhagdari village
- To study of agricultural land use changes in Bhagdari village.
- To study of demographic characteristics and occupational Stucture of Bhagdari Village.

**Study Region :**

Bhagdari is an important village in Akkalkuwa tehsil and it lies in Satpuda mountain ranges. Bhagdari village is located in northern part of Akkalkuwa. It is situated at 21° 48' 36" North latitude and 740' 1" East longitudes. This vilalge is situated at distance of 38 km from Akkalkuwa. The village is accessible by metal and cement / road connectivity. The interior of the village can only be reached by metal and unmetal roads which cut across the cultivated fields.

Bhagdari is located lowland artea. The general slop of the village is north to south. The main physiographic land mark is laying Satpuda mountain ranges. In this vilalge soil is fertile and productive, Pulses, Jawar, Rice Maize etc crops are cultivated in this of soil.

**Database and Methodology :**

The present study is based on secondary as well as primary source of data. Primary data collected by field survey and questionnaire. This secondary data is the available from directorate of Economics and Statistics of Maharashtra, District statistics office of Nandurbar

District, Akkalkuwa tehsil Census hand book, Agricultural census etc. The methods applied includes bar diagram, pie chart, Graphs, Maps, Statistical analysis, Density of Population etc.

General Land Use Pattern

Cropping pattern of Bhagdari is mainly influenced by climate, soil, fertility and availability of water sources. It is obvious that the cropping pattern is dominated by Pulses sharing 34.03% of the cropped area. Bhagdari village acquired 1712 hectare land of the study region. Area under forest has occupied 38.79% to geographical area which is the highest percentage of land use in this vilalge. It is followed by that net shown are covering 36.39%, build up area covering 18.17% fallow land covering 2.34% and Cultivable waste area is acquired 4.32% area out of total area of vilalge.

**Agricultural Land Use**

Table No. 2 shows agricultural alnd use of Bhagdari vilalge of Akkalkuwa tehsil. It is obvious that the cropping pattern is domainated by Pulses sharing 34.03% of the cropped area. Jawar occupied 25.36%area of Bhagdari village. Pulses is most domainant crop of the study area, which are 1.99% area covered to total area of Bhagdari village followed by Jawar (1.48%), Rice (0.58%), Maize (0.51%) and other crops (1.28%).

**Table No 1 Bhagdari Village : General Land Use in 2016**

| Sr.No. | Category | Area in Hectare | Area in % to Total Area |
|---|---|---|---|
| 1. | Net Sown Area | 623 | 36.39 |
| 2. | Fallow Land | 40 | 2.34 |
| 3. | Cultivable Waste | 74 | 4.32 |
| 4. | Build up Area | 311 | 18.17 |
| 5. | Area under Forest | 664 | 38.79 |
| 6. | Total Geographical Area | 1712 | 100.00 |

Source : Talathi Office Bhagdari Village, 2016



**Fig No. 1**

## Demographic Characteristics and Occupational Stucture

Table No 3 shows demographic characteristics of Bhagdari Village of Akkalkuwa tehsil. Bhagdari tehsil covered 1712 hectares area of the study region. In this vilalge 7087 inhabited and out of total population 43.90% people are literate. According to 2011 Census density of population accounts for 414 per sq km, per capita land (NSA) is 0.09 hector area. Bhagdari village sex ratio is 978 in 2011.

| Sr.No. | Crop | Area in Hectare | Area in % to Net Sown Area | Area in % to Total Area |
|---|---|---|---|---|
| 1. | Pulses | 212 | 34.03 | 1.99 |
| 2. | Jawar | 158 | 25.36 | 1.48 |
| 3. | Rice | 62 | 9.95 | 0.58 |
| 4. | Maize | 54 | 8.67 | 0.51 |
| 5. | Other | 137 | 21.99 | 1.28 |

Source : Talathi Office Bhagdari Village, 2016.




Fig. No. 2

**Table No. 3 Bhagdari Village : Demographic Characteristics in 2011**

| Sr. No. | Category | Total |
|---|---|---|
| 1. | Total Population | 7087 |
| 2. | Population Density | 414 |
| 3. | Per Capita Land (NSA) In Ha. | 0.09 |
| 4. | Literacy | 4.90 |
| 5. | Sex Ratio | 978 |

Source : District Agricultural Department Nandurbar, 2011.

**Table No. 4 Bhagdari Village : Occupation Structure in 2011.**

| Sr.No. | Category | Total | Population in % to Total Population |
|---|---|---|---|
| 1. | Total Population | 7087 | 100.00 |
| 2. | Total Main Worker | 2406 | 33.95 |
| 3. | a) Farmer | 1019 | 14.38 |
| 4. | b) Agricultural Labour | 1228 | 17.33 |
| 5. | c) Other Worker | 159 | 2.24 |
| 6. | Non Workers | 4681 | 66.05 |

**Source :** District Agricultural Department Nandurbar, 2011.

**Occupational structure**

Table No. 4 displayas occupational structure in Bhagdari village. According to this table main workers was recorded 2406 whereas 33.95% of total population was belongs to non workers, Farmers accounts for 14.38% of total population. Other workers were recorded 2.54% of total population of Bhagdari village. Non worker recorded 66.05% population of total population.

Problems

Out of selected 65 farmers 84.20% farmers accounting farmers expressed insufficiency of the credits facility, 43% were expressed high cost of agricultural labours and insufficient of agricultural implements. Agriculture and related activities is the main source of

livelihood for 32.40% population of this village. Total irrigated agricultural land of this vilalge is irrigated of wells and tube well. Government is passive to generate job opportunity in this rural area hence total is also a problem for youth. All farmers going in tehsil palce of Akkalkuwa because of agricultural input and selling agricultural products. There is lack of local market and uncertain marketing value.

**Conclusion :**

(i) The above rainfall ratio shows that the Akkalkuwa and Nvapur Tehsil is more rainfall

(ii) In all preparation of chart in Nandurbar district have more rainfall value (148mm) as compare to all study years.

(iii) IN bhagdari vilalge Pulses crop is more dominant crop in Akkalkuwa tehsil.

(iv) Cropping pattern of Bhagdari vilalge is mainly influenced by climate, soil, fertility and availability of water sources

(V) In Bhagdari village all farmers going in tehsil place of Akkalkuwa because of agricultural input and selling agricultural products. There is lack of local market and uncertain marketing value.

**References :**

(1) Chandankede, T.R.(2014): 'Agriculture and water management',Satyam publishers, Jaipur.

(2) Socio-Economic Review of the district -2003-2007, 2010 and 2013.

(3) CDAPNandurbar General description of the Nandurbar district.

4) Kulkarni Raghuvendra, Pawar Vilas (2002) : Jalashay, Om Publication, Thane.

5) www.water.mahatrashtra.gov.in

6 ) Nandurbar district census 2011. Co.in

7) Wikipidia.org.

◆◆◆

# १९२० पर्यंतची सामाजिक कादंबरी

**डॉ. पोपट सिनारे**

अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर

मराठी भाषेमध्ये 'कादंबरी' हा साहित्य प्रकार इंग्रजी राजवटीमध्ये सुरु झाला. पुढे या साहित्य प्रकारचा विकास होत गेला. 'कादंबरी' या साहित्य प्रकाराचे अद्‌भुतरम्य कादंबरी, सामाजिक, ऐतिहासिक पौराणिक कादंबरी इ. वेगवेगळे प्रकार मराठी साहित्यामध्ये प्रचलित आहेत. त्यापैकी १९२० पर्यंतच्या सामाजिक कादंबरीचा प्रस्तुत शोधनिबंधामध्ये परामर्श घेतला आहे.

सुरवातीला कादंबरीचे जे लेखन झाले ते इंग्रजी भाषेतील कादंबरीच्या अनुकरणाने मानवी मनाला अद्‌भुततेचे आकर्षण होते. त्या आकर्षणातून ह्या काळात अद्‌भुतरम्य कादंबऱ्या लिहल्या गेल्या.अशा कादंबऱ्या चांगल्या वाचला जातात (खपल्या जातात) हे लक्षात आल्यावर तशा प्रकारचे लेखन होऊ लागले. या सर्व अद्‌भुतरम्य कादंबऱ्या घटनाप्रधान स्वरूपाच्या होत्या. पुढे १८५७ ला मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या तरुणांना शिक्षणामुळे समाज वास्तवाचे भान आले. त्याच काळात स्वजागृतीस पोषक असे अनेक आंदोलने आसपास घडत होती.त्या अनुषंगाने आपल्या देशाचा इतिहास विषयी जिज्ञासा उत्पन्न होऊन ऐतिहासिक कादंबरी लेखनास सुरुवात झाली.पुढे समाजातील तरुण वर्ग जसजसा शिकू लागला. तसतशी त्यांची नजर समाजातील दोषावर स्थिर होऊ लागली.

या दोषाच्या निराकरणसाठी काहीतरी उद्योग करू लागली.त्या काळात समाजात असणाऱ्या बालविवाह, स्त्री शिक्षण, विधवांचे प्रश्न, केशवपन, इ. प्रश्नांची उलट सुलट चर्चा होत होती. त्या अनुशंगाने मराठी साहित्यात लेखन होऊ

चा काळात सामाजिक कादंबऱ्याची संख्या ही अल्प होती. 'यमुनापर्यटन' किंवा 'हिंदू विधवांचे स्थितीचे निरुपण' ही कादंबरी १८५७ ला बाबा पदमनजी यांनी लिहली. मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी म्हणून या कादंबरीचा उल्लेख केला जातो. १८५४ ला बाबा पदमनजी याने ख्रिस्ती धर्म स्वीकारला . ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यामुळे त्यांच्या पत्नीने त्यांच्याकडे येण्यास नकार दिला. या निमित्ताने झालेल्या खटल्याच्या खर्चासाठी बाबा पदमनजीनी ही कादंबरी लिहिलीआहे असे मानले जाते .या कादंबरीमध्ये विधवांच्या शोचनीय अवस्थेचे चित्रण केले आहे. "मिशनऱ्यांच्या शाळेत शिकणाऱ्या यमुना या एका मुलीचे लग्न विनाय्क्षी झाले. आईच्या वचनामुळे हा विवाह झालेला होता. यमुनेला त्याचे सुख वाटत नव्हते. शेजारीच तरुण गृहस्थ शिवराम मरण पावला. केशवपनाच्या भीतीने त्याच्या पत्नीने विहिरीत उडी टाकून जीव दिला. या भीती पोटीच यमुना नवऱ्या बरोबर प्रवासाला निघाली.वाटेतच वेणू नावाच्या आणखी एक तरुण विधवा स्त्रीची दुखे तिने पहिली.

यमुनेने तिला ख्रिस्ताचा उपदेश केला. नागपूरस यमुनेसह विनायक आपल्या मित्राकडे दौलतरावकडे गेले. त्यांची मामे बहीण विधवा होती. ती कोण्या एका पुराणिका बरोबर पळून गेली. पुढे पंढरपुरास यमुना व विनायक आले तेव्हा येथील एका विकेशा विधवा रात्री टोप घालून बदकर्मास जात असताना विनायकाने तिला पकडले. "आपल्या दोन लग्नाची व बदकर्माची कथा तिने सांगितली.सातारा, जेजुरी असा प्रवास करता करता विनायकास अपघात झाला.व त्यात त्याचा अंत झाला. केशवपनाचा प्रसंग आला. तेव्हा पवित्र शास्त्राच्या आधारावर यमुनेने परिस्थितीस तोंड दिले. तिने शीलवान अशा ख्रिस्ती माणसाशी पुन्हा लग्न केले."[१] असे कथानक या कादंबरीत आले आहे. या कादंबरीत विधवा विवाहाचा पुरस्कार केला आहे. ठिकठिकाणी येशू ख्रिस्ताचे महात्म्य वर्णन केले आहे.त्यामुळे मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी असूनही समीक्षकडून ती दुर्लक्षित राहिली.

यानंतर रहाळकरांनी घ्नारायणराव आणि गोदावरीङ या कादंबरी मध्ये महाराष्ट्रतल्या मध्यम वर्गाचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. 'शिस्तदार' (१८८१) साली विनातक कोंडदेव ओक यांनी ही कादंबरी लिहिली.या कादंबरीत लाच खाण्यापासून होणाऱ्या दुष्परिणामाचे चित्रण ओक यांनी केले आहे. प्रस्तुत कालखंडामध्ये बऱ्याचशा कादंबऱ्या इंग्रजी व फेंच भाषेतील कादंबऱ्याचे मराठीत भाषांतर झाले आहे.मराठी लेखकांनी आपल्या समाजाची सुख दुखे आपल्या साहित्यातून मांडण्याच्या प्रयत्न केला. १८८५ नंतर हरिभाऊ आपटे हे नाव मराठी साहित्यामध्ये महत्वाचे आहे. या कालखंडातील ते सर्वश्रेठ कादंबरीकार आहेत. स्वतंत्र सामाजिक कादंबऱ्यांचे जनक म्हणून हरिभाऊ आपटे यांना ओळखले जाते. 'मधली स्थिती' ही कादंबरी रेनोल्ड्स च्या 'My Steries of Old Londan' या कादंबरीचे भाषांतर आहे. ही त्यांची पहिली सामाजिक कादंबरी आहे. ही कादंबरी लिहिताना सुरुवातीला थोडेसे भाषांतर केल्यानंतर आपल्या स्वतंत्र प्रतिभेने त्यांनी लेखन केले. ही कादंबरी प्रसिद्ध झाल्यांनतर यांच्या अगोदर अद्‌भुतरम्य कादंबऱ्याच्या वाचक वर्ग वास्तववादी कादंबऱ्याकडे वळला. हरिभाऊनी एकूण दहा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या.त्यात घ्गणपतरावङ घ पण लक्षात कोण घेतो?, यशवंतराव खरे , मी जग हे असे आहे, भयंकर दिव्य, आजच ,मायेचा बाजार आणि कर्मयोग इ.कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांच्या या कादंबऱ्या मध्ये 'कथानक व व्यक्तिदर्शन' हे महत्वाचे घटक आहेत. हरिभाऊ आपल्या कादंबऱ्यातीला पात्रांच्या सुख दुखाशी एवढे समरस होतात. की त्यांचे पात्र वाचकाला खरी वाटू लागतात त्यांच्या व्यक्तिदर्शनाविषयी अ.ना.देशपांडे म्हणतात "व्यक्तिदर्शनात वास्तवतेचा हुबेहूब आभास उत्पन्न करण्यात हरिभाऊ इतके यशस्वी झाले आहेत की, त्या काळातल्या वाचकांना त्यांनी कोणतीही कादंबरी वाचताना तिच्यातील पात्रे आपल्या भोवतालच्या सत्यसुष्टी वावरणाऱ्या व्यक्ती आहेत. असे वाटत असे"[२] हरिभाऊ यांच्या मधली स्थितीमधीलदुर्गेचे वर्णन अशाच प्रकारचे आहे. या कादंबऱ्यामध्ये वेश्येच्या घराचे वर्णन केले आहे. ते इतके हुबेहूब आले आहे की, हरिभाऊ वेश्येच्या घरी जात असावे .असा एका वेश्येच्या समज झाला.

हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यातील बहुतेक सारी पात्रे व्यवहारातून निवडलेली होती.ते आपल्या कादंबऱ्यातीला पात्राविषयी म्हणतात की, असे एकही पात्र नाही की जे मी वास्तवात पाहिलेले नाही.

नाथ माधव हे या कालखंडातील एक महत्वाचे कादंबरीकार त्यांनी डॉक्टर, विमलेची ग्रहदशा, ग्रहदशेचा फेरा, स्वयंसेवक, अशा काही सामाजिक कादंबऱ्या लिहल्या. या कादंबऱ्यामधून त्यांनी स्त्री शिक्षण, पुनर्विवाह , प्रौढविवाह, इ. तत्कालीन सामाजिक प्रश्नांचा उहापोह आपल्या कादंबऱ्यातून करण्याच्या प्रयत्न केला आहे. यानंतर ना.ह.आपटे हे एक या कालखंडातील महत्वाचे कादंबरीकार 'वैभवाच्या कोंदणात' भाग्यश्री ,याला कारण शिक्षण, पहाटेपूर्वीच्या काळोख आणि सुखाच्या मूलमंत्र अशा सामाजिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. परंपरागत समाजाला पचतील, रुजतील अशा प्रकारच्या सुधारणा त्यांनी आपल्या कादंबरीत सांगितल्या आहेत.

**निष्कर्ष :-**

१) सुरवातीला परकीय भाषेतून या कादंबऱ्याचे भाषांतर मराठी भाषेत झाले आहे.

२) समाजातील वेगवेगळ्या समस्यांचे चित्रण या सामाजिक कादंबऱ्यातून करण्याच्या प्रयत्न केला गेला.

३) मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी म्हणून यमुनापर्यटन या कादंबरीचा उल्लेख केला जातो.

४) या कालखंडातील सर्वश्रेष्ठ कादंबरीकार म्हणून हरिभाऊ आपटे यांना मानण्यात येते.

५) स्वतंत्र सामाजिक कादंबऱ्याचे जनक म्हणून हरिभाऊ आपटे यांना ओळखण्यात येते.

६) बहुतेक सामाजिक कादंबऱ्यातून स्त्री स्वतंत्र, स्त्री सुधारणा, हे विषय आले आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) जोशी .प्र .न.- मराठी वाड्मयाचा विवेचक इतिहास - अर्वाचीन काळ इस्नेहवर्धन प्रकाशन पुणे, सुधारित आवृत्ती -पृ.क्र. ३१६/३१७

२) देशपांडे .अ.ना. - मराठी वाड्मयाचा विवेचक इतिहास- पृ.क्र. ३१६/३१७

◆◆◆

# प्रवर्तनाचा युगस्पर्श - बौध्द संस्कृतीचा शोध

**डॉ. संजय कांबळे**
मराठी विभाग,
राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगावी, कर्नाटक

प्रकाश खरात हे स्वातंत्र्योत्तर कालखंडात निर्माण झालेल्या मराठी साहित्यातील दलित अथवा आंबडेकरवारी साहित्यप्रवाहातील महत्वाचे साहितिक, समीक्षक, विचारवत आहेत. विशेषत: त्यांची प्रकृती संशोधकाची असल्याचे त्यांच्या लेखनावरून दिसून येते. त्यांनी साहित्य लेखन करनाना 'अंधाराचा अस्त' (१९९३), अक्षरांची पहाट (२००३), प्रवर्तनाचा युगास्पर्श (२००२), हे कथासंगृह व यशोधरा (२०१४) ही कादंबरी. दलित कथा: उदगम आणि विकास (१९९२), मराठी साहित्य प्रवाह आणि समीआ (१९९५), बौद्ध धर्माची चिंतनयात्रा (२००७), साहित्य समीआ बदलले मापदंड (२०१०), साहित्याचे समाजशालीय अंतरंग (२०२०) हे समीक्षाग्रंथ. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा साहित्य विचार (१९९२), बहुजन समाज आणि साहित्यजीवन (१९९३), आंबडेकरवाद समाज आणि संस्कृती (२००५) ह्या वैचारिक ग्रंथांची निर्मिती केलेली आहे.

प्रस्तुत लेखात प्रकाश खरात यांच्या 'प्रवर्तनाचा युगस्पर्श' ह्या कथासंग्रहांचा विचार करावयाचा आहे.

**मराठी कथेत दलित कथेचे योगदान :-**

कथा हा वाडमय प्रकार फार प्राचीन आहे. कथेला फार मोठी वाङमय परंपरा आहे. प्राचीन कथा वाङमयातून अध्यात्मिकच विषय हाताळल्याचे दिसतात. सर्व सामान्यांच्या सुखदुखा: भोवती ही कथा कधीच केंद्रित नव्हती. कथेला  खऱ्या अर्थाने आधुनिक स्वरुप हे अव्वल इंग्रजी आमदनीपासून प्राप्त झालेले आहे. इंग्रजी साहित्याच्या संसर्गाने आजच्या मराठी कथेची स्थित्यंतरे, आधुनिक, नवकथा आणि नवकथेनंतरची कथा अशा अवस्थांमधून तिची वाढ होत आहे. साहित्य प्रवाहानूसार कथेचे ग्रामीण, नागर, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, वैज्ञानिक असेही वर्गीकरण करण्यात आले आहे. एकूण आजची मराठी कथा वाङमयातील अनेक प्रयोगशील प्रवाहानी समृध्द होताना दिसते.

मराठी साहित्यात दलित कथेने मोलाची भर टाकली आहे. आपल्या अंगभूत वैशिष्ट्यांनी ही कथा फार वेगळीच ठरली आहे. तिची प्रेरणा प्रवृत्ती सर्वस्वी निराळी आहे. तिला दलितांच्या दाहक जीवनाचा मध्यमवर्गीयांना अपरिचित असणारा स्पर्श आहे. म्हणुन दलित साहित्याचे अभ्यासक समीक्षक, मार्गदर्शक प्रा.गंगाधर पानतावणे दलित कथेच्या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवी मुक्तिसंग्रामातून दलित कथेचा उगम झाला असे म्हणतात ते रहस्यच आहे. कारण संपूर्ण दलित साहित्याची प्रेरणा बाबासाहेबांच्या विचारधारेतून आलेली आहे.

या संदर्भात डॉ.प्रकाश खरात यांचे विवेचन फार महत्वाचे आहे. दलित कथेवर बोलन्याचा,

लिहिण्याचा अधिकार त्यांचा आहे. कारण दलित कथेच्या उगमापासून कथा विकास होईपर्यंतसचा संशोधनात्मक आढावा डॉ. प्रकाश खरात यांनी त्यांच्या 'दलित कथा : उगम आणि विकास' ह्या ग्रंथात घेतलेला आहे. या संदर्भात ते म्हणतात. "अधुनिक मराठी कथा साहित्यात हरिनारायण आपटे ह्यांनी जी सामाजिक सुधारणेची कथा दिली याच कथेला दलित कथेने अधिक क्रांतीकारी आश्वत देऊन विकास केला. स्त्री शोषणाची मूळ वर्णव्यवस्थेच्या तत्वज्ञानात व त्याच्याच धर्म चिकित्सेत शोधून मांडली. शूद्र, अतिशूद्र, आदिवासी यांचे आर्थिक व सामाजिक दास्य चातुर्वर्ण्य धर्मव्यवस्थेतून उगम पावली हा शोधप्रत्यय दिला. माणसाचे नैसर्गिक हक्क कसे चेंदामेंदा करुन पायदळी तुडविले याबदलची एक व्याकुळता दिली. त्यामधील दु:ख व कारुण्य हे शोषणाधिष्टित सामाजिक जीवनातून माणसांच्या वाट्याला आले हे भान दिले. बहुसंख्याकाच्या दु:खाला वाचा फोडली. मुक्या वेदनेला नवी चेतना दिली. कथेच्या विविध प्रकारच्या व वर्गीकरणाच्या घटकांमधून पूर्वीच्या पारंपारिक कथेचे नवे दर्शन घडविले. मराठी कथेला समताधिष्टित मूल्यांचा उद्देश दिला. सामाजिक प्रक्षेपनाची तळमळ दिली. मैत्री व कारुण्य भावनांची हाक दिली. मानवतावादी मूल्यांचे आवाहन दिले. हे दलित कथेचे निराळे पण मराठी  कथेची प्रकृती झाली आहे."

मराठी दलित कथेला घडविण्याचे कार्य अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, ना.रा.शेंडे, बंधू माधव, केशव मेजाम, अर्जुन डांगळे, वामन होवाळ, योगिराज वाघमारे, धोंगडे मेडाम, डॉ.अमिताभ, अविनाश डोळस इ. पहिल्या पिढीतील कथाकारांनी केले आहे. 'प्रकाश खरात' हे दुसऱ्या पिढीत कथालेखन करणारे कथाकार आहेत. त्यांनी 'अंधाराचा अस्त,' 'अक्षरांची पहाट' 'प्रवर्तनाचा युगस्पर्श' या कथा संग्रहांची निर्मिती केली आहे. या सर्वच दलित कथाकारांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखन व विचार कार्याला प्रमाण मानून कथालेखन केले आहे. त्यांनी आंबेडकरी विचार आपल्या कथेतून अविष्कृत केला. म्हणून त्या संदर्भात दलित साहित्याचे समीक्षक डॉ.भालचंद्र फडके म्हणतात, "अभावग्रस्त समाजाची अस्मिता जागृत करणारी शक्ती डॉ.आंबेडकरांच्या तत्वज्ञानात आहे आणि हे तत्वज्ञान दलित कथेचे तात्विक अधिष्ठान आहे. "आंबेडकरी तत्वज्ञानाच्या मुशीतून तयार झालेली दलित कथा माणसाला महान माणनारी, माणसाच्या मनुष्यत्वाची प्रतिष्ठा जोपासण्याचे कार्य करते. आपल्यावरील अन्यायाची चिरफाड करते. वेदना-विद्रोह नकार व स्वीकार यांचे प्रभावी अविष्करण करते. दलित कथाकार गावकुसा बाहेरील उपोक्षित जीवन जगताना आलेले अनुभव मांडताना दिसतात. त्याचबरोबर शिकून नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गीय दलित जीवनातील, वर्तमानकालीन जगण्याच्या समस्यांचा वेध घेताना दिसतात. दलित कथाकार एकूणच व्यामिच ताणतणावांचे चित्रण करताना दिसतात.

**प्रवर्तनाचा युगस्पर्श :-**

प्रवर्तनाचा युगस्पर्श हा कथासंगृह २७ डिसेंबर २००९ साली प्रकाशित झाला. ह्या कथासंग्रहामध्ये एकूण दहा कथा आहेत. वेगळ्या जाणवेतून  प्रकाश खरातांनी ह्या कथा लिहिल्या आहे. भेट, उत्खनन, तोरण, एका शहरातील वसंत, आरोळी, प्रेरणा, नदीतील शेकोटी, पंगत, सरोवराकाठच्या खुणा, प्रवर्तनाचा

युगस्पर्श अशा शीर्षकाच्या कथा आहेत. भारत ही बुध्दाची भूमी आहे. एकेकाळी संपूर्ण भारतभर बौध्द धम्म पसरलेला होता. वैदिक ब्राहमणी संस्कृतीने कपटाने बौध्द धम्माचे ब्राहमणीकरण केले, बौध्द धर्मावर अतिक्रमण करुन बुध्दाची प्रतिमा, शिल्पे, प्रतिके हिंदुकरणाच्या प्रभावीकरणामध्ये जाणीवपूर्वक आणल्या हे संशोधनातून, उत्खनातून सिध्द झाले ही वस्तुस्थिती सर्वांसमोर आणण्याच्या उद्देशाने 'प्रवर्तनाचा युगस्पर्श' ह्या कथासंग्रहाची निर्मिती झाल्याचे दिसून येते. या कथासंगृहातील काही कथा संशोधनाच्या अंगाने वस्तुस्थितीवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. यासंदर्भात प्रकाश खरात लिहितात "साहित्य आणि समाज यांच्या परस्परसंबंधाची फारकत कोणत्याच लेखकाला घेता येत नाही. समाज जसा बदलत जातो. तसेच त्या समाजासोबत साहित्यही बदलते. साहित्याचे निकषही बदलत असतात. लोकांचे जीवन बदलले की त्यांचे प्रतिबिंब साहित्यात तसेच साकारते. लोकांचे मन परिवर्तित झाले की त्याचे मानसिक थिमही साहित्यात वेगळे रुप धारण करते. लोकांच्या उपासणापध्दती रुढी, प्रतिमा, प्रतिकं, विचार, इतिहास बदलला की साहित्यातही ते समाजजीवन प्रकट होते. डॉ. आंबेडकरांच्या युगप्रवर्तक क्रांतीने भारतीय समाज जीवन बदलले. विचार करण्याची लोकशाही समताधिष्टीत मूल्यचेतना लोकांनी स्वीकारली. त्यांनी दिलेला बोध्द संस्कृतीची प्रेरणा व वारसा लोकांनी जुन्या वर्णसंस्कृतीला व तिच्या गुलामगिरीला नकार दिला. त्यामधून गेल्या शतकाच्या वाटचालीत भारतीय व मराठी जीवनात नवे परिवर्तन आले. त्या परिवर्तनाचे कार्य परिणाम झाले ? कुटुंबसंस्थेतून तो विचार कसा संस्कारित व विकसित झाला ? संस्कृती होऊन कसा गतिमान झाला ? त्याचे प्रत्यक्ष जीवनदर्शन मराठी कथेत फारसे चित्रित केले नाही. प्राचीन व आर्वाचीन बौध्द संस्कृतीचा माहाराष्ट्र संस्कृतीत साकारलेले संबंध रेखाटले नाहीत. संबंध इतिहासातून मुख्य प्रवाह वाहत आलेली बौध्द संस्कृती मराठी संस्कृती राहिली आहे. परंतु तिचा शोध साहित्य लेखनात घेतला नाही. प्रस्तुत कथासंगृहातील काही कथेत तो शोध कथात्म रुपात साकार केला आहे. त्यामुळे या कथेचे स्वरुप संशोधन कथांचे झाले आहे ऐतिहासिक व सामाजिक कथांचे झाले आहे" प्रकाश खरात यांची कथालेखनाची भूमिका त्यांच्या विचारातून प्रकट होते.

**बौध्द संस्कृतीवर प्रकाश जोत :-**

प्रकाश खरात यांयनी भेट, उत्खनन, तोरण, सरोवराकाठच्या खुणा ह्या कथेतून बौध्द संस्कृतीवर प्रकाश टाकला आहे. भारतही बुध्दाची भूमी आहे हे संपूर्ण जगाने मान्य केलेले आहे. परंतु बौंध्द संस्कृतीवर हिंदु (संस्कृती) मानसिकतेने आक्रमण केले. ह्या वस्तुस्थितीवर नेमकेपणाने लेखकाने बोट ठेवले आहे. "शंकराचार्याने बौध्द धर्म नष्ट केला ही ऐतिहासिकदृष्ट्या खोटी आहे शंकराचार्याच्या मृत्यूनंतरही बंगालमधील पाल घराण्यातील राज्ये बुध्दधम्माचे समर्थक होते. महाराष्ट्रात नवव्या शतकात बौध्द भिक्षूंना दान दिल्याचे शिलालेख व तामृपट यांचे पुरावे तू आजही वाचू शकतेस. सोळाव्या शतकापर्यंत बुध्दधम्माच्या खुणा भारत भर विखुरलेल्या आढळतात. क्षीण प्रवाहात बुध्दधम्म दिसतो नंतर बौध्दधम्माच्या प्रतिकांवर हिंदुधर्माचा स्टॅम्प लावला" 'भेट' या कथेतील अशोक आणि ऋचा यांच्या संवादातून लेखकाने भारतातील सेंध्द

संस्कृतीवर प्रकाश टाकला आहे.

महायान बौध्दांनी सुध्दाचे पहिले पाऊल कमळाच्या रुपाने दाखविल्याचे इतिहासातील चित्र समोर संशोधनातून येते महायान बौध्दांनी बालवयातील बुध्दाने उचलेले पहिले पाऊल हा क्षण कमळाच्या फुलांवर दाखविलेला होता. पहिल्या पावलाला असे सौंदर्यपूर्ण ठरविले होते. कमलपुष्पाच्या भाषेत वर्णन कले होते. आजही त्या भाषेच्या रुपात थायलेंड व आशिया खंडातील बौध्द सांस्कृतिकता बोलत होती. प्राचीन बौध्दानी कमळपुष्पाच्या रुपाने भारतात आणि भारताबाहेर बुध्दाचे पहिले पाऊल जनतेत प्रचलित केले होते. बुध्दाच्या पहिले पाऊल ही आठवण अशी प्रचलित करुन रुढ केली होती. नंतर बुध्दाला कमलपुष्पावर बसवून चित्रामधून दाखविले होते बुध्द कमल हे अतूटनाते इतिहासात कायम स्वरुपात कोरले होते बुध्दाचे जीवनप्रसंग अजिंठ्यातील  गुंफामधून चित्रकलेत व शिल्पकलेत कोरलेले होते. बुध्दाची आई मायावतीच्या पोटात गर्भधारणा होणे. बुध्दाचा जन्म होणे, बुध्दाचे बालवयातील पहिले असे हे बालपणातील प्रसंग, तरुणपणातील प्रसंग, ज्ञाणप्राप्ती व प्रवरनामधील प्रसंग व शेवटी निर्वाण ही अनेक क्षणचित्रे चित्रकेलेतून व वाङमयातून समोर आली. त्याकाळच्या लोकांनी लाकूड, दगड यांचा वापर करुन लोकांना बुध्द कमलपुष्पाच्या, चैतन्यकृतीच्या, विहाकृतीच्या छोट्या-छोट्या साधनातून शिकविला. हे ऐतिहासिक सत्य असूनही बुध्दाचे मूळरुपाचे प्रतीक बदलून त्याला दिलेले विष्णूचे नाव त्यला दिल्याचे बुध्दाचे ब्राहमणीकरण, हिंदुकरण करण्याचा प्रयत्न असल्याचे लेखक या कथेच्या माध्यमातून दाखवून देतो या संदर्भात लेखक लिहितो, "हे विष्णुचे पाऊल नाही. मद्ययानी बौध्दांनी बुध्दाच्या पहिल्या पाऊलाचे लाकडी कलाकृतीचयाद्वारे रेखाटलेले रेखाटन आहे. बुध्द विचाराचे जनमाणसासाठी प्रचलित केलेले साधन आहे. बुध्दधम्माचा ऱ्हास झाला तेव्हा प्राचीन बौध्दांच्या पध्दती, साधनं, ब्राहमणी हिंदू धर्माने स्वीकारल्या आणि त्यांना हवा असलेला बदल केला. बुध्दाच्या प्रतिमावर विष्णुचे नाव लावले. बुध्द प्रतिकांवर ब्राहमणी स्टॅम्प मारले, बौध्दाच्या लेण्यांचेही पांडव लेण्या केल्या. असे आजचा इतिहास सांगतो" लेखकाने बौध्द संस्कृतीवर केलेल्या हिंदुकरणाचा पर्दाफाश केला आहे. यातून बुध्द हा विष्णूचा अवतार मानणे म्हणजे खोडसाळपणचाच प्रकार असल्यचे सिध्द होते.

'खत्खनन' या कथेतून साहित्यातून उत्खनन पुराव्याचा वापर अधिक झाला पाहिजे. साहित्य आणि पुरातत्वविज्ञान जोडून लोकांसमोर मांडले पाहिजे असा विचार लेखकाने मांडला आहे. उत्खननात सापडलेला प्राचीन मराठी माणसांचा स्तूप मौर्यकालीन असल्याचे सिध्द होते आजच्या मराठी माणसांची प्राचीन संस्कृती बौध्द होती. उत्खननात सापडलेला स्तुप त्याचा पुरावा होता. शिवाय उत्खननात सापडलेल्या करंडकामध्ये पवित्र अस्थी व रक्षा सापडली ती नक्कीच मानवतेच लेण असलेल्य तथागत बुध्दाची असावी. असे लेखक मतव्यक्त करतो एकेकाळी या देशातील नव्वद टक्के जनता बौंध्द होती. सम्राट अशोकाने ८४,००० स्तूप बांधल्याची इतिहासात नोंद आहे. काळासोबत इतिहासाच्या घडामोडीत ते काही नष्ट झाले.  काही जाणीवपूर्वक बुजविले. कांहीची मंदिर केली तर काहीवर मशीदी बांधल्या आजउत्खनात

मात्र सत्य बोलले आहे या प्रदेशातील संस्कृती ही स्तूपाची होती. आयोध्यातील वादग्रस्त राममंदीराच्या ठिकाणी बौंध्द अवषेश सापडले आहे. हे पुराव्याने सिध्द झाले आहे. पण महाकाव्याच्या आधारे राममंदिराची संकल्पना आकारास येते. ही आपल्या देशातील हिंदुकरण करण्याची प्रक्रिया असल्याचे दिसते. खरे इतिहासकार महाभारताला काव्यग्रंथच मानतात. इतिहास व काव्य हे वेगवेगळे समजून घ्यावयाचे असतात असे लेखक नमूद करतो शिवाय काव्याचे स्थान महान असल्याचे मत नोंदवितो.

स्तूप म्हणजे तथागत बुध्दाचे प्रतिक आहे. अंडाकृती सतूपावर चौकोनी धर्मिका दाखविली असून स्तूपावरील लांब दांडीवर धम्मचक्र दाखविलेले आहे बौध्द धम्मात त्रिशूळाचे स्थान विशेष आहे. बुध्द, धम्म, संध हे त्रिशूळाचे प्रतिनिधी असतात. त्यांना धम्माचे तीन आधाररत्न म्हणून प्रतिपादन केलेले आहे या तिघांची मिळून एकत्र, एकच प्रतिमा म्हणजे त्रिशूल केला आहे. तीन टोक असलेलं एकच चिन्ह म्हणजे त्रिरत्न चिन्ह होय. या तीन टोकानांच बौध्द बूध्द मांगल्य, व पवित्र म्हणून स्थान आहे. सत्याची कास धरणे. चांगल्याचे आचरण करणे. मंगल गोष्टींची निर्मिती करणे या तीन तत्वांना बौध्द कलेत महत्व आहे. पण आज त्रिशूळ प्रतिमा शिवाशी जोडलेली दिसते. बौध्दांचया लेण्यांना पांडव लेणी म्हटले जाते. म्हणजे बौध्द संस्कृतीचे हिंदुकरण करण्याच्या कुटील डावावर लेखक प्रकाश टाकतो.

'तोरण' या कथेतून बौध्द धम्मातील आंब्याचे, पिंपळाचे झाड यांचे महत्व विशद केले आहे. शिवाय प्राणी मात्रावर दया करण्याची संस्कृती बौध्द धम्मात असल्याचे पुराव्यानिशी संदर्भ देऊन लेखकाने या कथेत भाव केलेले आहे पिकापासून उत्पन्न झालेल्या धनाचा उपयोग स्वतासाठी करता करता मुक्या प्राण्यांच्या वाट्यालाही दिला पाहिजे. श्रेष्ठ कर्तव्यभावना म्हणजे पोळा होता. प्राणी मात्रांवर दया करावी ही श्रेष्ठ भावना ज्या बुध्द तत्वज्ञाने शिकविली त्या भावनेचा कृतीकार्यक्रम म्हणजे पोळा होता. बौध्द धम्मात प्राण्यांच्या प्रती दया भावनेला फार महत्व आहे. शेतीसाठी उपयुक्त असणारा प्राणी म्हणजे गाय, बैल कारण या गायीच्या पोटातूनच पोळा (बैल) जन्मास येतो. त्या प्राण्याचे यज्ञात ब्राहमण बळी देत. त्याविरुध्द सर्वप्रथम गौतम बुध्दाने बंड पुकारले. यज्ञसंस्कृतीच्या विरुध्द आवाज उठविला.

बौध्द धम्मात आंब्याच्या पानाला, पिंपळाच्या पानाला विशेष महत्व आहे. आंब्याचे तोरण हे सुध्दा बौध्द संस्कृतिचेच अवशेष बुध्दाने आंब्याच्या वृक्षाखाली सावलीतच सारनाथला धम्मचक्रप्रवर्तन केले. पहिल्या पाच शिष्यांना बौध्दधम्म आंब्याच्या सावलीत बसून सांगितला म्हणून बौधांनी आंब्याला महत्वाचे जीवनात स्थान दिले. सारनाथल्या धम्मके स्तुपावर आंब्याच्या वृक्षाच्या पानांचे अंकन केले. सांची स्तुपाच्या तोरणद्वारावरही आंब्याचा वृक्ष कोरला आहे आंब्याच्या राईमध्येच बुध्दाने अनेक ठिकाणी विश्रांती व मुक्काम केला अनेक जनपदाच्या आमराईत व आंब्याच्या सावलीत बसूनच अनेक लोकांना धम्मदीक्षा दिली. त्यामुळे बुध्द आणि आंबा याचे एक श्रध्देचे नाते बौध्द लाकांनी जोपासले बुध्द संस्कृतीत ते नाते साकार केले. बौध्द धम्मात 'तोरण' सांस्कृतिक वृक्षांच्या पानांचे आहे. आंबा व पिंपळपान. बुध्दधम्मात पिंपळाला फार महत्व आहे. याच पिंपळाला 'बौधीवृक्ष' म्हणून वंदन करतात.

'सरोवराकाठच्या खुणा' या कथेत लोणार सरोवरच्या बाजूला असलेल्या बौध्द विहारावर झालेल्या हिंदु आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर भाष्य केलेले आहे यासंदर्भात बौध्द संस्कृतीचा इतिहास आठवताना लेखक लिहितो. मी हिनयान बौध्दाचा सुरुवातीचा इतिहास आढवू लागतो. हिनयान बौध्दांनी जेव्हा विहार, चैत्य बांधली तेव्हा त्यांनी बुध्दाला मानव मूर्तीचे रुप दिले नव्हते. बुध्दाचे प्रतिकरुपच रुजविले होते. जन्म म्हणून कमळ बुध्दगयेची ज्ञानप्राप्ती म्हणून पिंपळाचा वृक्ष महापरिनिर्वाणाचे प्रतिक म्हणून स्तूप. म्हणून मला या मंदिरात मूर्तीचा अभाव जाणवू लागला. कारण ते हिनयानी बौध्दांचे होते. नंतर हिनयानला घेय मार्ग समजले गेले आणि महायानाला मोठ्या मार्ग समजले गेले आणि महायानाला मोठामार्ग अशी रुढ झाली हे दोनही मार्ग -बुध्द विचाराचे वाहक म्हणूनच काम करीत होते. नंतरच्या काळात हिनयान यांनीही बुध्दमूर्ती स्वीकारली असावी आणि नंतर बुध्दमूर्ती शिल्पकलेच्या रुपाने विकसित झाली. बुध्दधम्माचा ऱ्हास झाल्यानंतर लेणी विहारावर इतर पंथीयांनी ताबा घेतला आणि आपणाला हवी असलेली मूर्ती बसलेली कुठे महादेवाची पिंड बसविली. लोणार येथेही असच घडलेले मी पाहत होतो" प्रकाश खरात यांनी या कथेतुन बौध्द संस्कृतीचा इतिहासावर ऐतिहासिक प्रकाश टाकला आहे. या संदर्भात डॉ.सुरेश वर्ध म्हणतात, प्रवर्तनाचा युगस्पर्श चा कथासंग्रहातील जीवनदर्शन प्रामुख्याने डॉ.आंबडेकरांच्या प्रेरणेतून साकारलल्ला नवसंस्कृतीचे आहे. पुरातत्व विभागाने भारतीयांच्या प्राचीन बौध्द संस्कतीचा जा शोध घेतला त्यावर आधारलेल्या काही कथा आहेत. बुध्द संस्कतीतील काही सुफझरे आजच्या हिंदू संस्कतीतून व मौखिक साहित्यतून वाहन आहेत. त्या विचार भावनांची कथात्मरूप या कथासंग्रहात आहेत. कथा संग्रहाचे निरापण आहे. संशोधन कथा वाटाव्या असे त्याचे स्वरूप आहे. डॉ.सुरेश वैध म्हणतात, त्याप्रमाणे संशोधन कथाच असल्याचे स्पष्ट प्रवर्तनाचा युगस्पर्श कथा संग्रहातून जाणवते.

**डॉ.बाबसाहेब आंबडेकरांची विचार धारा**

डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्या विचारांचा प्रभाव सर्वच दलित लेखक, विचारावंताच्यावर झालेला दिसून येतो. प्रत्येक लेखक, विचारावंत आपल्या लेखक आर्वाविचार कार्यातून आंबेडकरी विचार करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करून असतो. याला प्रकाश खरात ही अपवाद नाहीत. प्रवर्तनाचा युगस्पर्श या कथासंग्रहातून हे जाणवते.

आरोळी कथेतील वडार जमातील येलूबाई गौतमने केलेल्या प्रबोधनामूळे अंगात चोळी घालण्याचा निर्णय घेते.जो या स्वार्था व्यवस्थेने वडार जामातीच्या लियांचा चोळी घालण्याचा हक्क हिरावून घेतलेला होता.

◆◆◆

# अण्णाभाऊंची कविता म्हणजे समाजपरिवर्तनाचे तत्त्वज्ञान !

**डॉ. राजेश्वर दुडूकनाळे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड.

अण्णाभाऊ साठे प्रथम शाहीर आहेत. नंतर कथा-कादंबरीकार आहेत. त्यांनी प्रथम शाहिरी कविता रचून मराठी साहित्यामध्ये प्रवेश केला. १९४० नंतर त्यांनी लावण्या, पोवाडे, क्रांतिगीते रचायला सुरुवात केली. या रचना तत्कालीन कामगार वर्गात खूप लोकप्रिय झाल्या. अल्पावधीतच त्यांना 'लोकशाहीर' म्हणून मान्यता मिळाली. पोवाड्याबरोबरच त्यांनी लावणी, गण, गीते, पदेआणि छक्कड इ. प्रकारची रचना केली आहे. एक कवी म्हणून अण्णाभाऊ आपले भावविश्व साकार करण्यासाठी विविध प्रकारच्या रचना करतात.त्यांच्या अशा रचनांमधून निसर्गसौंदर्याबरोबरच अनेक ठिकाणी विद्रोही जाणिवा व्यक्त झाल्या आहेत.

**माझी मैना गावावर राहिली :**

ही अण्णाभाऊंची गाजलेली लोकप्रिय अशी लावणी आहे. ही लावणी म्हणजे रूपकात्मकतेचे उत्तम उदाहरण होय. 'मैना' या शब्दाचे वाचक दोन अर्थ घेऊ शकतो. एक मैना म्हणजे प्रिय पत्नी, आणि दुसरा अर्थ म्हणजे संयुक्त महाराष्ट्र. सुरुवातीला पती-पत्नीचा विरहभाव घेऊन येणारी ही लावणी नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा आशय घेऊन येते. या लावणीचे मूल्यमापन करताना डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात, "माझी मैना गावावर राह्यली ही लावणी तर अण्णाभाऊंच्या काव्यप्रतिभेची साक्ष देणारी आहे. मैना ही एक स्वरूपसुंदर स्त्री. परंतु गरिबीने तिची आणि तिच्या सख्याची ताटातूट केली. पोट भरण्याकरिता ताटातुटीचा विरह सहन करून तो मुंबईत आला. त्याची दैनाच झाली. मुंबई शहरात त्याला 'हडसनची गाडी, नायलॉनची साडी, बुटाची जोडी, सोन्याची लडी, ऐतखाऊ भांडवलदारांची कडीवर कडी दिसली.' आणि- 'पाण्यानं भरलं माझं दोन्ही खिसं | वाण मला एका छत्रीची ||' हे स्वतःच्या दुरवस्थेचं भान आलं. पण त्याचवेळी मुंबईत संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरू झाला आणि पत्नीचा विरह विसरून हा मराठी माणूस लढ्यातच सामील झाला. ताटातूट झालेल्या पतिपत्नीच्या विरहाची आणि त्यांच्यातील भावबंधाची कहाणी या लावणीत सांगितली आहे. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या पार्श्वभूमीवर ही लावणी आहे, हे लक्षात घेतले म्हणजे या लावणीतील रूपकात्मकताही लक्षात येते. यातील नायिका मैना म्हणजे बेळगाव, कारवार, डांग, उंबरगाव, गोव्यामधील महाराष्ट्र विरहिणी जनता आणि 'त्या जनते' विषयीची महाराष्ट्राची हळहळ म्हणजेच शाहिरी मनाची काहिली. अशी ही सीमा प्रश्नाविषयीची लावणी आहे. 'सुंदरा मनामधि भरली' या लावणीपेक्षाही अण्णा भाऊंची ही मैनेची लावणी महाराष्ट्रभर लोकप्रिय झाली."[१] यावरून अण्णाभाऊंच्या उत्तुंग काव्यप्रतिभेची जाणीव तर होतेच, त्याहीपुढे जाऊन त्यांचे महाराष्ट्रावरील, मराठी माणसावरील प्रेम लक्षात येते.

मुंबईतील सामान्य माणसाच्या जगण्यातील दारिद्र्य, अज्ञान अण्णाभाऊ नेमक्या शब्दात टिपतात. एकीकडे प्रचंड श्रीमंत असणारी माणसं तर दुसरीकडे पोटासाठी धडपडणारे कामगार, हा अण्णाभाऊंच्या अनुभवविश्वाचा एक भागच बनला होता. हे आर्थिक दारिद्र्य लावणीतून व्यक्त होते. मुंबईतील पीडित, शोषित माणूस हा त्यांच्या लावणीचा विषय बनतो.

"ही मुंबई यंत्राची, तंत्राची, जगणारांची, मरणारांची,
शेंडीची, दाढीची हडसनच्या गाडीची,
नायलॉनच्या आणि जॉर्जेटच्या तलम साडीची |
बुटांच्या जोडीची | पुस्तकांच्या थडीची |
माडीवर माडी | हिरव्या माडीची |
पैदास इथं भलतीच चोरांची | ऐतखाऊंची |
शिरजोरांची | हरामखोरांची | भांडवलदारांची |
पोटासाठी पाठ धरली होती मी कामाची |"[२]

सुरुवातीला विरहभाव घेऊन येणारी लावणी अशी वर्गवादाकडे वळते. ती शोषकांचा धिक्कार करते. कामगारांच्या जीवावर उभे असलेले मुंबईचे देखणेपण अण्णाभाऊंना चांगलेच माहीत होते. कष्टकऱ्यांच्या घामातून ही मुंबई उभी राहिली होती. तिथे शोषण, अन्याय, अत्याचार असले तरी ती शेवटी मराठी माणसाची अस्मिता आहे. तिला बदलण्याचे सामर्थ्य मराठी माणसामध्ये आहे. म्हणून पुढे अण्णाभाऊ या लावणीत मराठी माणूस संयुक्त महाराष्ट्रासाठी कसा लढतो आहे, याचे चित्रण करतात.

"त्याच दरम्यान उठली चळवळ संयुक्त महाराष्ट्राची |
बेळगाव, कारवार, निपाणी, गोव्यासह एकभाषिक राज्याची |
चकाकली संगीन अन्यायाची | फौज उठली बिनीवरची |
कामगारांची | शेतक?यांची | मध्यमवर्गीयांची |
उठला मराठी देश | आला मैदानी त्वेष | वैरी करण्या नामशेष |
गोळी डमडमची छातीवर साहिली |"[३]

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये अण्णाभाऊंनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. मराठी भाषिकांच्या अस्मितेचा लढा म्हणून अण्णाभाऊ या चळवळीकडे पाहतात. मराठी माणसाने अखंड महाराष्ट्रासाठी कसा संघर्ष केला, याचा प्रत्यय लावणीच्या वरील ओळींमधून येतो. थोडक्यात, ह्या लावणीतून मैनेचा विरह, मुंबईची दोन रूपे- श्रीमंतांची, शोषकांची मुंबई व गरिबांची मुंबई, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि त्यासाठी चाललेला संघर्ष अत्यंत उत्कट आणि तितक्याच आक्रमक, बंडखोर भाषेत शब्दबद्ध केला आहे. त्यामुळे अण्णाभाऊंची ही लावणी विद्रोही जाणिवा घेऊन येणारी ठरते.

**जग बदल घालुनी घाव ! :**

अण्णाभाऊ साठे यांच्या ज्या निवडक रचना गाजल्या त्यात या रचनेचा समावेश होतो. १९४६

मध्ये लिहिलेल्या 'देशभक्त घोटाळे' या लोकनाट्यात ही रचना पाहावयास मिळते.अण्णाभाऊंच्या बंडखोर, विद्रोही प्रतिभेचा आविष्कार या गीतात झाला आहे. विद्रोही जाणिवा व्यक्त करणारी अण्णाभाऊंची ही एक महत्त्वाची रचना आहे. आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक क्रांतिकारी महापुरुष म्हणून ओळखले जातात. या गीताच्या पहिल्याच ओळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख करून अण्णाभाऊ आपल्या विचाराचा वसा आणि वारसा स्पष्ट करतात. अत्यंत उत्कट आणि नेमक्या भाषेत त्यांनी आपल्या मनातील विद्रोही आशय शब्दबद्ध केला आहे. त्यामुळेच ही रचना रसिकाच्या हृदयाला चटकन भिडते. त्याला विषमतेने, शोषणाने पीडित असलेले जग बदलण्याची प्रेरणा देते.

भारतीय समाजात हजारो वर्षांपासून सामाजिक विषमता अस्तित्वात आहे. वैदिक धर्मव्यवस्थेमुळे सुरुवातीला समाजात चार वर्ण अस्तित्वात आले. पुष्यमित्र शुंगाच्या काळात मनुस्मृतीच्या रचनेनंतर समाजात जातीयता आणि अस्पृश्यता निर्माण झाली. वर्णाच्या आणि जातीच्या आधारे माणसाची गुणवत्ता ठरवली जाऊ लागली. परिणामी भारतीय समाजात सामाजिक विषमता निर्माण झाली. या सामाजिक विषमतेच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बंड पुकारले. तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा जोतीराव फुले यांना गुरू, प्रेरणास्थान मानून त्यांनी वैदिक धर्मव्यवस्थेच्या विरुद्ध विद्रोह पुकारला. हे डॉ. आंबेडकरांचे विद्रोही कार्य अण्णाभाऊ साठे यांना प्रेरक वाटते. म्हणून ते प्रारंभीच ही प्रेरणा व्यक्त करतात.

"जग बदल घालुनी घाव | सांगून गेले मला भीमराव |
गुलामगिरीच्या या चिखलात | रुतून बसला का ऐरावत |
अंग झाडुनी निघ बाहेरी | घे बिनीवरती धाव ||
धनवंतांनी अखंड पिळले | धर्मांधानी तसेच छळले |
मगराने जणु माणिक गिळिले | चोर जाहले साव ||
ठरवुन आम्हा हीन कलंकित | जन्मोजन्मी करुनी अंकित |
जिणे लादुनी वर अवमानित | निर्मून हा भेदभाव ||
एकजुटीच्या या रथावरती | आरूढ होऊनी चल बा पुढती |
नव महाराष्ट्रा निर्मून जगती | करी प्रकट निज गाव ||"[४]

वैदिक धर्मव्यवस्थेमध्ये शूद्रातिशूद्र आणि महिला यांना त्यांच्या न्याय हक्क-अधिकारापासून हजारो वर्ष वंचित ठेवण्यात आले. अस्पृश्य, हीन, कलंकित म्हणून त्यांचा छळ करण्यात आला. परिणामी समाजातील बहुसंख्य वर्ग प्रगतीपासून खूप दूर राहिला. हजारो वर्ष गुलामीत जगत आला. या गुलामगिरीच्या अंधारातून, चिखलातून बाहेर पडण्याचे आवाहन अण्णाभाऊ करतात. धनवंतांच्या आणि धर्मांधांच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन विद्रोह केला पाहिजे. तरच सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित होऊ शकते.

भांडवलदार आणि धर्माचे ठेकेदार नेहमीच स्वतःच्या हिताची व्यवस्था बहुजनांवर लादत असतात.

सर्वसामान्यांचे शोषण करून हे शोषक 'साव' बनतात. त्यांच्या दृष्टीने 'माणूस' हे पैसा कमविण्याचे यंत्र बनते. त्यामुळे समाजात आर्थिक आणि सामाजिक विषमता निर्माण होते. ही विषमता झुगारून देऊन माणूस म्हणून जगण्याचे बळ प्राप्त करा, असा आशय घेऊन येणारी अण्णाभाऊंची ही रचना अत्यंत मर्मग्राही आहे. तिच्यात समाजपरिवर्तनाची तळमळ आहे, बंडखोरीची प्रेरणा आहे, संघटित होण्याचा संदेश आहे. अत्यंत कमी शब्दांमध्ये सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक असणाऱ्या विद्रोही जाणिवा या रचनेतून व्यक्त झाल्या आहेत.

प्रस्थापित शोषणव्यवस्था प्रदीर्घ काळापासून समाजात अस्तित्वात असल्यामुळे शोषित वर्गही तिचा वाहक बनलेला असतो. त्यामुळे हे व्यवस्था परिवर्तनाचे कार्य मोठे कठीण असते. सतत, निश्चयपूर्वक या विषमतावादी व्यवस्थेवर घाव घालावे लागतात. यासंदर्भात प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, "मुख्य म्हणजे विद्रोही परिवर्तनाची वाट फार मोठी व किचकट आहे; व्रतस्थपणे ती चोखाळायची असते व मोठ्या सहनशीलतेने तिचा मानसिक भार पेलायचा असतो. विद्रोही मानसिकतेचे व कार्यप्रवृत्तीचे हे अध्यात्म यथार्थपणे जाणून घेतले पाहिजे. त्यांचे अंतःपोषण करण्याची साधने व आधार शोधले पाहिजेत. 'जग बदल घालुनी घाव' हा, अण्णा भाऊ साठ्यांनी उद~घोषित केलेला डॉ. आंबेडकरांचा आदेश कालोचित आहेच; पण प्रदीर्घ काळाने दृढ करीत आणलेली जरठ प्रस्थापित व्यवस्था इतकी घट्ट व कडक झालेली आहे, की आपण सर्वांनी तिच्यावर अनेक घाव, अनेकदा व दीर्घकाळ घालूनच ती उत्तरोत्तर बदलता येईल."[५] गेली हजारो वर्षे अशाप्रकारचे प्रयत्न परिवर्तनाच्या लढ्यात चालू आहेत. म्हणून अण्णाभाऊंनी डॉ. आंबेडकरांचा 'घाव' घालण्याचा सांगितलेला वारसा परिवर्तनाच्या चळवळीने नीट समजून घेणे आवश्यक आहे.

**मुंबईची लावणी :**

लावणीतून अण्णाभाऊ विविध प्रकारचे अनुभव व्यक्त करतात. आशयाची विविधता आणि नावीन्यपूर्ण जाणिवा हे त्यांच्या लावणीचे विशेष आहेत. वर्गवादी आणि परिवर्तनवादी समाजजाणिवा घेऊन ह्या लावण्या रसिकांसमोर येतात. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे 'मुंबईची लावणी' होय. मुंबईमध्ये वावरताना अण्णाभाऊंनी तिथल्या सामाजिक पर्यावरणाचा बारकाईने अभ्यास केला. एक कामगार म्हणून त्यांना मुंबईचा चांगलाच अनुभव होता. अर्थात, एक चळवळीतील कार्यकर्ता, मार्क्सवादी लेखक आणि संवेदनशील माणूस म्हणून त्यांनी मुंबई समजून घेतली.

मुंबईतील आर्थिक विषमता, बेकारी, दारिद्रै, सट्टेबाजार, कामगारांच्या शोषणावर जगणारे श्रीमंत लोक, वेश्याव्यवसाय करून पोट भरणाऱ्या महिला, मुंबईतील रस्ते, महत्त्वाच्या बाजारपेठा इ. चित्रण या लावणीतून येते. मुंबईचे वर्णन करणारी पठ्ठे बापूराव यांची लावणी प्रसिद्ध आहे. पठ्ठे बापुरावांना मुंबईमध्ये सर्वत्र श्रीमंतीच दिसली. म्हणून डॉ. सदा क?हाडे म्हणतात, "पठ्ठे बापूरावांनी लावणीतल्या 'पवळा' ला सगळीकडे मजाच मजा असणारी मुंबई खरेदी करून दिली. परंतु अण्णाभाऊ साठेंना वर्गीय दृष्टीतून मुंबईच्या अंतरंगात असलेली कमालीची विषमता जाणवली. एकाच मुंबईत श्रीमंतांचे

आणि गरिबांचे, शोषकांचे आणि शोषितांचे भिन्न भिन्न जग वसत असल्याचे दिसले.

मुंबईत उंचावरी | मलबार हील इंद्रपुरी |
कुबेराची वस्ती तिथे सुख भोगती |
परळात रहाणारे | रातदिन राबणारे |
मिळंल ते खाऊन घाम गाळती |

असा विषमतेचा विषाद अण्णाभाऊ प्रदर्शित करतात. पठ्ठे बापुरावच्या लावणीत मुंबई नगरीचे फक्त लावण्य आहे. या उलट अण्णाभाऊंच्या घ्मुंबईची लावणीड्ढ नागरी जीवनातील विषमतेचे दर्शन असून शोषितांना आपले जिणे बदलून टाकण्यासाठी झुंज देण्यास प्रवृत्त करण्याची प्रेरणा आहे. वर्गीय तत्त्वज्ञानाचे सारतत्त्व इतक्या प्रभावीपणे लावणी या रचनाबंधातून क्वचितच व्यक्त झालेले आढळेल."[६] यावरून प्रस्तुत लावणीचे वाङ्मयीन मूल्य आपल्या लक्षात येते. अर्थातच, अण्णाभाऊ हे मार्क्सवादी लेखक असल्यामुळे त्यांचे संवेदनशील मन मुंबईतील शोषण, दारिद्रै, बेकारी पाहून अस्वस्थ होते. ही अस्वस्थता विद्रोही जाणिवेचे रूप घेऊन शब्दरूपाने व्यक्त होते.

मुंबईच्या समाजजीवनातील भीषण वास्तवच या लावणीतून व्यक्त झाले आहे. हे समाजवास्तव शब्दबद्ध करताना अण्णाभाऊ प्रत्येक चरणाचे आशयाच्या दृष्टीने दोन भाग करतात. चरणाच्या पहिल्या दोन ओळीत मुंबईचे वैभव सांगतात तर पुढच्या दोन ओळींमधून मुंबईतील भीषण वास्तव चित्रित करतात. त्यामुळे लावणीतून मुंबईतील जीवनसंघर्ष रसिकाला अनुभवायास मिळते. मलबार हिल ही श्रीमंतांची वस्ती तर परळमधील कामगार रात्रंदिवस राबणारे, एकीकडे ग्रँट, गोखले रोड सारखे मोठे रस्ते, तर गल्लीबोळात राहणारी माणसं, एकाबाजूला मोटार, रेल्वे आणि विमानं, तर दुस?्या बाजूला टांगा ओढून मरणारे घोडे, हातगाडी ओढणारे हमाल, श्रीमंतांसाठी चंदनवाडी, सोनापूर सारखे प्रसिद्ध मसणवटे तर बेवारशी लोकांसाठी समुद्र किनारा अशाप्रकारची विसंगती ते दाखवून देतात. यामुळे ही लावणी रसिकाच्या मनाची पकड घेते. मुंबईतील दारिद्र्याचे चित्र रेखाटताना अण्णाभाऊ लिहितात,

"लोअर परळ, चिंचपोकळी | वरळीच्या त्या जुन्या चाळी |
नाही नवा रंग त्यांच्या भिंतीवरती ||
नायगाव, धारावीला | माटुंग्याच्या शेजाराला |
बेकारांची पोरं घाणीमध्ये लोळती ||"[७]

दारिद्रै, बेकारी, अज्ञान, लाचारी, गुलामी हे मुंबईतल्या जगण्यातले वास्तव आहे. रोज पोटासाठी संघर्ष करणारी माणसं त्यांनी अनुभवली होती. अशा लोकांना घ्माणूसङ म्हणून जगण्याचा हक्क कधी मिळणार? हा खरा प्रश्न आहे. दारिद्र्यात जगणाऱ्या माणसांबरोबरच अण्णाभाऊंनी पोटासाठी शरीर विकणाऱ्या, वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या वेदनाही यालावणीतून मांडल्या आहेत. मोतीबाजार, शेअर बाजारात मोठे व्यवहार होतात, सट्टे लावले जातात तर त्याच मुंबईत दुसरीकडे फोरास रोडवर, गोलपिठा नाक्यावर महिला आपले शरीर विकून पोट भरतात. हे मुंबईतील अत्यंत वेदनादायी वास्तव

रसिकाला हादरून सोडणारे आहे.

अण्णाभाऊ साठे या लावणीत मुंबईतील शोषितांच्या दयनीय अवस्थेचे चित्रण करून थांबत नाहीत. ही दयनीय अवस्था बदलण्यासाठी, सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी ते लढाऊ भूमिका स्वीकारतात. शोषितांना क्रांतीचे आवाहन करतात. यादृष्टीने प्रस्तुत लावणीचा शेवट लक्षणीय आहे.

"लाल झेंडा घेऊन हाती | करायाला इथे क्रांती |
मजुरांची पिढी नवी पाऊल टाकती ||
अण्णा भाऊ साठे म्हणे | बदलुनी हे दुबळे जिणे |
होणार जे विजयी ते रण करती ||"[८]

कामगार हातात लाल झेंडा घेऊन क्रांतीसाठी संघर्ष करतो आहे, या क्रांतीमुळे हे दुबळे जगणे बदलणार आहे, शोषितांचा लढा यशस्वी होणार आहे असा आशावाद ते व्यक्त करतात. अर्थातच, ही लावणी शेवटच्या भागात विद्रोही जाणिवा अभिव्यक्त करते.

भारतीय समाजातील विविध विषय अण्णाभाऊंच्या कवितेचा विषय बनले आहेत. राष्ट्रीय एकात्मता, मानवतावाद, बंधुभाव समाजात असेल तरच कोणत्याही देशाची प्रगती होऊ शकते. अण्णाभाऊंच्या विद्रोही शाहिरीमागे हाच संदेश दडलेला आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि न्यायावर आधारलेली समाजव्यवस्था अस्तित्वात आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या जीवनजाणिवा घेऊन ही शाहिरी कविता साहित्याच्या रणांगणात उभी आहे.

**संदर्भसूची :**

१. साठे अण्णा भाऊ : शाहीर, मनोविकास प्रकाशन मुंबई, दु. आ. १९८५, पृ. ७-८.
२. डांगळे अर्जुन व इतर (सं.) : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प. आ. १९९८, पृ.क्र. ६१.
३. तत्रैव, पृ. ६२.
४. तत्रैव, पृ. ६३.
५. जाधव रा. ग. : निवडक समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन पुणे,प. आ. २००६, पृ. १५८.
६. साठे अण्णा भाऊ : शाहीर, उनि. पृ. ७.
७. डांगळे अर्जुन व इतर(सं.) : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मयउनि. पृ. ६५.
८. तत्रैव, पृ. ६५

◆◆◆

# आर्थिक विकासासाठी मानवी विकास : एक विकास

**पूजा सुभाष बारहाते**
संशोधक विद्यार्थी

**सारांश**

कोविडच्या महामारी नंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकासाचा दर अमेरिका, चीन व जपान जास्त आहे. कोविडची परिस्थिती भारताने योग्य हाताळल्यामुळे जगात भारताकडे बघण्याचा दृष्टीकोन बदल आहे. जगात जीडीपी वाढविण्याची स्पर्धा आहे. प्रत्येक देश आपल्या देशात उपलब्ध असलेल्या साधन सामग्रीचा पुरेपूर उपयोग करून आर्थिक विकास वाढविण्याचा प्रयत्न करत आहे. जगात भारतीय अर्थव्यवस्था जीडीपीच्या बाबतीत पाचव्या क्रमांकावर आहे, हे जरी सत्य असले तरी दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत भारत जगात 44 व्या क्रमांकावर आहे. तेव्हा भारताला दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. दरडोई उत्पन्न आणि मानवी विकास यांचा जवळचा सम संबंध आहे. 1997 मध्ये प्रकाशित झालेल्या जागतिक मानव विकास अहवालात पहिल्या क्रमांकावर कॅनडा पहिल्या, नार्वे दुसऱ्या क्रमांकावर तर 174 देशांच्या यादीत भारत 132 व्या क्रमांकावर होता. 2011 मध्ये जागतिक मानव विकास अहवालात 187 देशांमध्ये भारताचा 134 व क्रमांक होता. भारताला शिक्षण, निरोगी जीवनमान व उपजीविकेचे साधन यावर प्रगती करावी लागणार आहे. मानव विकासात शिक्षणाला फार महत्व आहे. भारत आजही साक्षरतेचे प्रमाण 80 टक्क्यांपेक्षा कमी आहे. यात ही केवळ पुस्तकी शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे. साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याबरोबर कौशल्यावर आधारित शिक्षण पद्धतीवर विशेष भर देण्याची गरज आहे. मानव विकासात शिक्षणासोबत आरोग्य सेवा व रोजगार तेवढाच महत्वाचा आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यावर शासनाने विशेष गोरान राबविल्यास मानव विकास मोठ्या प्रमाणात होऊ शकतो.

(**महत्वाचा शब्द:** आर्थिक विकास, मानव विकास इत्यादी)

## 1.0 प्रास्तावना (Inroduction)

भारत खेड्यांचा देश असून देशात खेड्यांची संख्या 6 लाकांपेक्षा जास्त आहे. देशाची आर्थिक वृद्धी घडून आली की, त्या देशातील मानव विकास आपोआप घडून येईल असे गृहीत धरले जाते, पण मानव विकासासाठी आर्थिक वृद्धी आवश्यक आहे मात्र ती पुरेशी नाही. उत्पन्नातील वाढ करण्याबरोबर आर्थिक विषमता, दारिद्रय, लिंगभाव असमानता इत्यादी गोष्टी दूर करण्याची गरज मानवा विकास अहवालात नमूद करण्यात आलेली आहे. संयुक्त राष्ट्रसंघ विकास (युएनडीपी) कार्यक्रमांतर्गत मानव विकास अहवाल प्रसिध्द केला जातो. पाकिस्तानचे अर्थशास्त्रज्ज्ञ **डॉ. महबूब –उल-हक** यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पातळीवरील पहिला मानव विकास अहवाल 1990 प्रसिध्द करण्यात आला आहे. यानंतर वार्षिक मानव विकास अहवालाला महत्व प्राप्त झाले आहे . 2011 च्या जनगणनेनुसार 83.35 कोटी म्हणजे 68.8 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात आहेत तर शहरी भागात राहणारी लोकसंख्या 37.71 कोटी म्हणजे 31.2 टक्के आहे. भारतात शहरी भागात राहणाऱ्या लोकांचा मानव विकास हा ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या मानव विकास निर्देशांकापेक्षा कमी आहे. जगातील काही विकसित देशांच्या लोकसंख्येत घट होत आहे. पण आशिया खंडातील विकसनशील बहुसंख्ये देशाच्या लोकसंख्येत वाढ होत आहे. 2011 चा संयुक्त राष्ट्र संघाचा अहवाल सांगतो की, जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी 49.58 टक्के महिला व 50.42 टक्के पुरुष आहेत. 2022 मध्ये पृथ्वीवर राहणाऱ्या 7.15 अब्ज लोकांपैकी 4 अब्ज पुरुष आणि 3.95 अब्ज महिला आहेत. भारताच्या लोकसंख्येपैकी महिलांचे प्रमाण 48.39 टक्के तर पुरुषांचे प्रमाण 51.61 टक्के आहे. 2022 मध्ये भारताच्या एकूण श्रमशक्तीत पुरुष सहभाग 63 टक्के तर महिलांचा सहभाग 37 टक्के व जीडीपीत पुरुष

सहभाग 82 टक्के व महिलांचा सहभाग 18 टक्के आहे. म्हणजे भारताच्या एकूण श्रमशक्तीत महिला व पुरुष सहभाग सारखा नाही. मानव विकासात महिला व पुरुषांचा विकास समान झाला पाहिजे.

चीन कोविडमुळे अडचणीत आल्याने जगात भारतीय अर्थव्यवस्थेकडे जागतिक अर्थव्यवस्थेचे इंजिन म्हणून पहिले जाते. जगातील देशांचे डोळे आणि कान भारताकडे आहेत. भारताने कोविडच्या काळामध्ये देशातील कोणताही व्यक्ती उपाशी राहणार नाही. यासाठी 2 लाख कोटी रुपये खर्च केला आहे. कोविड कालीन परिस्थिती भारताने चांगली हाताळल्यामुळे जगात भारताचा नावलौकिक झाला आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमय दरानुसार सप्टेंबर 2022 मध्ये जगातील 5 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. 2030 मध्ये जीडीपी 7 ट्रिलियन तर 2047 मध्ये 40 ट्रिलियन डॉलरची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भारताच्या जीडीपी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असली तरी दरडोई उत्पन्नात लोकसंख्या जास्त असल्यामुळे गतीने वाढ होत नाही. यावरून असे लक्षात येते की, देशाच्या जीडीपी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याबरोबर दरडोई उत्पन्नात त्याप्रमाणात वाढ झाल्यास मानव विकास अधिक होऊ शकतो.

आर्थिक विकास हा फक्त वस्तू व सेवा उत्पादनाशी निगडीत नसून समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये बदल घडून येण्याशी आहे. देशाच्या विकासाचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे अपेक्षित आहे. देशात रोजगार संधी वाढविणे, दारिद्रय कमी करणे, आर्थिक विषमता कमी करणे, समाजातील सर्व घटकांचे जीवनमान उंचावणे यालाच आर्थिक विकास म्हणतात. सध्या देशात दारिद्रय, आर्थिक विषमता कमी करण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे पण अपेक्षित यश मिळाले नाही. भारताचे शहरी आणि ग्रामीण असे दोन भाग पाडले जाते. देशातील शहरी भागाचा विकास ग्रामीण भागाच्या विकासापेक्षा जास्त झालेला आहे. तेव्हा ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

## 1.1 मानव विकास म्हणजे काय?

शिक्षण, निरोगी जीवन व उपजीविकेचे साधन या तीन बाबीचे एकत्रीकरण म्हणजे मानव विकास होय. मानवी विकासाची व्याख्या लोकांचे स्वातंत्र्य आणि संधी वाढविण्याची आणि त्यांचे कल्याण सुधारण्याची प्रक्रिया म्हणून केली जाते. मानव विकास म्हणजे खरे स्वातंत्र्य सामान्य माणसाने ठरवायचे आहे की, काय करावे, कसे जगावे.

## 1.2 संशोधन साहित्याचा आढावा

**परमा चक्रवृती** यांनी Economic & Political Weekly मध्ये खंड 58, अ.क्र. 50, 16 डिसेंबर 2023 विशेष लेख प्रकाशित केला. हा अभ्यास 1991 ते 2018 या कालावधीत भारतातील 15 प्रमुख राज्यांच्या मानवी विकासाचे मोजमाप करण्यासाठी वेळ मालिका मानवी विकास निर्देशांक (HDI) तयार करतो आणि वित्तीय जबाबदारी बजेट व्यवस्थापन कायदा (FRBMA) लागू होण्यापूर्वी आणि नंतर या मालिकेच्या अभिसरण मार्गाचे स्वतंत्रपणे परीक्षण करतो. ), 2003 मानवी विकासातील आंतरराज्यीय असमानता संपूर्ण राज्यांमध्ये शिक्षण आणि आरोग्य यासारख्या आवश्यक सेवांची असमान उपलब्धता दर्शवेल, ज्यामुळे क्षैतिज असमानता निर्माण होईल. आता भारताने 2000 ते 2015 पर्यंत सहस्राब्दी विकास उद्दिष्टांच्या युगातून प्रवास केला आहे आणि 2016 पासून 17 शाश्वत विकास उद्दिष्टांच्या अधिक परिवर्तनशील 2030 अजेंड्याकडे पाऊल टाकले आहे, तेव्हा भारतीय राज्यांसाठी मूलभूत मानवी विकास निर्देशकांच्या मार्गाचे विश्लेषण करणे हे वेळेवर आहे.

**मानव विकास निर्देशांक** अहवाल लेख एचडीआय हा एक संमिश्र निर्देशांक आहे. जो शिक्षण, आरोग्य आणि उत्पन्न विचारात घेतो. भारताच्या राष्ट्रीय सरासरीच्या एचडीआय 2008 मध्ये 0.467, 2010 मध्ये 0.519, 2012 मध्ये 0.554, 2014 मध्ये भारताचा एचडीआय 0.586 व 2018 मध्ये 0.645 होता. यावरून भारताचा एचडीआय मध्ये वाढ होत आहे. ही जरी समाधानाची बाब असली तरी भारताचा एचडीआय वाढीचा वेग वाढला पाहिजे.

### 1.3 संशोधनाची उद्दिष्टे

1. भारताच्या आर्थिक विकासाच्या गतीचा अभ्यास करणे.
2. भारतील मानव विकासाचा अभ्यास करणे.
3. शोध निबंधाच्या अनुषंगाने निष्कर्ष आणि शिफारशी करणे.

### 1.4 संशोधनाची गृहीतके

1. भारताचा जीडीपी वाढत आहे.
2. भारतील मानव विकास निर्देशांक वाढत आहे.

### 1.5 संशोधन पद्धती

सदरील संशोधन विषयाची माहिती द्वित्तीय स्त्रोतातून घेतलेली आहे. यात संदर्भ विविध पुस्तके, जिल्हा आर्थिक आणि सामाजिक समालोचन, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अहवाल, जागतिक बँक अहवाल, मानव विकास निर्देशांक अहवाल, रिझर्व्ह बँक अहवाल, आर्थिक सर्वेक्षण, केंद्रीय अर्थसंकल्प, मासिके, वेब साईट, वर्तमान पत्रे इत्यादींचा समावेश आहे.

### 1.6 देशाचा आर्थिक विकास आणि मानव विकास

#### 1. आर्थिक विकासाची स्थिती

जगात भारतीय अर्थव्यवस्थेकडे उभरती अर्थव्यवस्था म्हणून पहिले जाते. भारत हा एक विकसनशील देश असून ज्याने अलिकडच्या दशकात लक्षणीय आर्थिक वाढ अनुभवली आहे. 1947 मध्ये स्वातंत्र्यानंतर, भारत सरकारने आर्थिक विकासाचा एक कार्यक्रम सुरू केला, ज्यामध्ये राज्य-नेतृत्व नियोजन आणि अवजड उद्योगांमध्ये गुंतवणूक यावर लक्ष केंद्रित केले. तथापि, 1990 च्या दशकापासून, भारताने आर्थिक विकासासाठी बाजाराभिमुख दृष्टिकोनाकडे वाटचाल करण्यास सुरुवात केली आहे, ज्यामध्ये अर्थव्यवस्थेचे उदारीकरण, खाजगीकरण व जागतीकरण, परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे आणि निर्यातीला प्रोत्साहन देणे समाविष्ट होते. हा बदल पेमेंट बॅलन्सच्या संकटामुळे आणि पूर्वीचे राज्य-नेतृत्व मॉडेल दीर्घकाळ टिकणारे नव्हते याची जाणीव झाल्यामुळे झाला. या सुधारणांचा परिणाम म्हणून, भारताने 1991 ते 2020 दरम्यान GDP दर वर्षी सरासरी 7% च्या वाढीसह लक्षणीय आर्थिक वाढ अनुभवली आहे. या वाढीमुळे लाखो नोकऱ्यांची निर्मिती झाली आणि गरिबीत घट झाली आहे.

जगातील सर्वच देशात तेजी परिस्थिती नाही. जपान मध्ये मंदी आल्याने त्याच्या जीडीपीचा 4.23 वरून 4.19 ट्रिलियन डॉलर इतका खाली आला आहे. आता 4.55 ट्रिलियन डॉलर जीडीपीसह जर्मनी तिसऱ्या स्थानावर पोहचला आहे. क्रिसीलचे चीफ एकॉनोमिस्ट डी. के. जोशी यांच्या मते, जपानचा जीडीपी कमी होत असून भारताचा जीडीपी वाढत आहे. 2022 मध्ये तो 3,389 अब्ज डॉलर (283.15 लाख कोटी) वर गेला आहे. भारत सध्या जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. कोविडच्या संकटाने भारतासह जगातील अनेक मोठ्या देशांच्या अर्थव्यवस्थेला हादरा दिलेले आहे. त्यानंतर जगातील अनेक

देश आपली अर्थव्यवस्था रुळावर आणण्याचा प्रयत्न करत आहेत. अशातच भारताची अर्थव्यवस्था मात्र, वेगाने प्रगती करत असल्याचे सरकारने म्हटले आहे. कोविडनंतर जगात चीन व्यतिरिक्त इतर देशांचा पुरवठा साखळी स्थापन करण्याचा गरज भासू लागली आहे. यामुळे भारताच्या आर्थिक विकास दर पाहणे महत्वाचे आहे. तक्ता क्र. 1.1 वरून भारताच्या आर्थिक विकासाचा दर लक्षात येईल.

तक्ता क्र.1.1

भारताच्या जीडीपी वाढीचा दर

| अ.क्र. | वर्ष | वाढ(वास्तविक)(%) | अ.क्र. | वर्ष | वाढ(वास्तविक) (%) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2000 | 3.841 | 11 | 2010 | 8.498 |
| 2 | 2001 | 4.824 | 12 | 2011 | 5.241 |
| 3 | 2002 | 3.804 | 13 | 2012 | 5.456 |
| 4 | 2003 | 7.86 | 14 | 2013 | 6.386 |
| 5 | 2004 | 7.923 | 15 | 2014 | 7.41 |
| 6 | 2005 | 7.923 | 16 | 2015 | 7.996 |
| 7 | 2006 | 8.061 | 17 | 2016 | 8.17 |
| 8 | 2007 | 7.661 | 18 | 2017 | 7.168 |
| 9 | 2008 | 3.087 | 19 | 2018 | 6.982 |
| 10 | 2009 | 7.862 | | | |

तक्ता क्र. 1.1 वरून असे लक्षात येते की, 2000 मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर 3.8 टक्के होता तर 2018 मध्ये तो 6.9 टक्के झाला आहे. 2010 मध्ये सर्वात जास्त भारताचा आर्थिक दर राहिलेला आहे.

**2. सामाजिक विकास**

शिक्षण, आरोग्य, लोकसंख्यावाढीचा दर, लिंग विषयक विकास इत्यादींचा समावेश होतो. शिक्षण- ही अध्ययन सुकर कारणे, किंवा कौशल्य, मुल्ये, विश्वाश, व सवयींच्या प्राप्तीची प्रक्रिया आहे. आरोग्य – शारीरिक, मानसिक, सामाजिक दृष्टीने व्यवस्थित आणि रोगमुक्त असण्याची अवस्था म्हणजे आरोग्य होय. **सामाजिक विकासाचे निर्देशक (Social Indicators of Development):- लोकसंख्या हा महत्वाचा घटक आहे.** जगात सर्वात जास्त लोकसंख्या असणारे देश चीन, भारत, संयुक्त अमेरिका, इंडोनेशिया, ब्रान्झील व पाकिस्तान हे आहेत. जगात विकसनशिल देशांची लोकसंख्या विकसित देशापेक्षा जास्त वाढत आहे. विकसनशील चीन व भारत देशांचा जगात सर्वात जास्त लोकसंख्येच्या बाबतीत पहिला व दुसरा क्रमांक आहे.

तक्ता क्र.1.2

जगात लोकसंख्या व प्रमाण जास्त असणारे देश (2011)

| वर्ष | लोकसंख्या(कोटी) | टक्के |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| चीन | 140 | 18.47 |
| भारत | 133 | 17.83 |
| संयुक्त अमेरिका | 33 | 4.40 |
| इंडोनेशिया | 23 | 3.83 |
| ब्राझील | 21 | 2.84 |
| पाकिस्तान | 20 | 2.64 |

**स्रोत :- world population report**

तक्ता 1.2 वरून असे दिसून येते की, जगात सर्वात जास्त लोकसंख्या असणार चीन, भारत संयुक्त अमेरिका, इंडोनेशिया, ब्राझील व पाकिस्तान या देशाचा असा क्रम लागतो.

**3. मानवी विकासात वाढ**

मानव विकास निर्देशांक (HDI) तयार करण्यापूर्वी, देशाच्या विकासाची पातळी सामान्यत: आर्थिक आकडेवारी, विशेषतः सकल राष्ट्रीय उत्पन्न (GNI) वापरून मोजली जात असे. UN चा असा विश्वास होता की केवळ आर्थिक उपाय विकासाचे मूल्यांकन करण्यासाठी अपुरे आहेत कारण ते नेहमी देशाच्या सरासरी नागरिकांच्या जीवनाची गुणवत्ता दर्शवत नाहीत. 1990 मध्ये इतर घातक विचारात घेण्यासाठी आणि मानवी विकासाचे अधिक चांगले मूल्यमापन देण्यासाठी एचडीआयची ओळख करून दिली. एचडीआय तीन क्षेत्रांमध्ये विकास मोजतो: आरोग्य, शिक्षण आणि राहणीमान आरोग्य घटकाचे मूल्यमापन जन्माच्या आयुर्मानानुसार केले जाते. शिक्षण हे प्रौढांनी पूर्ण केलेल्या शाळेच्या सरासरी वर्षांच्या संख्येने तसेच मुलांनी पूर्ण केलेल्या शाळेच्या वर्षांच्या संख्येने मोजले जाते. जीवनमानाचे मूल्यमापन दरडोई GNI द्वारे केले जाते, जे देशातील प्रति व्यक्ती वार्षिक राष्ट्रीय उत्पन्नाचे अंदाजे मोजमाप प्रदान करते. हे तीन उपाय एकच एचडीआय स्कोअर तयार करण्यासाठी एकत्र केले जाते. मानव विकास अहवालांमुळे जागतिक पातळीवर मानव विकासासंबंधी समस्या पद्धतशीर अभ्यासास सुरुवात झाली. त्यांनी मानव विकासाच्या बाबतीत देशादेशातील आणि स्त्री व पुरुषांतील प्रचंड प्रमाणावरील विषमता, तसेच विकासापासून वंचित असणाऱ्यांचे प्रमाण मोठे प्रमाण प्रकाशस्त आणले आहे. मानव विकासाच्या बाबतीतील समस्यांची ओळख तर त्यांनीं जगाला करून दिलीच पण त्याच बरोबर त्या सोडवणूकिची दिशा स्पष्ट केली. मानवी विकासाची व्याख्या लोकांचे स्वातंत्र्य आणि संधी वाढवण्याची आणि त्यांचे कल्याण सुधारण्याची प्रक्रिया म्हणून केली जाते. मानवी विकास म्हणजे खरे स्वातंत्र्य सामान्य माणसाने ठरवायचे आहे. अर्थशास्त्रज्ञ महबूब उल हक यांनी मानवी विकासाची संकल्पना विकसित केली होती.

मानव विकास अहवाल हा संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम (युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम – यूएनडीपी) अंतर्गत प्रसिद्ध केला जातो. 1990 मध्ये प्रसिद्ध झालेला जागतिक पातळीवरील पहिला मानव विकास अहवाल या संस्थेचे कर्मचारी व संस्थेबाहेरचे तज्ज्ञ पाकिस्तानचे अर्थशास्त्रज्ञ महबूब उल – हक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केला. या मानव विकास अहवालाने वार्षिक अहवालाच्या मालिकेस सुरुवात झाली आहे. यापुर्वी वार्षिक मानव विकास अहवाल तयार केला जात नव्हता. 2016 मध्ये प्रसिद्ध झालेला मानव विकास अहवाल हा पंचविसावा जागतिक मानव विकास अहवाल आहे. 1990 ते 2016 या काळात 2012 वर्ष वगळता आणि 2007 व 2008 या वर्षांसाठीचा एकत्रित अहवाल सोडून प्रत्येक वर्षी नव्याने

मानव विकास अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. मानव विकास निर्देशांकात भारत 191 देशांपैकी 132 व्या क्रमांकावर आहे. 2020 च्या अहवालात, 189 देश आणि प्रदेशांमध्ये भारत 131 व्या क्रमांकावर आहे.

**4. लिंगभाव विकास निर्देशांक :** भारतात पुरुष आणि महिला मानव विकासात फार मोठी असमानता आहे. पुरुष आणि महिला साक्षरता दर अनुक्रमे 82 आणि 65.5 टक्के आहे. पुरुष आणि महिला रोजगार व जीडीपीतील वाटा यामध्ये ही फरक आहे. लिंगभाव विकास निर्देशांक हा मानव विकास निर्देशांकातीलच घटक निर्देशंकाचा वापर करून आरोग्य, ज्ञान आणि राहणीमान या मानव विकासाच्या तीन मुलभूत परिमाणातील स्त्री व पुरुष असमानता विचारात घेऊन मानव विकासातील लिंगभाव अंतराचे मापन करतो. लिंगभाव विकास निर्देशांक हा पुरुषांच्या तुलनेत स्त्रीया किती मागे पडलेल्या आहेत, हे स्पष्ट करतो.

**5. असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक :** असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक प्रत्येक परिमाणाच्या सरासरी मूल्याचे त्याच्या असमानतेच्या पातळींनुसार वटवणूक करून देशाची आरोग्य, ज्ञान आणि उत्पन्न यांतील सरासरी कामगिरी आणि कशा प्रकारे त्या कामगिरीचे देशाच्या लोकांमध्ये वितरण केले जाते, त्याचे एकत्रिकरण करतो. अशा प्रकारे असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक ही मानव विकासाची वितरण-संवेदनशील सरासरी पातळी होय. पूर्ण समानतेच्या स्थितीत असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक हा मानव विकास निर्देशांकाबरोबर असतो. असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक आणि मानव विकास निर्देशांक यांतील फरक म्हणजे असमानतेचा मानव विकास खर्च होय.

**6. लिंगभाव असमानता निर्देशांक :** लिंगभाव असमानता निर्देशांक हा असमानता निर्देशांक आहे. तो माता मृत्यूदर प्रमाणाने मापन केलेले पुनरुत्पादक आरोग्य, राष्ट्रीय कायदेमंडळात स्त्रियांनी धारण केलेल्या जागांचे प्रमाण व कमीत कमी माध्यमिक शिक्षण घेतलेल्या 25 किंवा त्यांपेक्षा जास्त वयाच्या प्रौढ स्त्री व पुरुषांच्या प्रमाणाने मापन केलेले सबलीकरण आणि 15 व त्यांवरील स्त्री व पुरुषांच्या श्रमदल सहभाग दराने मापन केलेले व श्रम बाजार सहभागाने व्यक्त केलेले आर्थिक स्थान या मानव विकासाच्या तीन महत्त्वाच्या पैलूतील असमानतेचे मापन करतो. या निर्देशांकाने 159 देशांतील स्त्रीयांची स्थिती व मानव विकासाच्या प्रमुख क्षेत्रांतील लिंगभाव अंतरावर प्रकाश टाकला आहे.

**7. बहुआयामी दारिद्रय निर्देशांक :** बहुआयामी दारिद्रय निर्देशांक मानव विकास निर्देशांकाच्याच आरोग्य, ज्ञान व राहणीमान या तीन ही परिमाणाच्या बाबतीतील वंचितता शोधतो आणि बहुआयामी दरिद्री (भारित निर्देशकाच्या 33 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त वंचिततेतील व्यथा) असलेल्या लोकांची संख्या क-ज्याच्याशी बिश्लेषत: गरीब कुटुंबे झगडतात त्या भारित वंचिततेची संख्या दर्शवितो. हा निर्देशांक 2010 च्या मानव विकास अहवालात प्रथम दिलेला आहे.

**निष्कर्ष आणि शिफारशी**

चीन कोविडमुळे अडचणीत आल्याने जगात भारतीय अर्थव्यवस्थेकडे जागतिक अर्थव्यवस्थेचे इंजिन म्हणून पहिले जाते. जगाच्या भारताकडून फार अपेक्षा आहेत. भारताने कोविडच्या काळामध्ये देशातील कोणताही व्यक्ती उपाशी राहणार नाही. यासाठी 2 लाख कोटी रुपये खर्च केला आहे. कोविड कालीन परिस्थिती भारताने चांगली हाताळल्यामुळे जगात भारताचा नावलौकिक झाला आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमय दरानुसार सप्टेंबर 2022 मध्ये जगातील 5 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. 2030 मध्ये जीडीपी 7 ट्रिलियन तर 2047 मध्ये 40 ट्रिलियन डॉलरची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. असे जरी झाले तरी दरडोई उत्पन्नात वाढ झाल्याशिवाय मानव विकास होऊ शकत नाही. तेव्हा दरडोई उत्पन्न वाढीसाठी शासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे.

जगात 2016 मध्ये प्रसिद्ध झालेला मानव विकास अहवाल हा पंचविसावा जागतिक मानव विकास अहवाल आहे. 1990 ते 2016 या काळात 2012 वर्ष वगळता आणि 2007 व 2008 या वर्षांसाठीचा एकत्रित अहवाल सोडून प्रत्येक वर्षी नव्याने मानव विकास अहवाल प्रसिद्ध करण्यात येत आहे. 2020 च्या अहवालात, 189 देश आणि प्रदेशांमध्ये **भारत** 131 व्या क्रमांकावर **आहे**. जगात मानव विकास निर्देशांकात फारच मागे आहे तेव्हा शासनाने मानव विकास वाढविण्यासाठी शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यासाठी विशेष धोरण राबवाली पाहिजेत.

**संदर्भ :-**

1. Indian Economy, Datt and Sundaram, Chand Publishing, Chand & Company Ltd, New Delhi 110055

2. United Nations Development (UNDP), Human Development Report 2016 to 2020

3. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाचे संकेतस्थळ

3. महिला नेतृत्वाखाली विकासाद्वारे राष्ट्राचे सक्षमीकरण, मेनका संजय गांधी, योजना मासिक, वर्ष 46, अंक 3, ऑक्टोम्बर 2018 पृष्ठ क्र. 3-11

4. The World Economic Forum, Global Gender Gap Report 2021

5. W20 आणि भारतीय महिलांची स्थिती, अविनाश कुलकर्णी, अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रेमाषिक, खड 47, अंक 1, एप्रिल -मे - जून 2023, pp. 3-11

6.Beena Pandey, Moving ahead for women empowerment in G20 DIGEST,April 2020

7. Jain K.R. Dhyani, Anuja, Covid-19 Impact on the Indian Economy:A review of Uttarakhand's 2020

8. आभा गोयल, मानव विकास, कैलास पुस्तक सदन, भोपाल

8. https://worldbank.org

9. https://RBI

10. https://www.statista.com

◆◆◆

# समकालीन साहित्य आणि पर्यावरणीय समस्या

**प्रा.मनीषा सु. नेसरकर**
मराठी अध्ययन व संशोधन विभाग
राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगाव, कर्नाट

खरंतर अन्न, वस्त्र, निवारा याबरोबर समतोल पर्यावरण ही माणसाची मूलभूत गरज आहे. पण मानवाने याच्याकडे दुर्लक्ष केले आहे आणि त्यामुळेच सर्व पर्यावरण प्रचंड प्रमाणात प्रदूषित झाले आहे आणि जीवनावर मूलगामी परिणाम करणाऱ्या समस्यांना माणसाला वारंवार तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे संपूर्ण मानव जात धोक्यात आली आहे. ही समस्या जागतिक बनली आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातून जागतिक पातळीवर यावर संशोधन सुरू आहे. अनेक चर्चासत्रे वगैरेंचे आयोजन करून या मानवी जीविताला पोखरून काढणाऱ्या समस्येवर उपाय शोधण्याचे प्रयत्न जागतिक पातळीवर सुरू आहेत. याला साहित्यविश्वही अपवाद राहिलेले नाही.

**समकालीन साहित्य आणि पर्यावरणीय समस्या** या विषयाचा अभ्यास करण्यापूर्वी पर्यावरण, पर्यावरणाची समस्या म्हणजे काय ते नेमकेपणाने स्पष्ट करणे गरजेचे आहे.

पर्यावरण ही या काळातील बहुचर्चित अशी संज्ञा असून चिंतेचा आणि संशोधनाचा प्रमुख विषय बनली आहे. पर्यावरण ही अत्यंत व्यापक अशी संज्ञा आहे तिचे स्वरूप अंतरविद्याशाखीय असून जवळजवळ सर्व शास्त्रांशी त्याचा संबंध आहे. पर्यावरणाविषयी अनेक अभ्यासकांनी जगभर अभ्यास, संशोधन केलं आहे. यातील काही अभ्यासकांची मते इथे अभ्यासली आहेत. त्यातून पर्यावरण ही संकल्पना नेमकेपणाने स्पष्ट होईल.

**डॅनियल डी चिरास**

"जैविक व अजैविक घटक यांच्यातील परस्पर क्रियांचा अभ्यास करणारे पर्यावरण हे शास्त्र आहे. पर्यावरणातील हवा, पाणी, सूक्ष्मजीव तसेच भौतिक, रासायनिक संयुगे यांचा परस्परक्रियांवर परिणाम झाल्याचा दिसतो." १.

**जॅकी स्मिथ**

"सजीवाने अनुभवलेल्या प्राकृतिक, रासायनिक व जैविक परिस्थितीची गोळाबेरीज म्हणजे पर्यावरण. त्यात हवामान, मृदा, जल, प्रकाश आसपासच्या वनस्पती, सजीवांच्या स्वतःच्या जातीचे सदस्य तसेच इतर सजीव जातीचे सदस्य यांचा समावेश होतो. पर्यावरणाची स्थिती दिवसाची वेळ ऋतू हवेची स्थिती व अन्य घटकांनुसार बदलते." २

**जॉन विथो**

"Environment is the sum total of the conditions within which an organism lives."३

डॅनियल डी चिरास यांच्यामते पर्यावरण हे जैविक व अजैविक घटक यांच्यातील परस्पर क्रियांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

जॅकी स्मिथ यांच्या मते सर्व सजीवांनी अनुभवलेल्या प्राकृतिक, रासायनिक व जैविक गोष्टींचा समावेश पर्यावरणामध्ये होतो.

जॉन विथो च्या मते जीवसृष्टी ज्या परिस्थितीत जगते ती एकंदरीत परिस्थिती म्हणजे पर्यावरण.
वरील अभ्यासातून पर्यावरण या संकल्पनेविषयी पुढील गोष्टी लक्षात येतात.

- निसर्गातील पाणी, अग्नी, वायू, प्राणी, सृष्टी, वनस्पती सृष्टी, जीवजंतू, शेती, नदी- नाले, डोंगर-दऱ्या जंगल, हवा अशा सजीव व निर्जीव दोन्ही गोष्टींचा समावेश पर्यावरणात होतो.
- पर्यावरण सजीवांना प्राकृतिक आणि जैविक शक्तीमुळे कार्यान्वित करते.
- पर्यावरण व्यक्ती अथवा त्यांचे समूह, त्यांचे अस्तित्व, विकास यांच्यावर परिणाम करते.

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात खूप मोठी प्रगती केली पण त्याचबरोबर नैसर्गिक पर्यावरणात हस्तक्षेप करून अनेक जीवघेण्या समस्याही निर्माण केल्या. निसर्गाने मानवाला साधन संपत्तीचा मोठा साठा दिला आहे परंतु मानवाकडून तिचा अतिप्रमाणात वापर झाला आणि यातूनच निसर्गचक्र पार बिघडून गेले; जीवन धोक्यात आले. माणसाला जाणवू लागले की या पर्यावरणाच्या ऱ्हासाला पर्यायाने मानवी जीवनाच्या ऱ्हासाला आपणच जबाबदार आहोत; तेव्हा पर्यावरण संवर्धनाची जाणीव जागृत झाली यातून पर्यावरणवादी विचारसरणीचा जन्म झाला. यासाठी अनेक उपक्रम जागतिक पातळीवर राबवले जाऊ लागले याचाच एक भाग म्हणून किंवा माणसाच्या अभिव्यक्तीची गरज म्हणून साहित्यात देखील याचा अंतर्भाव होऊ लागला.

**पर्यावरणाचे प्रदूषण आणि त्याचे परिणाम**

तथाकथित विकासामुळे आज खेड्यातील माणूस जगाशी जोडला गेला आहे. तर दुसरीकडे तो पर्यावरणापासून, निसर्गाच्या सानिध्यापासून दूर गेला असल्याचे दिसून येते. यांत्रिकीकरणामुळे पारंपरिकतेला छेद मिळाला पारंपारिकतेने जीवसृष्टीला एकमेकाची मदत होत होती परंतु यांत्रिकीकरणामुळे, नैसर्गिक साधन संपत्तीच्या अतिवापरामुळे त्याला हानी पोहोचू लागली, पर्यावरणाचे नुकसान होऊ लागले आहे. मानवाने विकास घडवून आणत असताना नैसर्गिक संपत्तीचा नाश केला. डोंगरांचे सपाटीकरण झाडांची मोडतोड आणि काँक्रिटीकरण स्वार्थासाठी जंगली प्राण्यांची केली जाणारी शिकार, जंगलतोड, समुद्र नद्या जमीनीवर अतिक्रमण, धार्मिक यात्रा व कर्मकांड, तेलगळती, संगणक, मोबाईल, दूरदर्शन, रेडिओ इत्यादी प्रकारच्या उपकरणातून प्रचंड प्रमाणात निर्माण होणारा ई कचरा त्यामुळे प्रदूषणाने आज जगात अक्राळ-विक्राळ रूप धारण केले आहे. ज्याप्रमाणे नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर होतो त्या प्रमाणात ती पुन्हा निर्माण होत नाही तिला हजारो वर्ष लागतात आणि त्यामुळे मानव आणि पर्यावरण यांच्यातील गुणोत्तर प्रमाण समान न राहता कमी जास्त होताना दिसते. शिवाय पर्यावरण प्रचंड प्रमाणात प्रदूषितही होते आहे. औद्योगिक कारखान्याद्वारे बाहेर पडणारा प्रदूषित वायू, खनिजांच्या ज्वलनामुळे होणारे दूषित वातावरण, कार्बन डाय ऑक्साईडचे वाढते प्रमाण या सगळ्यामुळे पृथ्वीच्या वातावरणातील तापमान वाढत आहे. अन्नधान्यासाठी उपलब्ध असणारे शेत जमिनीचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे. लोकसंख्या वाढीमुळे उद्योगधंदे, शाळा, धरणे, विविध प्रकल्प, तसेच राहण्यासाठी जागा यामुळे जमिनीचे क्षेत्र कमी होत असून त्यातूनच अन्नधान्याची टंचाई निर्माण होत आहे वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीमध्ये जास्तीत जास्त उत्पादन घेतले जावे म्हणून विविध कीटकनाशकांचा फवारा, रासायनिक खते यांच्यामुळे शेतीचा पोत बिघडला आहे, याशिवाय ओझोनचा ऱ्हास, आम्लपर्जन्य, जैवविविधतेचा ऱ्हास, चक्रीवादळ, भूकंप, सुनामी, पूर, अवर्षण, जंगलातील वणवा, यासारख्या नैसर्गिक

आपत्तींना माणसाला सामोरे जावे लागत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे मानवाला विविध अशा असाध्या आजारांना सामोरे जावे लागते आहे, पाऊस कमी झाला आहे. ,वन्यजीवांची ससेहोलपट होते आहे. , त्यामुळे ते स्थलांतर करीत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल पूर्णपणे ढासळला आहे.

निसर्गचक्र पार बदलून गेले आहे दुष्काळी परिस्थिती, अवर्षण हे जीवनाचा अविभाज्य घटक बनून गेले आहेत याला कारण पर्यावरणाचा माणसाने केलेला गैरवापर, शेतकऱ्याचे शेतीचे चक्र निसर्गचक्राशी बांधलेले असते आपल देश शेतीप्रधान त्यात आपला बहुतांशी शेतकरी शेतीसाठी अनियमित पावसावर अवलंबून आहे. याचबरोबर पावसाच्या अनियमितपणामुळे जनावरांच्या वैरणकाडीचा प्रश्नही निर्माण होतो आणि हा प्रश्न इथेच संपत नाही तर त्याचे माणसातील संबंध, गावागावातील संबंध, अर्थकारण, राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक जीवनयावर दूरगामी परिणाम होतात.

त्यामुळे पर्यावरणाचे योग्य व्यवस्थापन हा मानवी जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला आहे पर्यावरणाचे योग्य व्यवस्थापन करून मानवी जीवनातील संभाव्य धोके टाळण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना करण्याची गरज आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रातून पर्यावरणीय समस्यांचा अभ्यास करून जागृती व उपाययोजनांसाठी प्रयत्न चालले आहेत. साहित्यही याला अपवाद ठरू नये.

**साहित्यातून पर्यावरणीय समस्यांचा शोध**

साहित्यात तत्कालीन जीवनाचे प्रतिबिंब पडणे ही अपरिहार्य गोष्ट आहे. किंबहुना ते पडणे अपेक्षित आहे. साहित्य काळाला सोबत घेऊन प्रवाही होत असते. त्यामुळे त्या त्या काळात मानवी जीवनात घडणारी स्थित्यंतरे ही साहित्यातून प्रतिबिंबित होताना दिसून येतात. यावर साहित्य जगतात बरेच चिंतन झालेले आपण सर्वांनी पाहिलेले आहेच यातून कधी कधी मानवी समस्यांवरील उत्तरे मिळण्यासही मदत होते.

या विषयांतर्गत आपल्याला मानवी जीवनाला ज्या पर्यावरणीय समस्यांनी ग्रासले आहे त्या साहित्यात कशा पद्धतीने आल्या आहेत; त्यातून त्या समस्यांवर काही ठोस उपाय भेटण्याची शक्यता आहे का याचा आहे शोध घ्यावयाचा आहे.

अगदी प्राचीन काळापासून साहित्यात पर्यावरणीय समस्यांचा उल्लेख अधून मधून आलेला दिसतो. सोळाव्या शतकात संत तुकाराम महाराजांनी त्याकाळी पडलेल्या भीषण दुष्काळाचे वर्णन केले आहे. समर्थ रामदास ही या काळातील दुष्काळाची भयावहता आपल्या काव्यातून व्यक्त

ऐसी बहुतेक मेली   एक दोन मुलं उरली
तीही दैन्यवाणी झाली   आपुले मातेवाचुनी
ऐसे अवर्षण आले    तेणे घरची बुडाले....

छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरणविषयक जाणीव किती थोर होती ही आज्ञापत्रामध्ये दिसते. महाराज म्हणतात, "झाडे वर्ष दोन वर्षानी होतात असे नाही. रयतांनी ही झाडे लून लेकरांसारखी बहुत काळ जातं करून वाढविली.. या वृक्षाच्या अभावी हानीही होत्ये, याकरिता हे गोष्टी सर्वथैव होऊ ना द्यावी. कदाचित एखादे झाड बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असले तरी त्याचे धान्यूयास राजी करून घेऊन त्याचे संतोष जोडून तोडून न्यावे. बलात्कार सर्वथा ना करावा."५

१९८५ साली मराठवाड्यात मोठा दुष्काळ पडला होता. शेतकऱ्यांच्या हातून दोन्ही वेळची पिकं गेली होती. पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला होता. त्यावेळी छावण्यात गुरांना दाखल करून

शेतकऱ्यांची जगण्याची झुंज सुरू राहते. कृष्णराव भालेकरांची **बळीबा पाटील आणि १८७७ सालचा दुष्काळ** ही कादंबरी या दुष्काळावर त्रोटक का असेना चर्चा करते. धनुर्धारी यांची **पिराजी पाटील** ही कादंबरी १८७५ ते १९०९ या काळातील दुष्काळामुळे शेतकरी जीवनाची झालेली परवड व्यक्त करते.

झडीचा पाऊस हा हवामान बदलाचाच परिणाम आहे. **झडझुंबड** कादंबरीमध्ये झडीचा पाऊस येण्याआधी पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पाटपन्हाळा गाव झडीचा पाऊस सुरू झाल्यानंतर वैतागून जातो. झड लागल्यावर मानवाची उडणारी तारांबळ; जनावरांचे होणारे हाल; चाऱ्याचा प्रश्न; पाणी असूनही निर्माण होणारा पिण्याचा पाण्याचा प्रश्न; त्यामुळे होणारे विविध आजार; अशा परिस्थितीत एकमेकांना सहकार्य करण्याऐवजी काही व्यक्तींमध्ये गरीब गरजूंना लुटण्याची भावना अधिक बळवताना दिसते. कृष्णात खोटणी **झडझुंबड** मध्ये याचे बारीक सारीक बारकाव्यांसहित प्रत्ययकारी चित्रण केले आहे.

**झाडाझडती** या विश्वास पाटलांच्या कादंबरी मध्ये धरणग्रसतांच्या जीवनातील कठोर सत्य मांडले आहे. त्यांची विकल मानसिकता, त्यांच्या मनाची घालमेल, पुनर्वसन, सरकारचे धोरण त्याचे धरणग्रस्तनच्या जीवनावर होणारे दूरगामी परिणाम त्यामुळे संपूर्ण कुटुंबाची होणारी वाताहात याचे सूक्ष्म चित्रण ते करतात. **तहान** या सदानंद देशमुख यांच्या कादंबरीमध्ये भयानक दुष्काळामुळे आणि पाण्याच्या अभावामुळे झालेली शेतकऱ्याची अवस्था मांडलेली आहे. त्यांच्याच **बारोमास** या कादंबरी मधील शेतकरी निसर्गाचा लहरीपणा दुष्काळ अवेळी पडणारा पाऊस रासायनिक खते, बी-बियाणांचा शेतीमध्ये वापर, दाण्यांना लावलेल्या विषारी कीटकनाशकामुळे ते दाणे खाणारी पाखरं मरून पडतात. कर्जबाजारीपणाला विटून शेतकरी आत्महत्या करतो. अशा पर्यावरणाशी संबंधित अनेक बाबी यातून आलेल्या आहेत. या साऱ्याच्या एकंदरीत परिणामासाठी या कादंबरीतील पुढील दोन ओळी पाहणं योग्य होईल. "भयाण गावं, पाण्यासाठी खाय खाय तापत असणारी शेतं, सगळा ग्रामीण भाग. गाव आलं, खेडं आलं, गाडी थांबली की बाहेर दिसणारी सारख्याच वखवख चेहऱ्यांची बायका माणसं त्यांची झडणारी शरीर, खपाटी गेलेली पोटं, बसलेली गालफाडं........"(पृष्ठ 275) महेश निकम यांच्या **भोत** मध्ये देशभरात मोठ्या प्रमाणात औद्योगिक प्रकल्प आकाराला येत आहेत; खेड्यांचे नागरिकरण होत आहे आणि दुसरीकडे निराधार वर्गाचा जन्म होत आहे. असे होत असेल तर या विकासाला काहीही अर्थ राहणार नाही. विकासात्मक योजना आखताना पर्यावरणाचा पर्यायाने मानवी जीवनाचा विचार प्रामुख्याने होणे गरजेचे आहे हा मौलिक विचार या कादंबरीत मांडला आहे. अरुण साधू **शापित** या कादंबरीमध्ये १९७२ च्या दुष्काळात होरपळणाऱ्या माणसाच्या जगण्याचं भयानक चित्र उभ करतात. पावसाच्या अभावामुळे गावातली माणसं पाऊस पडत नाही त्या पाठीमागची कारणं शोधू लागतात. बऱ्याचदा यातून अंधश्रद्धेलाही खतपाणी मिळतं. **साखरफेरा** ही मोहन पाटील लिखित कादंबरी. ऊस पिकासाठी मुबलक पाणी, खत यांची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासते. उसासाठी सतत देण्यात येणारे पाणी आणि रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर; शिवाय वर्षानुवर्ष एकच उत्पादन घेण्यात येत असल्यामुळे जमीन नापीक बनत आहे; जमिनीचा पोत बिघडतो आहे. हे भयंकर सत्य लेखकाने समोर आणले आहे. बाबाराव मुसळे आपल्या कादंबऱ्यांमधून पश्चिम आणि मध्य विदर्भ भागातील पावसाच्या अभावी निर्माण झालेली शेतीविषयक स्थिती-गती, शेतकऱ्याचे अडाणीपण हेही बऱ्याचदा पर्यावरणाचा समतोल ढासळण्यास कारणीभूत ठरतं. ही सांगतात. **हल्या हल्या दूध दे** या कादंबरीत पाऊस न पडण्याची कारण मीमांसा लोक करत असतात त्यात अमेरिकेने भारतावर बॉम्ब टाकला त्याच्याने पाण्याची वाफ होऊन ढग तयार झाले तरी बी पाऊस पडेना हे

शेतकऱ्यांना पटतं. दुनव्यात पाप लय झालं पोऱ्ह अन पोऱ्ही ओळखू येतेनात. माय भयनीची वळख राह्यली नाही, म्हणून असं व्हायलं. हे ही लोकांना पटतं. पण जेव्हा शिकले सवरलेले म्हणतात, लोकाह्यन झाड तोडले, जंगल तोडले त्याच्यान ढगायले थंड हवा भेटत नाही. थंड हवा भेटली नाही त वाफचं पाणी व्हत नाही. मनून पाणी पडत नाही. ही गोष्ट लोकांना पटत नाही……..." ६

महेश निकम यांच्या **भूत** कादंबरीत गावाचा विशेष आर्थिक क्षेत्रामुळे(sez) होत जाणारा विकास, एमआयडीसी कंपन्या, कारखाने, हॉटेल्स, धाबे, चित्रपटगृहे आणि याचा परिणाम म्हणून शिक्षण व्यवस्थेचे झालेले बाजारीकरण आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास त्याचबरोबर वृक्षतोड, पाणी प्रश्न या साऱ्यांचा एकंदरीत मानवी जीवनावर होणारा परिणाम याचे प्रत्ययकारी चित्रण येते. आनंद विंगकर लिखित **अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट** मध्ये निसर्गाच्या रुद्रावताराने अचानक निर्माण होणाऱ्या अवकाळी परिस्थितीमुळे यातील यशवंता नावाच्या शेतकऱ्याचे जीवन उध्वस्त होऊन जाते. सततचा दुष्काळ, नापिकी यामुळे सावकाराचे कर्ज दिवसेंदिवस वाढत जाते त्याच गोष्टीचा फायदा घेऊन शंकर सावकार कर्जाच्या मोबदल्यात शेतीची खरेदी मागतो. आपलं शेत आता जाणार या भीतीने यशवंत आपल्या बायकोला विष पाजतो आणि स्वतःही विष पिऊन जीवन संपवतो. कैलास दौंड यांची **कापूसकाळ** ही कापूस हे एकच पीक घेणारा शेतकरी कर्जबाजारीपणा, नापिकी, दुष्काळ यामुळे कसा गांजून जातो त्याचे हृदय द्रावक चित्रण हा या कादंबरीचा विषय आहे. पर्यावरणाच्या असमतोलपणामुळे जो हवामान बदल झाला आहे त्याविषयी लेखक बोलतो "…… सकाळी सकाळी गार हवा सुटायची आणि दुपारच्याला कडक उन्हाळ्यासारखं ऊन लागायचं पुन्हा रातच्याला थंडी असे विचित्र हवामान होतं" पृ. २६ भीमराव वाघचौरे मराठवाड्यातील कादंबरीकार **रानखळगीमध्ये** सलग तीन वर्ष दुष्काळ पडल्यामुळे उडालेल्या हाहाकाराचे हृदय द्रावक चित्रण करतात. "………. रिकाम्या पोटाला कापडं, चिरगुट आवळून उगवला दिस वल्या-कोरड्याशानं ढकलीत-लोटीत व्हती कण्या- पेजवन खाऊन जगत व्हती. कच्ची-बच्ची कशीतरी जगवीत व्हती. उरली सुरली जनावरं-ढोर रोजच्या झाड-पाल्यावर जतन करीत व्हती. पाणी-पाणी, पाऊस पाऊस करीत सुकलं डोळं वर आभाळी लावून बसत व्हती…..!"७

पर्यावरणाच्या असंतोलाचे निसर्गाच्या विशेषता कोकणच्या पडझडीचे चित्रण करण्यात आघाडीवर असलेले लेखक म्हणजे प्रवीण बांदेकर. **चाळेगत** ही त्यांची अतिशय ताकदीची कादंबरी. यांत्रिकीकरण आणि पर्यटन संस्कृतीचे जलसृष्टीवर आक्रमण झाल्यामुळे सागरी जैवविविधतेचा ऱ्हास आणि त्यामुळे माणसाची होणारी विनाशाकडे वाटचाल हा चाळेगत कादंबरीचा विषय आहे. लेखकाने सावंतवाडी, सिंधुदुर्ग, तसेच वेंगुर्ले परिसरातील समाज जीवन चित्रण करताना कोकणचा होणारा ऱ्हास, यांत्रिक टॉवर्स वाल्यांची घुसखोरी, समुद्राचे होणारे प्रदूषण, अतिक्रमण, सागरी पक्षी व कासवांची तस्करी, खाणींचे अधिकार ग्रहण, निसर्गाची अमाप लूट, अशा अनेक गोष्टींचे नेमकेपणानं चित्रण केलं आहे. वाढते तापमान आणि निसर्गातील बदलत्या वातावरणाचा परिणाम सर्व सजीव सृष्टीला सोसावा लागतो आहे. पर्यावरणाच्या या भयंकर प्रदूषणाविषयी प्रवीण बांदेकर लिहितात, "भट्टीतील स्फोटामुळे आजूबाजूच्या परिसरातील लोकांचं जगणं हराम झालंय त्यांच्या घरांना तडे गेलेयत. मातीची घर तर कधीही कोसळतील अशा बेतात आहेत. दिवस रात्र ट्रक्स, डंपर्स अशा वाहनांची घरघर चालू असते ती वेगळीच जोडीला जेसीपी, बुलडोझर आहेतच शिवाय धूर आणि विषारी वायू पसरलेला आहेच. मळी सगळी समुद्रात सोडतात ती खाऊन मासे मरतायत, डोंगर सपाट झाले आणि पाण्याचे झरे आटले पावसाचं प्रमाण घटलं पाणीटंचाई, वाढलेला उष्मा,

हवेचे प्रदूषण, पाण्याचे प्रदूषण, जनावरांना चरायला काही.... नाही किती नुकसानी! माणसाने स्वतःचा स्वार्थ साधायला काय काय करावं?" (पृ.२२२) कुंधा ही पिकांच्या वाढीस हानिकारक ठरणारे गवत. आधुनिक बी-बियाणे, रासायनिक खतांचा वापर यामुळे तो जास्तीत जास्त वाढत जातो. शेतात येणाऱ्या पिकास नुकसान पोहचविण्याचे काम करतो. अशोक कोळी यांनी आपल्या **कुंधा** या कादंबरीत या बरोबरच पर्यावरणाचा समतोल ढासळल्यामुळे होणारे अनेक परिणाम चित्रित केले आहेत. आपण प्रगत म्हणू असलेल्या जगात या निसर्गक्रमातील बदलामुळे पाण्यासाठी सुद्धा संघर्ष करावा लागतो. "..... पाण्यासाठी भांडणाऱ्या महिलांचा भांडे आढळण्याचा आवाज येऊ लागला..... आवज वाढू लागला......कानठळ्या बसवू लागला......डोकं भनभनू लागलं..... भांडण वाढू लागलं....." (पृ.३० )निसर्गातील हवामानातील हा बदल संपूर्ण मानवी जीवन ग्रासून टाकतो.

रा. रं. बोराडे यांनी **चारापाणी** मध्ये अवर्षणामुळे निर्माण झालेले प्रश्न मांडले आहेत. शेषराव मोहिते यांनी **असं जगणं तोलाचं** आणि **धूळपेरणी** या दोन्ही कादंबऱ्यातून दुष्काळाने वाताहत होत जाणाऱ्या माणसांचे दुःख प्रत्ययकारीपणे रेखाटलं आहे. **कोयता** मधून सरदार जाधव यांनी १९७२ चा दुष्काळ आणि ऊस तोडणी कामगारांचं जीवन चित्रीत केलंय. मांडली आहे. नामदेव कांबळे यांच्या **राघववेळ** मध्येही पावसा अभावी निर्माण झालेल्या परिस्थितीचं चित्र आलं आहे. योगीराज बागुल यांच्या **पाचट** मधून ७० च्या दुष्काळाचं चित्र प्रत्ययकरीपणे मांडले आहे. **पांगिरा** मधून विश्वास पाटलांनी दुष्काळी वातावरणामुळे त्या गावची झालेली दयनीय अवस्था चित्रित केली आहे. १९७२च्या दुष्काळात अहमदनगर जिल्ह्यातील गावा गावांची स्थिती माणसांची स्थिती अरुण साधू यांनी **शापित** या कादंबरीतून मांडली आहे. याशिवाय इतर अनेक लेखकांनी समकालीन साहित्यात पर्यावरणीय समस्यांच्या अनुषंगाने मांडणी केली आहे.

मानवी स्वार्थी वृत्ती पर्यावरणाचे, निसर्गाचे संतुलन बिघडविण्यास कारणीभूत ठरली आहे. यामुळेच पर्यावरणाचे खूप मोठे नुकसान झाले आहे विकास साधत असताना मानवाने पर्यावरणाला गृहीत धरले. निसर्गाप्रती असणारी पूजनीयतेची कृतज्ञतेची भावना माणूस विसरून गेला आणि निसर्गाचा वाटेल तसा ऱ्हास करू लागला त्यामुळेच आज मानवी जीवनात अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रदूषणाचा मानवी जीवनावर विपरीत परिणाम होत आहे. इतर क्षेत्रंप्रमाणे साहित्यातूनही यावर उपाय सापडतील अशी आशा वाटते.


1. प्रकाश सावंत **पर्यावरण शिक्षण**, फडके पब्लिकेशन्स, प्र. आ. जुलै २००६ पृ. ४
2. पाटील व्ही.जे.,ढाके एस. व्ही.**पऱ्यावरणशास्त्र परिचय**, प्रशांत पब्लिकेशन्स, प्र. आ. २०१३, पृ. १०
3. पाथरे नीला **पर्यावरण शिक्षण**, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीय.आ. २००८, पृ. १३
4. दुर्गा भागवत सटीप दासबोध पृष्ठ ४२
5. ग. ह. खरे, श्री. र. भिडे, (संपा.) **आज्ञापत्र** लोकराज्य,एप्रिल २०१३ पृ.२
6. मुसळे बाबाराव **हाल्या हाल्या दुधू दे** बजाज पब्लिकेशन्स अमरावती तिसरी आवृत्ती पृष्ठ क्रमांक ५५
7. वाघचौरे भीमराव **रानखळगी** साकेत प्रकाशन, औरंगाबाद द्वितीय आवृत्ती १९९७ पृ.क्र.५ व ६


◆◆◆

# समूह मनाचा अविष्कार : लोकगीते

**डॉ.भारत हांडीबाग** **प्रा.कातकडे केशव श्रीरंग**
मार्गदर्शक कै.शंकरराव गुट्टे महाविद्यालय,धर्मापुरी, ता.परळी वै.जि.बीड
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर

**प्रस्तावना :-**

भारतीय संस्कृती विविध समाजातील भिन्न-भिन्न जातीजमातीतून उदयास आलेली आहे. प्रत्येक समाजाच्या बोलीभाषा,चालीरीति,परंपरा आणि खान-पान यामध्ये वेगळेपणा आढळून येतो.असे असूनही अनेक वेगवेगळ्या जातीतील लोक एकाच गावामध्ये गुण्या गोविंदाने नांदताना आढळून येतात.एकमेकांच्या सुख दुःखामध्ये धावून जाण्याची वृत्ती आणि इतरांना मदत करण्याविषयी इथल्या माणसांच्या मनामध्ये असणारी मानवतेची भावना सर्व धर्म समभावाचे निदर्शक आहे.प्रत्येक जातीची अशी काही खास गुण-वैशिष्ट्ये असतात तरीही अनेक सामाजिक बाबी अशा असतात की,त्यांच्या माध्यमातून सर्व समाज एकमेकांशी सांधला जातो.आणि खऱ्या अर्थाने त्यामुळेच भारतीय संस्कृती ही जगाच्या दृष्टीकोनातून एक आश्चर्य ठरलेली आहे.

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय हा अशाच समाजाच्या सामुहिक जिवन चित्रण ज्या गीतांतून केला जातो त्या लोकगीतांचा विचार करणारा आहे.

**लोकगीत म्हणजे काय?लोकगीताचे स्वरूप :-**

लोकगीतत ही संज्ञा खूप प्राचीन आहे.मानवाच्या जन्मापासून ही संकल्पना उदयास आली आणि मानवाच्या विकासाबरोबरच या संज्ञेचाही विकास होत गेला.ती बदलत्या काळानुरूप अधिकच व्यापक होत गेली.लोकगीत ह्या संकल्पनेची व्याख्या सांगताना दुर्गा भागवत,तधर्म आणि लोकसाहित्ययया ग्रंथातून लिहितात की,

मानव प्राणी अज्ञाताला जागू पाहतो तो धर्माच्या मार्गाने,धर्म म्हणजे जाच्यावर आपला विश्वास असतो असे काव्यच असते असे काव्य म्हणजे लोकगीत.

दुर्गा भागवत यांनी लोकगीताच्याव्यूत्पत्तीमध्ये धर्म हा घटकाला महत्व दिले आहे. हा धर्म म्हणजे परमेश्वराला स्मरून, नैतिकतेने समाजाला नियंत्रित करणारी घटना आहे.सामाजिक मुल्ये व जीवनमूल्ये व्यवस्थित जतन करण्यासाठी धर्म ही सामुहिक संस्था अस्तित्वात आली.ही चालविण्यासाठी धर्मगुरूही निर्माण झाले परंतु या संस्थेचे नीती-नियम काटेकोर पाळण्याचे आणि पळून घेण्याचे कार्य सदैव समाजानेच स्वतःहून केले. त्यामुळे एकीकडे परमेश्वराची भक्ती आणि दुसरीकडे स्वतःला, आणि कुटुंबाला समाजाच्या वर्तनात गुंतून ठेवण्याची महत्वाची गोष्टही धर्म या परीसंस्थेने केले.आणि या धर्मावर मानवाचा प्रचंड विश्वास आहे.कारण धर्माच्याच माध्यमातून त्याच्यावर जन्मल्यापासून मरेपर्यंत आणि मेल्यानंतरही संस्कार

केले जातात.त्यामुळे हा धर्म म्हणजे मानवप्राण्याला नियत करणारा घटक आहे असे म्हणावे वाटते.

धर्मामध्ये विविध प्रकारच्या विधी,नियमावली,देव,देवता,व्रतवैकल्य,रूढी-प्रथा संस्कार आणि परंपरा यांचा अंतर्भाव असतो.हिंदू संस्क्रती मध्येही अशा अनेक गोष्टीचा समावेश आहे ज्याचा पगडा हिंदू धर्मीय लोकांच्या मनावर बसलेला आहे.या धर्माला अधिक मजबूत करण्यासठी ब्रम्हा,विष्णू,महेश,गणेश,जगदंबा अशा प्रमुख देवदेवतां सोबतच जानाई,मसोबा,मरीआई,खंडोबा,बिरुबा,वेताळ,आसरा,अशा विविध प्रादेशिक आणि ग्रामदेवतांची पूजा अर्चा आणि व्रत वैकल्यही केली जातात.या सर्व देव-देवतांचे गुण-गाण गाण्यासाठी,त्यांच्या महात्म्याच्या गोष्टी सांगण्या साठी आणि त्यांची आरती म्हणून त्यांना प्रसन्न करण्यासाठी भक्तीच्या व श्रद्धेच्या अनेक गौरव गीतांची रचना केली गेली.

लोकगीतामध्ये अनेकदा देव-देवतांच्या महात्म्य वर्णनाबरोबरच श्रम हलके होण्यासाठी किंवा दु:खीअंतकरण मोकळे होण्यासाठीही लोकगीते लिहिली गेली.यामध्ये भलरी गीते,लावणीगीते आणि स्त्रीयांची ओवीगीते यांचा समावेश होतो.या शिवाय लोकगीतांतून अनेक लोकसंस्कृतीचे उपासकहीदेव-देवतांचे वर्णन करीत असताना जनजागृती करण्यासाठीही लोकगीते म्हणताना दिसतात.

लोकगीतातून व्यक्त होणाज्यासमाज जीवनात लोकसंकृतीच्या उपासकांनी धार्मिक दृष्ट्या समाजाची नैतिकता अबाधित राखण्याचे कार्य केले ते एका श्रद्धेपोटी.या उपासकांनी लोप पावत चाललेला धर्म जिवंत ठेवण्याचे कार्य आपल्या उपदेशपर कथागीतातून केले आहे व देव-देवतांचे महत्व पटवून देवून समाजासाठी धर्माची किती आवश्यकता आहे हे पटवून दिले आहे.`

याचाच अर्थ असा की,लोकगीतांची निर्मिती ही समाजासाठी आणि सामुहिक स्वरुपाची झालेली आहे.त्यातून आविष्कृत होणारा आशय हा समुदायस्वरूपअसतो.तोव्यक्तिगत पातळीवर किंवा स्वतःपुरताच वैयक्तिक असत नाही.कारण धर्म,संस्कृती ही एकाच व्यक्तीपुरती मर्यादित नसून ती सामुहिक असते.म्हणूनच लोकगीतांचे स्वरूपही सामुहिक दिसून येते.

**लोकगीतांचेवर्गीकरण किंवा प्रकार**

लोकगीतांचे प्रकार हे सादरीकरनावरून आणि आशयावरून लौकिक अलौकिक असे दोन प्रकार सांगता येतात.पहिल्या प्रकारात मानवप्राणी आपल्या श्रमानुसार, आनंदानुसार, विधीनुसार आणि विरंगुळ्यानुसार लोकगीते सादर करत असतो.तर दुसज्या प्रकारात देव-देवतांविषयी श्रद्धा,स्तुतीवर्णन,शौर्याचे वर्णन,महात्मे वर्णन पर गीते येतात.या दोन्हीचेही सादरीकरण मात्र सामुहिक स्वरूपाचे असते हेही तितकेच महत्वाचे आहे.

**१) लौकिक स्वरुपाची लोकगीते**

या लोकगीतांच्या प्रकारात लोकांनी लोकांसाठी गायलेली आणि दररोजच्या संसारातील विविध घटना प्रसंगांचे वर्णन करणारी ही लोकगीते असतात.या मध्ये भलरी हा लोकगीताचा महत्वाचा प्रकार

आहे. भलरी गीत हे शेतामध्ये सामुहिक काम करीत असताना सर्वांना नवा उत्साह येईल,गीताच्या नादात त्या चालीवर सर्वजण विनाआळस काम करतील आणि त्या कामाचा शिन जाणवणार नाही या साठी भलरी गायली जाते तर झिम्मा,फुगडी,नागपंचमीचा फेरा इत्यादीने नृत्य करून गायलेल्या गीतांतून मनोरंजन, संस्कृतीधर्मविधी आणि भक्ती या सर्वांचाच मिलाप झालेला पाहवयास मिळतो.

फुगडी या लोकगीताचा प्रकारातील खालील उदाहरणातून याची खात्री पटेल.

फुगडी खेळू दन्नादन्ना
रुपये मोजू खन्ना खन्ना
रुपयाची सुपली
जाऊ माझी धाकली
पानखाया शिकली..।।

वरील फुगडी गीतातून मनोरंजनाबरोबरच समाजवास्तववरही प्रयत्न झालेला दिसतो.

नागपंचमीच्या उत्सवाच्या निमिताने नागोबाला आपला भाऊ मानून त्याने आपले रक्षण करावे अशी भावना स्त्रियांची असते.हीच भावना खालील गीतांतून व्यक्त झालेली आहे.

"नागपंचमीच्या दिशी गहू काढते दळाया
काढले दळाया । नाग निघाले खेळाया
नागपंचमीच्या दिशी । जेवण नागोबाला सांगा
नागोबाला सांगा । भाऊ पद्मिनीला मागा ।।"

नात्यांसंबंधी असलेले भावबंध आणि बहिणीची अपेक्षा हे गीत साकार करते तर गौरी घरी येण्याच्या वेळी तिच्या स्वागतासाठीही काही लोकगीतांची रचना केलेली आहे. कृष्णाची विनवणी आणि गौराईची आतुरताच खालील गीतातून दिसून येते.

"गवळ्याचे राई गवळ्याचे राई
देग क्रिष्णाचा म्हवणी पवा
मामुजी मामुजी तुमी का आला
ज्येचा त्येचा धाडून द्यावा
तुमचा पवा घेऊन जावा
गौराय पवनी येतीय गावा.।।"

खज्या अर्थाने स्त्रीयांच्या मनातील भाव-भावनांचे दर्शनवरील लोकगीतातून घडताना दिसते.

अशीच वर्णने भोंडल्याच्या गाण्यांमध्ये,फेरांच्या गाण्यामध्येही स्त्रीयांच्या भावना व्यक्त करतात.

या शिवाय लग्नविधी हळद लावणे,जाते पुजने या वेळीही स्त्रीया वधू-वरांसाठी गातात.आनंदी

वातावरणाला अधिकच मंगलमय आणि प्रफुल्लीत करण्याचे काम या वेळी ही लोकगीते करतात.

**२) अलौकिक स्वरुपाची लोकगीते**

लोकगीतांची रचना जशी मानवाने स्वतःच्या आनंदासाठी,सन-उत्सवाची रंगत वाढविण्यासाठी आणि विविध विधीसाठी वापरली तशीच ती देव-धर्माच्या व धार्मिक कार्यक्रमासाठी उपयोगात आणलेली आहे.खंडोबाची गायलेली वाघ्या-मुरळीची गाणी असो,गोंधळ्याने गायलेली देवीची गाणी असो,पोतराजाची गीते,भराड्याची गीते,वासुदेवाची गीते,धनगराची सुंबरान गीते,जोगती,भोपी,एकतारीवाल्याची भजणी गीते ही एक प्रकारची गीते लोकगीतातील दैवता विषयी गायलेल्या लोकगीताचे प्रकार आहेत.दैवतालाप्रसन्न करून घेण्यासाठी त्याच्या महात्म्याचे वर्णन आणि त्याची प्रार्थनारुपी आळवणी या गीता मधून केली जाते.समाजाच्या कल्याणासाठी या गीतांचा वापर केला जातो.तर घरातील माणसाच्या सुख-शांतीविषयी ही भक्त मंडळी लोकगीतातून अराध्याची विनवणी व आळवणी करतात.ह्या सर्व गीतांचे स्वरूप सामुहिक असून त्यातून त्यातून जनकल्याणाचा शुद्ध हेतू समोर येतो.कारण ही गीते गाणारी मंडळी स्वतःसाठी काहीही न मागता समाजातील लोकांसाठीच मागत असतात.

वासुदेवाच्या खालील कडव्यामधून याची प्रचीती येते.

"श्रीधराचा दान पावलं
कृष्णामाईला दान पावलं
महादेवाल दान पावलं"

अशी परमेश्वराला अगोदर स्वागतपर गुणगान करून नंतर तो समाजाला उपदेश करतो.

"अरेऐक पराण्या,तुला मी सांगतो
हरीबंधू राहू नको
अहो दुही भावाचा तंटा चालला
सरकार मंदी जाऊ नको"

हे गीत समाजाला जागृत करणारे आहे.भावा-भावातील वादाचे रुपांतर कोर्ट-कचेरीत गेल्यावर नीती प्राप्त होतो व आहे ते जगणे नकोसे होऊन जाते याचा खुलासा करून तो त्या पासून दूर राहण्याचा उपदेश करतो आहे.

पोतराजाने गायलेल्या मरिआईच्यागीतानेही लोकगीतामध्ये मोलाची भर घातलेली आहे.खालील गाण्यातून एकाच वेळी अनेक अर्थ प्रतीत होताना दिसतात.

"आली आली मरीबया, कोण्या राज्याच्या पावली
धज मोत्याची लावली
आली आली मरीबया शिवेवरी डेरा दिला

कोण राजा उतरला
आली आली मरीबया तुला कंबाळ वाहिलं
गाडीवानाला संबाळ ।।"

वरील गीतातून पोतराज हा मारीमातेचे गुणगान व स्तुती गातो आहे.त्याच बरोबर भक्ताला सांभाळण्याची जबाबदारीही तिच्यावर सोपविताना दिसतो आहे.

बहुरूप्याचीगाणी मात्र लोकगीतातील मनोरंजनाचा प्रकार म्हणता येईल.यामध्ये देव,भक्त किंवा श्रम यातील कोणत्याही घटकासाठी ही गाणी सादर होत नाहीत.तर समाजातील विकृत रूढी-परंपरा,वृत्ती-प्रवृत्ती किंवा ढोंगीपणा यावर ही लोकगीतातून कडाडून हल्ला चढवितात,यामधून एकाच वेळी मनोरंजन आणि समाज जागृती होताना दिसते.

"लग्नालाचला तुम्ही लग्नाला चला
लाडाई,गोडाई,चीपडी राधाई
भांडखोर येसाई पळाली धोंडाई
मोडकी बजाई आंधळी कोंडाई.लग्नाला चला
जेवायला केली चिखलाची कढी
दगडाची वडी,मस्करी लोणचं
गाढवाचं भज,तरसाच्या पोळ्या
लांडग्याची खीर
जेवायला चला तुम्ही लग्नाला चला."

समाजातील वास्तवावरील विडंबन वरील लोकगीतातून दिसून येते.

एकंदरीतच लोकगीताची दैवताविषयी वर्णन ही श्रद्धायुक्त असतात.भक्त आणि परमेश्वर यांच्यातील संवाद अधिक सुकर करून देण्याचा प्रयत्न ही लोकगीते सादर करणारी लोककलावंत करीत असतात.आणि त्यातून समाजातील विविध घटकांचे वृत्ती-प्रवृत्ती,विकृती,गुण वैशिष्ट्यांचे दर्शन घडवितात.त्यामुळे त्यातील वर्णने ही वैयक्तिक न राहता समूह मनाचे दर्शन घडविताना दिसतात.त्यामुळे लोकगीते म्हणजे समूहमनाचा हुंकार आहे असेच म्हणावे वाटते.

**निष्कर्ष**

१) लोकगीते ही मनाच्या उत्क्रांती बरोबरच विकसित गेलेली दिसतात.त्यात व्यक्ती नुसार बदल होत गेला तरी त्याचे मुल स्वरूप तसेच राहते.

२) लोकगीताचा करता अनामिक असतो.त्यामुळे त्याचा ठराविक कालखंड व रचीयता सांगता येत नाही.

३) महानुभाव,वारकरी,संप्रदायातील अनेक संतानी लोकगीतातून रचना केल्याचे जाणवते.

४) भारुड, जात्यावरील ओव्या हेही लोकगीतातीलच प्रकार आहेत.

५) समाजातील विक्रतीत सहजपणे प्रकाश टाकण्याचे काम लोकगीते करतात.

६) मनातील भाव-भावनांना वाट करून देण्यासाठी स्रीया जर श्रमाची तीव्रता कमी होण्यासाठीही लोकगीते म्हटली जातात.

७) लोकगीते हे विविध रूढी-परंपरा,संस्कृती,धर्म,अध्यात्म या विषयी जन मानसात जागृती व मार्गदर्शन करतात.

८) लोकगीते ही वैयक्तिक नसून समूहमनाचे प्रतिबिंब असलेला गीत प्रकार आहे.

**समारोप:-**

मराठी साहित्यामध्ये uलोकगीतत ही संकल्पना अति प्राचीन आहे. त्यांना कोणी निर्माण केले हे सांगणे कठीण आहे.मात्र सादरीकरनावेळी त्याच्यात अनेक नवीन शब्दांची भर घालण्याचे काम लोककलावंत करीत असतात.संत एकानाथानीही भारुडांच्या रूपाने लोकगीतात्मक रचना करून समाजातील ढोंगी प्रवृत्तीवर कोरडे ओढले.तर महदंबेनेश्रवळ्याच्या माध्यमातून केलेले प्लनाचे वर्णन हेही लोकागीतांचाच अविष्कार म्हणावा लागेल.असे असले तरी समाजाचे सर्वांगीण वास्तव स्वरूप सहजपणे उघड करण्याचे काम लोकगीतांनी करून मराठी वाङ्मयाच्या विकासात महत्वाचा हातभार लावत आहे हेही सत्य नाकारून चालणार नाही.

१) डॉ.दुर्गा भागवत, 'धर्म आणि लोकसाहित्य' सह्याद्री चित्रमय जगात, नवभारत एप्रिल-मे१९५७

२) डॉ.भारत हंडीबाग, 'मराठी लोकगीतातील समाजदर्शन, चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद.

३) डॉ.जिनी बाबर, 'स्रियांचे खेळ आणि गाणी' महाराष्ट्र राज्य लोक साहित्य समिती,महाराष्ट्र शासन विभाग,मुंबई.पुष्प २० वे १९७७

४) ना.ब.जाधव, 'मोत्यांचा कंठा,' विजय प्रकाशन,नागपूर प्रथम आवृत्ती १९३७,पृ.क्र.१३३

५) डॉ.सरोजिनी बाबर, 'श्रावण-भाद्रपद' महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती,महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग,१९७७पृ.क्र.५६०

६) डॉ.विश्र्वनाथ शिंदे, 'लोकसाहित्य मीमांसा' भाग १, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस,पुणे.प्रथमावृत्ती १९९९,पृ.क्र.७७

७) डॉ.सरोजिनी बाबर, 'मराठी लोकगीत' बहिशाल शिक्षण ग्रंथमाला,बहिशाल शिक्षण मंडळ,पुणे विद्यापीठ,पुणे पृ.क्र.१२०

८) डॉ.प्रभाकर भांडे, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह,' प्रकाशन पुणे,प्रथमावृत्ती १९७५ पृ.क्र.८५.

◆◆◆

# भक्तिसंप्रदायाचा प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहास

**अध्यासक - सौ.वैदेही वासुदेव गायकवाड** **मार्गदर्शक - प्रा.डॉ.वसंतराव रघुनाथ शेंडगे**
अहमदनगर मराठी विभागप्रमुख
न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव, ता.शेवगाव जि.अहमदनगर

**1.4.1 प्राचीन भक्तिसंप्रदाय ः-**

भक्तिसंप्रदायाचा उगम हा प्राचीन वाङ्मयात आढळतो. भारतीय संस्कृती ही आर्यपूर्व परंपरेचा वारसा व इतिहास सांगणारी आहे. महाराष्ट्र हे नाव प्रचारात येण्यापूर्वी या प्रदेशास दंडकारण्य किंवा आर्यवर्त असे म्हटले जाते. प्राचीन काळात म्हणजेच वेदकाळात ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, उपनिषदे, बौद्धधर्म, रामायण, महाभारत, जैनधर्म यांचा उदय आणि विस्तार झालेला आढळतो. या अनेक ग्रंथात भक्तिसंप्रदायाची बीजे सापडतात. याच काळात नाथ संप्रदायाचा उदय झालेला आहे. गोरक्षनाथांनी आपले गुरू मच्छिंद्रनाथांची योगिनीच्या जाळ्यातून मुक्तता केली. गोरक्षनाथांच्या ठिकाणी प्रज्ञा, मौलिक चिंतन, निष्कलंक चरित्र होते. याच बळावर त्यांनी 'अमनस्कयोग' व 'ज्ञानदीपबोध' या ग्रंथांची निर्मिती करून भक्तिसंप्रदायातील नाथसंप्रदायात मोठी भर घातली.

प्राचीन काळातील नाथ संप्रदाय उदय आणि इतिहासाबद्दल प्रा.डॉ. मोहन शेळके म्हणतात की, ''इ.स. 693 मध्ये नाथपंथाच्या सरहपाद या संस्थापकाचे गुरू श्री शांतिरक्षित यांचा जन्म मगधपूर्व प्रदेशात भागलपुराजवळ राज्ञी नावाच्या खेड्यात झाला. या नाथपंथाच्या पंडिताने प्राकृत भाषेला महत्त्व देऊन जनसामान्यांची दुःखे दूर केली. एवढेच नव्हे तर जटील अशा योगधारणेला त्यांनी काटशह दिला. म्हणून लोकहितवादी नाथसंप्रदायाच्या संस्थापकांची परंपरा अशी देण्यात येते. शांतिरक्षित, सरहपाद, शबरलुईपा, हिरूपा, दारिक घंटापा, जालंदर, कानिफा, मत्स्येंद्र, गोरक्ष व गहिनी असा होय. एकीकडे तांत्रिक मार्गातून भक्तीची सोडवणूक करणारा नाथसंप्रदाय फुलत होता. याचवेळी चालुक्याच्या राज्यानंतर महाराष्ट्रात राष्ट्रकुटांनी आपली सत्ता 750 ते 950 पर्यंत अबाधित राखली होती. त्यांच्या राज्यात मान्यखेत व कल्याणी या दोनच राजधान्या होत्या. येथूनच त्यांचा कार्यभार चालत होता. याचवेळी इ.स. 765 नंतर महाराष्ट्रात कोकण, कऱ्हाड, कोल्हापूर येथे शिलाहाराची राज्ये उदयास आली. इ.स. 745 च्या सुमारास श्रीकृष्णाच्या घराण्यापैकी एक शाखा सौराष्ट्रातील जुनागढ येथे नांदत होती. द्वारावतीचा राजा वज्रकुमार मरण पावल्यानंतर त्याची गरोदर पत्नी नासिकच्या कुंतीविहारात येऊन प्रसुत झाली. या मुलाचे नाव दृढवत ठेवले गेले. यानेच महाराष्ट्रात इ.स. 745 च्या सुमारास यादवांच्या राज्याची सुरुवात झाली. त्याच्याच वंशातील भिल्लम या यादवाने महाराष्ट्रात देवगिरी येथे स्वतःच्या राज्याची राजधानी निश्चित केली व याच्याच राज्यात आद्यकवी मुकुंदराज आले. भिल्लम पुत्र जैत्रपाल पुत्र सिंघन यांनीही यादव राज्याचा सतत विस्तारच केला. एकीकडे महाराष्ट्रात राष्ट्रकुटाचा राजा कृष्ण पहिला हा वेरुळच्या डोंगरात शिवमंदिराचे भव्य लेणे कोरून काढीत होता. त्याच काळात शिवाची व विष्णूची मंदिरे महाराष्ट्रात उभी होऊन शिखरे झळकावत होती. कारण या काळातील सर्व राजे धर्मसहिष्णु होते.''1 भक्तिसंप्रदाय याची सुरुवात प्राचीन काळात नाथसंप्रदायाने झाली. नाथसंप्रदाय वाढीस

लागण्यासाठी तत्कालीन राजांनी धर्मवाढीस आणि संप्रदाय वाढीस प्रेरणा दिली, हेच डॉ. शेळके यांच्या विवेचनावरून आपल्या समोर येते.

प्राचीन भक्तिसंप्रदायाचा इतिहास सांगताना डॉ. अशोक डोळस म्हणतात की, ''अकराव्या-बाराव्या शतकात भारतात, महाराष्ट्रात विविध भक्तिचळवळी उदयास आल्या. यात वैष्णव, शैव, नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ इ. भक्तिचळवळीने भारतभर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनावर आध्यात्मिक, नैतिक, संस्कार करून चातुर्वण्यव्यवस्थेस व जातीव्यवस्थेस धक्का न लावता वैदिक धर्माच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला. तत्कालीन समाजाला ईश्वरप्राप्तीसाठी भक्तीचा सोपा मार्ग सांगितला, हे त्रिकालित सत्य नाकारता येत नाही. हे जरी सत्य असले तरी अकराव्या-बाराव्या शतकातच भक्तिचळवळी उदयास का आल्या व त्या काळातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थिती भक्तिचळवळी उदयास कारणीभूत होती.''2 भक्तिसंप्रदाय उदयास येण्यापाठीमागे सामाजिक जीवन, धार्मिक जीवन हेच कारणीभूत होते. वाममार्गाला लागलेला समाज चांगल्या मार्गावर यावा हाच हेतू भक्तिसंप्रदाय उदयामागे होता. मध्ययुगीन चळवळीच्या इतिहासामध्ये प्राचीन भक्तिचळवळीची बीजे पडलेली आहेत. भारतातील परकीय आक्रमणाने लोकजीवन हे विस्कळीत झालेले होते. ते पूर्व पदावर आणण्याचे काम भक्तिसंप्रदायाने केले, हेच प्राचीन भक्तिसंप्रदायाच्या अभ्यासाने स्पष्ट होते.

प्राचीन भक्तिसंप्रदायाचा इतिहास अभ्यासताना प्राचीन महाराष्ट्राचे धर्मजीवन याबद्दल प्र. न. जोशी म्हणतात की, ''महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासातील ज्ञात असे पहिले राजघराणे सातवाहनांचे होय. स्रुमुक, सातकर्णी, गौतमीपुत्र सातकर्णी,पुलुयामी इत्यादींनी महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव वाढविले. पुढे वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, कलचुरी, यादव, शिलाहार, कदंब इत्यादी राजघराण्यांनी प्राचीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक घडामोडीत मोलाची भर घातलेली दिसते. वैदिक धर्म, वैष्णव धर्म व शैव पंथ, जैन धर्म, बौद्ध धर्म इत्यादी धर्माचा व धर्मपंथाचा जो विकास झाला, त्याची छाप महाराष्ट्राच्या प्राचीन संस्कृतीवर दिसते. सगुण पूजेमुळे मूर्तिपूजेची कल्पना दृढ झाली. नाना पुराणांच्या निर्मितीमुळे व्रते व कर्मकांड यांची वाढ होत राहिली. कधी यज्ञ संस्कृतीचे पुनरुज्जीवन होताना दिसते, तर कधी यज्ञाऐवजी पंचमहायज्ञ व देवपूजा होत राहिली. संपत्ती, संतती, स्त्रीपुत्रलाभ, राजवैभव, सत्ता यांच्या प्राप्तीची फलश्रुती सांगणारी पुराणे तयार झाली. मंदिरांची, देवळांची, विहारांची वाढ झाली. पूर्वकर्म, पापपुण्य, स्वर्गनरक यांच्या कल्पना प्रवर्तित झाल्या. उपासनेच्या विविध पद्धती रूढ झाल्या. शिला मंदिरे आणि लेणी यांची निर्मिती झाली. विहार, स्तूप, चैत्य, मठ, आश्रम यांतून धर्मचर्चा होत. भाजे, कार्ले, पितळखोरे, अजंठे, नासिक, कान्हेरी, जुन्नर, वेरूळ, औरंगाबाद, इत्यादि ठिकाणांच्या लेण्यावरून प्राचीन काळच्या धर्मजीवनासंबंधी थोडीफार कल्पना येण्यासारखी आहे. महाराष्ट्र हा मूळचा शिवोपासकांचा असल्यामुळे महत्वाची शिवमंदिरे तयार झाली. महादेव, दुर्गा अथवा भवानीदेवी, गणपती, खंडोबा, ज्योतिबा इत्यादि आर्येतर देवदेवतांचे माहात्म्य वाढले. जैन व बौद्ध धर्माबरोबर हिंदू धर्मही वाढत होता. आर्यांचा वैदिकधर्म व द्रविडांचा उपासनामार्ग यांच्या

मिश्रणाने हिंदू धर्मास एक नवा आकार येत होता. राजाश्रयामुळे या धर्मांची वाढ झाली. मोठमोठी मंदिरे तयार झाली. शिवाच्या उपासनेतूनच नाथ व लिंगायत या दोन पंथांचा उदय झालेला दिसतो. आदिनाथ-मच्छिंद्रनाथ-गोरक्षनाथ-गहिनीनाथ-निवृत्तीनाथ अशा परंपरेने तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांना नाथपंथाची दीक्षा मिळाली. ज्ञानदेव नामदेवांनी या नाथपंथास वारकरी पंथात समाविष्ट करून घेतले. शिवोपासक नाथपंथ पंढरीच्या बाळकृष्णरूपी विठ्ठलात सामावून गेला. शिव आणि विष्णू यांच्या उपासकांचे एक मनोहर मिलन महाराष्ट्राच्या धर्मजीवनात दिसते. कर्नाटकात स्थापन झालेल्या वीरशैव अथवा लिंगायत पंथाचा फार मोठा परिणाम महाराष्ट्राच्या धर्मजीवनावर झाला. बसवेश्वरांच्या या पंथाने हिंदू समाजातील जातीभेद कमी करण्यास मदत केली. यादव काळातच आणखी एक धर्मपंथ उदयास येऊन श्रीकृष्ण व दत्तात्रेय प्रभू यांच्या उपासनेस नवे वळण मिळाले. श्री चक्रधरांच्या महानुभाव पंथाचे महत्त्व वाङ्मय, तत्त्वज्ञान व आचारविचार याद्दष्टीने फार मोठे आहे. प्राचीन वैदिक धर्म, शैव व वैष्णव पंथ, जैन व बौद्‌ध धर्म, नाथपंथ, महानुभाव पंथ, लिंगायत पंथ, वारकरी संप्रदाय, गुरुचरित्राने प्रवर्तित केलेला दत्तपंथ, रामदासी संप्रदाय, गाणपत्यांचा संप्रदाय, देवीउपासकांचा पंथ अशा विविध धारांनी महाराष्ट्रातील धर्मजीवन वाढत राहिले.''3 या प्राचीन वाङ्मयइतिहासावरून आपल्या असे लक्षात येते की प्राचीन काळातील राजघराण्यांनी धर्मसंप्रदायाला आणि भक्तिसंप्रदायाला राजाश्रय दिला. विविध मंदिरे उभारून भक्तिसंप्रदायातील संतांना धर्मवाढीस प्रेरणा दिली. राजाश्रयामुळे भक्ती संप्रदायाचा अधिक विकास झाला. या मध्ये तत्कालिन राजे आणि संतांचे फार मोठे योगदान असलेले दिसून येते.

प्राचीन काळातील भक्तिसंप्रदाय अधिक विकास होण्यामध्ये तत्कालिन धर्मजीवन हे फार महत्त्वाचे मानले जाते. यात विविध धर्मातील देवदेवतांचे महत्त्व सांगतांना प्र. न. जोशी म्हणतात की, ''महाराष्ट्राच्या धर्मजीवनात ग्रामदेवतांचे व कुलदेवतांचे महत्त्व कमी नाही. जाखाई, यमाई, तुकाई, ज्योतिबा, बहिरोबा, म्हसोबा, जननी, जनाई, टेंबलाई, खंडोबा इत्यादी देवदेवतांना मराठी संतांनी क्षुद्र लेखले असले तरी त्यांनी ग्रामसंस्कृतीच्या विकासास फार मोठा हातभार लावलेला आहे. खंडोबा, ज्योतिबा, मल्हारी, भवानी, काली इत्यादि कुलदेवता म्हणूनही घरोघरी विराजमान झाल्या. शिव, विष्णूस महिषासुर मर्दिनी, गणेश व सूर्य अशा प्रमुखांचे पंचायतनही संस्कृती समन्वयास उपयोगी पडले. यात्रा, उत्सव, सण यांच्या निमित्ताने धार्मिक जीवनाची एक चाकोरीही ठरून गेली. निरनिराळ्या तीर्थक्षेत्रांना महत्त्व आले. औंढ्या नागनाथ, घृष्णेश्वर, परळीचा वैजनाथ, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, शिखर शिंगणापूर या प्रमुख शिवस्थानाबरोबर काळेश्वर, व्याघ्रेश्वर, हरिहरेश्वर, भोमेश्वर, वेळेश्वर, विमलेश्वर, वीरेश्वर इत्यादी नावांनी शिवभुजा द्दढावली. पंढपूरचा विठोबा व नाशिकचा काळाराम यांचे माहात्म्य वाढले. मोरगाव, थेऊर, रांजणगाव, लेण्याद्री, ओझर, सिद्‌धटेक, महड, पाली ही अष्टविनायकांची स्थाने उदयास आली. माहूर व मातापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर, गाणगापूर येथील दत्तोपासना लोकप्रिय झाली. माहूर, कोल्हापूर, अमरावती, चंद्रपूर, वणी औंध इत्यादी ठिकाणांच्या देवींना नवस होत राहिले. रामनवमी, हनुमान जयंती, वटसावित्री, नागपंचमी, कृष्णाष्टमी, गणेश चतुर्थी,

नवरात्र, दीपावली, महाएकादश्या, दत्तजयंती, रथसप्तमी, महाशिवरात्री इत्यादी विविध सणांमुळे व उत्सवांमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात चैतन्य निर्माण झाले''4 प्र. न. जोशी यांनी मांडलेल्या महाराष्ट्रीय धर्मजीवनामधून समग्र भक्तिसंप्रदायाचा इतिहासच येथे मांडलेला आहे. प्राचीन काळातील ग्रामदैवते, स्थानदैवते, क्षेत्रीयदैवते यांच्या उपासनामधूनच भक्तिसंप्रदाय अधिक वाढत गेला. सुरुवातील या सर्व देवदेवतांची उपासना ही धर्म परंपरेनुसार केली जात. त्यानंतर पुढील काळात विविध देवतांच्या उपासनेतूनच देवदेवतांचे विविध संप्रदाय निर्माण झाले. वरील संप्रदाय इतिहासातून असे लक्षात येते की भक्ती संप्रदायाचा उदय हा शिवउपासना व शाक्त उपासना यातून झालेला आहे. हिंदू धर्मातील देवाधिदेव भगवान शंकर, महादेव व पार्वती यांच्या विविध रूपातून स्थान दैवते, ग्रामदैवते आणि क्षेत्रीयदैवते निर्माण होऊन त्यांना विविध संप्रदाय असे नाव मिळाले. हिंदू धर्मातील ज्या पुरुष देवता आहेत त्या भगवान शंकराची रूपे मानल्या गेल्या व ज्या स्त्रीदेवता आहेत त्या पार्वतीची रूपे मानल्या गेल्या. पुढे शिवउपासनेमधूनच विविध भक्ती संप्रदाय निर्माण झाले हेच प्राचीन भक्ती संप्रदायावरून व त्याच्या इतिहासातून आपल्यासमोर येते.

**1.4.2 मध्ययुगीन भक्ती संप्रदाय ः-**

महाराष्ट्रातील मध्ययुगीन भक्तिसंप्रदाय आणि त्यावरील मराठी वाङ्मय हे महाराष्ट्राचे ऐश्वर्य आहे. मराठी भाषेच्या वैभवातही या भक्ती संप्रदायाने मोलाची भर घातलेली आहे. मध्ययुगीन भक्तिसंप्रदाय आणि त्यावरील तयार झालेले मराठी वाङ्मय याबद्दल डॉ. अनिल सहस्रबुद्धे म्हणतात की, ''महाराष्ट्रातील मध्ययुगीन वाङ्मय हे महाराष्ट्राचे आणि मराठी भाषेचे ऐश्वर्य आहे. मराठी भाषेच्या तथा वाङ्मयाच्या उद्गमापासून ते ब्रिटिश अर्थात आंग्लकालाच्या प्रारंभापर्यंतचा काल; मोगलकाल किंवा मध्ययुगीन काल म्हणून; भारताचा इतिहास मांडतांना विचारात घेतला जातो. या उण्यापुऱ्या आठनऊशे वर्षांच्या काळात महाराष्ट्र सारस्वत बहरले. ते प्रामुख्याने विविध उपासना पंथांच्या अथवा संप्रदायाच्या आश्रयाने मराठी भाषेने याच काळात ज्ञानभाषेचा दर्जा मिळविला. कलात्मक आणि कथात्मक साहित्याच्या बाबतीत संस्कृतशी बरोबरी केली. संस्कृत, हिंदुस्थानी आणि द्रविड भाषा स्वतःत सामावूनही; देशीपणा जपला. धर्म, संस्कृती, समाज आणि हिंदवी राष्ट्र यांची अस्मिता जपली. श्री ज्ञानेशांची ओवी, तुकारामांचा अभंग, वामन पंडितांचा श्लोक, मोरोपंताची आर्या जगद्विख्यात झाल्या. पाश्चात्य पंडितांनाही या रचनाबंधांनी भुलविले. त्याचबरोबर अभंग आणि ओवीला, गौळणी आणि भारूडाला, आख्यान कवितेला आणि चरित्रात्मक लेखनाला; आपल्या मराठमोळ्या राकट, दिलदार आणि तेवढ्याच मादक मधुर व लवचिक ढंगाने भुरळ पाडणारे शाहीर वाङ्मय; याच काळात निर्माण झाले. हे सारे वाङ्मय याच देशी वाणाचे, संस्कृती आणि माती यांची महती आणि स्वत्व राखणारे होेते. त्याचबरोबर या सर्व वाङ्मयाचा केेंद्रबिंदू 'अध्यात्म' हा होता. आणि ध्येय होते आत्मोद्धार आणि लोकोद्धार? ईहजीवनात पुरुषार्थ प्रवणतेने जीवन व्यतीत करीत, परमार्थ साधता येतो; यावर ठाम असलेले मन, या साहित्याच्या वैविध्यपूर्ण आविष्कारातून घडत गेले. समाज जीवटपणे आणि श्रद्धापूर्ण अस्मितेने जगविण्याची शक्ती

सधनपणे या साहित्यात आहे म्हणूनच हे साहित्य महाराष्ट्राच्या जगण्याचा संजीवक आधार आहे.''5 महाराष्ट्ररातील मध्ययुगीन वाङ्मय हे भक्तिसंप्रदायाने भारलेले आहे. भक्तिसंप्रदाय याच काळात अधिक विकसित झाला. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या कार्यातून लोकांना भक्तिमार्गाची गोडी लावली. याच काळात ओवी, अभंग, श्लोक, आर्या, गौळणी, भारूडे यांची निर्मिती झाली. संतांची वचन वाङ्मयरूपाने लोकांसमोर आली. ही सर्व वाङ्मय अध्यात्मरूपाने निर्माण झाली होती. सर्वसामान्य माणसालाही भक्ती करून परमेश्वराचे प्रेम मिळवता येते असे साधे सोपे तत्त्वज्ञान याच काळात संत वाङ्मयातून मांडले गेले. म्हणूनच येथे असे म्हणता येते की भक्तिसंप्रदायांचा विकास आणि प्रसार मध्ययुगीन काळात अधिक झाला.

भक्तिसंप्रदायामध्ये मध्ययुगीन कालखंडात नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय वारकरी संप्रदाय, दत्तसंप्रदाय, स्वामी समर्थ संप्रदाय यांची तात्त्विक आणि सामाजिक विचारांची बैठक पूर्ण झाली होती. समाजाला या सर्व संप्रदायाचे तत्त्वज्ञान पटलेले होते. इस्लाम राजवटीचा उदय याच काळात झाला होता. हिंदू राजवटीतील सत्तासंघर्षाचा फायदा अल्लाउद्दीन खिलजी याने घेतला होता. त्याने धर्म आणि राजकारण यात भेदभाव करून सत्ता काबीज केलेली होती. मध्ययुगीन काळात जे भक्तिसंप्रदाय उदयास आले त्यास तत्कालिन सामाजिक, राजकीय, वैचारिक, धार्मिक परिस्थिती कारणीभूत आहे. भक्तिसंप्रदायातील अनेक धार्मिक चळवळी याच काळात झाल्या, याबाबत डॉ. अशोक डोळस यांनी रा. र. गोसावी यांचे मत उद्धृत केलेले आहे ते याप्रमाणे, ''दक्षिण भारतातही या कालखंडापूर्वीच एका निराळ्या स्वरूपात इस्लामांचे अत्यंत प्रभावी हेतू बाळगून दक्षिण भारतात आलेले मुसलमान नंतरच्या काळात सूफींच्या रूपाने धर्मप्रचाराचे कार्य अत्यंत सावधगिरीने करू लागले होते. अल्लाउद्दीन दक्षिणेत येण्यापूर्वी कित्येक वर्ष सूफी संप्रदायाचे लोक महाराष्ट्रात आणि कर्नाटकात राष्ट्रकूट काळापासून येत होते. राजकीयदृष्ट्या आक्रमक विजेत्यांच्या आधी आलेल्या सुसंघटीत सूफी साधूंच्या धर्मप्रसाराच्या कार्यामुळे दक्षिण भारतात रुजल्यानंतर आक्रमक विजेत्यांच्या पाठोपाठ आलेल्या सूफींच्याही धर्मप्रसाराचे कार्य इतके प्रभावी आणि परिणामकारक ठरले की, त्यांच्या आत्मसाधनेचा रंग दक्षिणेबरोबर पुढे उत्तरेतील अध्यात्मसाधनेवर आणि वाङ्मयावर चढू लागला. दक्षिण भारतात इस्लामी सत्ता स्थापन झाल्यानंतर इस्लाम धर्माच्या प्रचाराचा वेग वाढला. त्याचा परिणाम तत्कालिन धार्मिक आणि सामाजिक परिस्थितीवर झाला व वेगवेगळे भक्तिपंथ निर्माण झाले. म्हणजे दक्षिण भारतात नाथपंथाचा उदय होण्याअगोदर वैष्णव, शैव, बौद्ध, जैन आणि इस्लाम धर्माचा प्रचार-प्रसार होत होता. या धार्मिक, सामाजिक परिस्थितीतून नंतर नाथ संप्रदाय उदयास आला.''6 या मतावरून असे स्पष्ट होते की, इस्लाम राजवटीचा प्रभाव हा भक्तिसंप्रदायावर पडलेला आहे. हिंदू धर्मातील भक्तिसंप्रदायाचे कार्य हे इस्लाम राजवटीला विरोधी होते. तसे पाहिले तर इस्लाम राजवटीमध्ये सामाजिक, राजकीय परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी भक्तिसंप्रदायाचे कार्य हे महानच होते. पूर्वीपासूनच भक्तिसंप्रदायाचे बीज हे वैदिक धर्मात आढळते. वैदिक धर्मातील यज्ञ, तंत्र, मंत्र, मूर्तिपूजा,

अवतार या कल्पना भक्तिसंप्रदायाला अधिक प्रेरणा देणाऱ्या आहेत, हेच मध्ययुगीन कालखंडातील भक्तिसंप्रदाय अभ्यासाने उलगडत जाते.

मध्ययुगीन भक्तिसंप्रदाय इतिहासातून अनेक प्रश्नांचा व समस्यांचा उलगडा होतो. याबाबत डॉ. यू. म. पठाण म्हणतात की, ''वाङ्मयेतिहास म्हणजे मराठी संस्कृतीचा एक महत्त्वाचा दस्तावेज आहे. संस्कृतीचे जे विविध घटक असतात किंवा ज्या घटकांनी संस्कृतीला - अधिक नेमकेपणाने सांगायचे तर निर्गुण संस्कृतीला सगुण आकार लाभतो, त्या अनेकविध घटकांपैकी मराठी साहित्य हा एक महत्त्वाचा घटक आहे. संस्कृतीचे समाजजीवन, धर्म, पंथ, तत्वज्ञान, लोकसाहित्य, लोकपरंपरा, व्यावसायिक व आर्थिक जीवन, लोककला, लोकसंगीत, विचारविश्व व लोकमानस, स्वभावविश्व, मानसिकता, रीतिभाती, जीवनशैली, भाषा व बोली, भौगोलिक पर्यावरण व त्याचा लोकजीवनावरील प्रभाव, आर्थिक स्थिती इ. कितीतरी पैलू असतात. त्या सर्वांनी मिळून संस्कृती बनते, सिद्ध होते.''7 मध्ययुगीन कालखंडात भक्तिसंप्रदायाच्या उदयाने मराठी साहित्यात मोलाची भर पडली आणि साहित्य निर्मिती मराठी संस्कृतीला अधिक चालना देणारी ठरली, हेच डॉ. यू. म. पठाण यांच्या मतावरून म्हणता येते.

मध्ययुगीन संतसाहित्याची इतिहास समीक्षा करताना डॉ. वा. पु. गिंडे म्हणतात की, ''मध्ययुगीन मराठी संतसाहित्य हा आपला फार मोठा सांस्कृतिक ठेवा आहे. संचित आहे. वारसा आहे. संतसाहित्याचे अध्यापन अलिकडच्या पिढीत दुर्मिळ होत चालले आहे. किंबहुना संतसाहित्य म्हटले की, लोकांच्या आतुर नजरा नाराज होताना दिसतात. अगदी राजवाडे, पु. ग. सहस्रबुद्धे यांच्यापासून अलिकडच्या पिढीतील पुरोगामी दृष्टिकोनातून संतसाहित्याकडे पाहणाऱ्या अभ्यासकांपर्यंत संतसाहित्य अधिक्षेपाचा विषय झालेला आहे. एका बाजूने उपासनेच्या अंगाने संतसाहित्याच्या प्रांगणात प्रवेश करणारे व चिकित्सक अभ्यासक अशा दोन वेगवेगळया अंगाने हा विचार झालेला आहे. भावनिक व बौद्धिक अशा दोन्ही अंगाने हा अभ्यास होत आलेला आहे. या दोन्हीचा समन्वय - सुसंवाद डॉ. शं. दा. पेंडसे. डॉ. रा. द. रानडे, प्रा. गं. बा. सरदार, प्रा.डॉ. व. दि. कुलकर्णी यांच्यासारख्यांच्या ग्रंथात आढळतो. काही चिकित्सा टाळून परंपरागत पद्धतीला चिकटून उपासनेच्या श्रद्धेच्या मार्गाने ज्ञानेश्वर-तुकोबांच्या वाङ्मय मंंदिराच्या दिशेने प्रवास करीत राहतात तर काहीजण मुख्यत्वे अभ्यासक बनून ज्ञानेश्वर-तुकोबा समजून घेण्यासाठी भाषा, व्याकरण आणि आजचा 'सामाजिक' दृष्टिकोन समोर ठेवून संतसाहित्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतात. अशा दोन्ही उपासक-अभ्यासक परंपरेची एकमेकांना साथ मिळाली तर ज्ञानेश्वर-तुकोबांच्या साहित्याचे मर्मबंध अधिक उलगडले जातील यासंदर्भात वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू वै. शं. वा. दांडेकर यांनी त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या संपादित प्रतीत तसे स्पष्ट म्हणून ठेवले आहे. ते म्हणतात, ''नुसता संशोधक बुद्धिमान असला म्हणजे त्याला ज्ञानेश्वरीचा अर्थ समजेलच असे नाही.'' मामासाहेब दांडेकर, केशवराव देशमुख, डॉ. रा. द. रानडे, स्वामी स्वरूपानंद ही आणि यासारखी मंडळी ज्ञानेश्वरीचे 'अंतरंग अधिकारी' होते. वाक्चातुर्य सुखी होण्याच्या दृष्टीनेच ज्ञानेश्वरीकडे वळलेल्या मंडळींना

तो आनंद मिळतोच.''४ भक्तिसंप्रदाय वाढीस लागण्यामध्ये संतांचे जसे फार मोठे योगदान आहे, त्याचप्रमाणे भक्तिसंप्रदायाला वाङ्मय रूप देण्याचे कार्य महाराष्ट्रातील आधुनिक लेखकांनी केलेले आहे. हा समीक्षात्मक विचार येथे डॉ. वा. पु. गिंडे यांनी मांडलेला आहे. एकूणच भक्तिसंप्रदाय मध्ययुगीन काळात अधिक विकसित झाला. वेगवेगळे संप्रदाय या काळात जनसामान्य लोकांत रुजले गेले. यादवी आक्रमणामुळे भयभीत जनतेला भक्तिसंप्रदायाने खूप मोठा आधार दिला हेच मध्ययुगीन भक्तिसंप्रदाय इतिहासामधून उलगडत जाते.

**आधुनिक भक्तिसंप्रदाय ः-**

एकविसाव्या शतकातील सांप्रतचा काळ हा अत्याधुनिक विज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा मानला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने एकविसाव्या शतकात महान प्रगती केलेली आहे तरी परमेश्वरावरील भक्तिभाव मानवाच्या मनात कायम आहे. विविध संप्रदायातील देवदेवता यांची भक्ती आजही आधुनिक काळात अधिक जोमाने केली जात आहे. आधुनिक काळातील भक्तिसंप्रदायाबद्दल श्री रामकृष्ण क्षीरसागर महाराज म्हणतात की, ''एकविसाव्या शतकातील सांप्रतचा काळ हा अत्याधुनिक विज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा मानला जातो. आजचा मानव तांत्रिक, वैज्ञानिक प्रगतीमध्ये रमलेला दिसतो. ही काळाची गरज आहे, परंतु सतत बौद्धिक निकषांवर घासून ज्ञान मिळविण्याच्या चिकित्सक वृत्तीमुळे तो श्रद्धेपासून, धर्मापासून दूर जात आहे. धर्मांची बंधने झुगारून दिल्याने धर्माचे अधिष्ठान सुटत चालले आहे. अनिर्बंध, मुक्त जीवनाची कल्पना मूळ धरू पहात आहे. पैसा प्रसिद्धी यांच्यामागे लागल्याने तो खऱ्या सुखाला पारखा झाला आहे. त्यातून भ्रष्टाचार गुन्हागारी यासारख्या घातक प्रवृत्ती समाजात फोफावू लागल्या आहेत. सर्व भौतिक सुखे मिळूनसुद्धा आजचा मानव मनःशांती हरवून बसला आहे. खोट्या सुखाच्या मागे धावता धावता मानसिक दौर्बल्याची शिकार झाला आहे. या मानसिक अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी मानवाला शाश्वत सुखाकडे नेणाऱ्या अध्यात्ममार्गावर चालण्याची गरज आहे. अध्यात्म प्रधान संस्कृती असलेला भारत एकमेव देश आहे. या देशात परमेश्वराने अनेकवेळा जन्म घेऊन वैदिक धर्माचे रक्षण केले. तसेच गुरूरूपात अवतार घेऊन भारतीयांना वेळोवेळी अध्यात्म मार्गावर वळवले आहे.''९ या मतावरून असे म्हणता येते की, एकविसाव्या शतकात मानवाने चंगळवादी भूमिका स्वीकारलेली आहे तरी पण परमेश्वर भक्तीवर त्याचा विश्वास आहे. तो भौतिक सुखासाठी धावपळ करीत आहे. या धावपळीच्या जीवनात त्याला भक्तिसंप्रदाय जीवन जगण्याचा खरा मार्ग दाखवत आहे. भारतीय संतांनी आणि पूर्वसुरींनी घालून दिलेला अध्यात्म मार्ग हाच जीवनाचा आधार आहे याची जाणीव एकविसाव्या शतकातील मानवाला झालेली आहे, असेच येथे म्हणता येते.

भक्तिसंप्रदायातील नवनवीन संप्रदाय आधुनिक काळात उदयाला आलेले आहेत. त्यात साई संप्रदाय, स्वामी समर्थ संप्रदाय हे अतिशय लोकप्रिय संप्रदाय आहेत. या संप्रदायातील अनेक भक्त चांगले आणि आदर्श जीवन जगत आहेत. महाराष्ट्राच्या जडणघडणीत मध्ययुगीन कालखंडात उदयास आलेले भक्तिसंप्रदाय आजही मोलाची भर घालत आहेत. नाथसंप्रदाय,

शैवसंप्रदाय, वैष्णवसंप्रदाय, दत्तसंप्रदाय या सर्वच संप्रदायांनी एकविसाव्या शतकात म्हणजे आधुनिक काळातही मोलाची भूमिका निभावलेली आहे. आज प्रत्येक माणूस कोणत्या न् कोणत्या संप्रदायाशी जोडलेला आहे. एकूण आधुनिक काळात ही भक्तिसंप्रदाय अधिक जोमाने विकसित होत आहे, असेच या अभ्यासाने येथे म्हणता येते.

**संदर्भ** ः-


1) 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', शेळके (डॉ) मोहन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.क्र. 26.
2) 'भक्तिआंदोलने शोध ः क्रांती प्रतिक्रांतीचा', डोळस (डॉ) अशोक, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती 2017, पृ.क्र. 13.
3) 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', जोशी प्र. न., स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2022, पृ.क्र. 20.
4) तत्रैव, पृ.क्र. 21.
5) 'वाङ्मय संस्कृती साद-संवाद', सहस्रबुद्धे (डॉ) अनिल, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती 2019, पृ.क्र. 64.
6) उनि., 'भक्तिआंदोलने शोध ः क्रांतीप्रतिक्रांतीचा', डोळस (डॉ) अशोक, पृ.क्र. 61.
7) 'संतसाहित्य ः शोध आणि बोध', पठाण (डॉ) यू. म., दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2014, पृ.क्र. 32.
8) 'संतसाहित्य मीमांसा' (भाषा, संप्रदाय आणि संशोधन), पठाण ताहेर एच. व कदम (डॉ) न. ब., (संपा) शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्रथमावृत्ती 2017, पृ.क्र. 17.
9) उनि., 'श्रीरामकृष्णउवाच', क्षीरसागर श्रीरामकृष्ण महाराज, प्रस्तावना, पृ.क्र. 4.


◆◆◆

# लोकवाङ्मय - रचना प्रकारबंध

**डॉ. पोपट सिनारे**

अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर

लोकवाङ्मय ते मैखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे घालत येणारा वाङ्मयप्रकार आहे. त्याचा कर्ता हा अनामिक असतो. कुणा एका व्यक्तीच्या मालकीचे हे लोकवाङ्मय असत नाही या लोकवाङ्मयाचे वेगवेगळे प्रकार सांगितले गेले आहेत. मराठी लोकसाहित्यात डॉ. दुर्गा भागवत, डॉ. प्रभाकर मांडे यांनी या लोकसाहित्याच्या संकलनाचे काम केले. लोकवाङ्मयाचे वेगवेगळे प्रकार अनेक अभ्यासकांनी सांगितले आहेत, "संवाद माध्यमाशी संबंधित, कथात्मक लोक्तवाङ्मय व लोकगीत असे लोकवाङ्मयाचे तीन वर्ग डॉ. प्रभाकर मांडे यांनी सांगितले आहे."१ डॉ. प्रभाकर मांडे यांच्याप्रमाणे डॉ. शरद व्यवहारे यांनी लोकगीत,लोककथागीत,लोककथा,लोकनाट्य,उखाणे,म्हणी आणि वाक्संप्रदाय असे लोकवाङ्मयाचे सहा प्रकार सांगितले आहे. डॉ. गंगाधर मोरजे यांनीसुद्धा या लोकवाङ्मयाचे काही प्रकार सांगितले आहेत. या लोकवाङ्मयाच्या प्रकाराविषयी डॉ. मोरजे म्हणतात की, "आजवर लोकवाङ्मयातील रचनाप्रकारांचे परंपरेने लोकगीत, लोककथा, उखाणे, श्रमगीते, जागरणगीते, पुराणकथा, वीरकथा, पोवाडे आदी अंगांनी वर्गीकरण केलेले आहे. याशिवाय वाङ्मयप्रकाराच्या आशयानुसार, रचनेनुसार, रूपबंधात्मक आदी अंगांनीही लोकवाङ्मय प्रकाराचे वर्गीकरण केले आहे."२लोकवाङ्मयाच्या वेगवेगळ्या अभ्यासकांनी वेगवेगळे घटक डोळ्यासमोर ठेवून लोकवाङ्मयाचे वर्गीकरण केले आहे. डॉ. गंगाधर मोरजे यांनी लोकवाङ्मयाचे परंपरेने जे प्रकार पडतात त्याविषयी माहिती दिली आहे. पण यापेक्षा लोकवाङ्मय रचनाप्रकाराच्या सादरीकरणावरून डॉ. गंगाधर मोरजे यांनी लोकवाङ्मयाचे दोन प्रकार सांगितले आहेत.

१. श्रमपरिहारार्थ रचले जाणारे प्रकार

२ विशिष्ट धार्मिक संप्रदायाशी संबंधित असणाऱ्या रचना असे दोन प्रकार सांगितले. या रचनाप्रकाराची सविस्ता माहिती आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१.श्रमपरिहारार्थ रचले जाणारे प्रकार :-

या प्रकारच्या रचना आत्मप्रकटीकरणासाठी निर्माण झालेल्या असतात. या रचनाप्रकाराविषयी डॉ. गंगाधर मोरजे म्हणतात, "कोणतेही शारीरिक, मानसिक काम करताना होणारी हालचाल, श्वासोच्छ्वासाचा चढउतार, कामासाठी वापरलेली साधने, कामाच्या वेळी निर्माण होणारा ताल, लय आदीनुसार रचनांचे संगीत, गेयता ठरत असते. तिच्याविषयी सुसंवादी राहून रचली जाणारी अशा प्रकारची रचना असते. अशा प्रकारच्या रचनेमुळे श्रम करणाराला एक प्रकारचे श्रमपरिहार झाल्याचे समाधान मिळते. या रचनाप्रकारात वाङ्मयनिर्मितीपेक्षा लय - तालाशी सुसंवाद राखून रचना बांधणे महत्त्वाचे असते."३ वरील विधानावरून आपणास असे लक्षात येते की, श्रमपरिहारासाठी ज्या रचना होतात. त्या स्त्री-पुरुष अशा दोन्होंसाठी होतात. या रचना

तयार होताना त्या कामाच्या स्वरुपानुसार तयार होतात. या रचनेमध्ये कामानुसार ताल,लय, संगीत आणि गेयता आदी बाबीना महत्त्व आहे. उदा. जात्यावरची गाणी. यामध्ये जात्याचा फिरण्याचा वेग या गोष्टीवर त्या रचनेची लय , ताल अवलंबून आहे. त्यानंतर मोटेवरची गाणी, भलरीगीत, भात झोडपणीची गीते, नावाड्याच्या व्यवसायसंबंधी गीते इ. श्रमगीते आहेत.

या श्रमगीतासाठी श्रोता असत नाही. त्यामुळे या रचना प्रेक्षकांसाठी किंवा श्रोत्यांसाठी सादर केल्या जात नाहीत. आत्मप्रगटीकरणासाठी या निर्माण झालेल्या असतात. काही गीतांना कालांतराने श्रोतावर्ग मिळालेला आहे. (ते कार्यक्रम पहायला आलेल्या व्यक्ती) यामध्ये मंगळागौरी, नागपंचमी, हादगा, मुला-मुलींच्या खेळण्यातील गाणी, झोपाळयावरची गाणी इ.रचना प्रकार यामध्ये समाविष्ट केले आहे. हे रचना प्रकार धार्मिक विधीशी निगडीत आहेत, हे रचनाप्रकार श्रमपरिहारासाठी नसले तरी यातून मनोरंजन होते. आणि या मनोरंजनासाठी असणारया रचनाप्रकारांना कधी-कधी श्रोताही मिळण्याची शक्यता असते.

२. विशिष्ट धार्मिक संप्रदायाशी संबंधित असणारे रचनाप्रकार :-

डॉ. गंगाधर मोरजे यांनी लोकवाङ्मय या दुसरया प्रकारात ज्या रचनांचा समावेश केला आहे. त्या धार्मिक संप्रदायाशी निगडीत आहेत. या रचनेचे सादरीकरण त्या त्या धर्मसंप्रदायाशी निगडीत आहे. याचे सादरिकरण धर्मसंप्रदायाशी संबंधित आहे. याविषयी डॉ. गंगाधर मोरजे म्हणतात, "प्रामुख्याने धार्मिक श्रद्धेने, विशिष्ट आराध्य दैवताने कृपाशिर्वाद देऊन आयुष्य सुखमय, शांतीमय करावे अशी अपेक्षा असते. अशा प्रकारचे कार्यक्रम घरात विवाह संपन्न झाल्यावर,मूल झाल्यावर, नवस फेडणे आदी कारणानिमित्त घातले जातात ." ४ या रचनांमध्ये सादरीकरण हे वेगवेगळया ठिकाणी होत असते. या लोकवाङ्मयप्रकारात जागरण घालणे, गोंधळ, भराड, कीर्तन इ. कलाप्रकारांचा समावेश होतो. वरील प्रकारच्या रचना सादरीकरण एक विशिष्ट प्रकारचा श्रोता असतो. जागरण हे खंडोबाचे घातले जाते. गोंधळ हा तुळजापूरच्या भवानी व रेणुकाचा घातला जातो. भराड हे भैरवनाथाचे घातले जाते. वरील तीनही प्रकार सादर होताना वेगवेगळया वाद्यांचा उपयोग केला जातो. या कार्यक्रमामध्ये उपासक देवतेला महत्त्व असते. डॉ. गंगाधर मोरजे यांनी कीर्तन हा जो कलाप्रकार सांगितलेला आहे त्या कीर्तनाच्या ही वेगवेगळया परंपरा आहेत. या परंपरेत नारदीय संप्रदायातील कीर्तन, वारकरी संप्रदायातील कीर्तन, रामदासी संप्रदायातील कीर्तन, ख्रिस्ती संप्रदायातील कीर्तन इ. वेगवेगळया परंपरा, वेगवेगळया पंथीय संप्रदाय आढळतात. या कीर्तन कलाप्रकाराविषयी डॉ. गंगाधर मोरजे म्हणतात की, "परमेश्वर भक्तीचा एक वेधक आविष्कार, धर्मोपदेशाचे तसेच पारमार्थिक आणि नैतिक तत्त्वांच्या प्रतिपादनाचे प्रभावी साधन, उदबोधन आणि रंजन त्यांच्या सुमेळातून समाज शिक्षणाचे कार्य करणारे एक लोकप्रिय लोकवाङ्मयाचे साधन या नात्याने कीर्तन संस्थेचे महत्त्व आहे."५या वेगवेगळया संप्रदायातील कीर्तनाचे सादरीकरण हे वेगवेगळे असते. एकूण या परंपरेविषयी जर आपण पाहिले तर ही परंपरा लोकसमूहाच्या खालच्या

स्तराची असलेली दिसत नाही. ज्या समुदायावर धार्मिक संस्कार झाले आहेत, जो समूह खाऊन-पिऊन सुखी आहे अशा समुदयामध्ये ही परंपरा आपणास पहायला मिळते.

एकूणच वरील विवेचनावरून आपणास असे लक्षात येते की, लोकवाङ्मयाचे प्रकार करताना डॉ. गंगाधर मोरने यांनी सादरीकरणाला महत्त्व दिले आहे. सादरीकरण केंद्रस्थानी ठेवून त्यांनी हे दोन रचनाबंध सांगितले आहेत.

संदर्भ ग्रंथ :-


१) व्यवहारे शरद : लोकसाहित्य संकल्पना स्वरूप,तिरुपती प्रकाशन परभणी व्दितीय आवृत्ती २००४ पृ.क्र. ९०

२) मांडे प्रभाकर – लोकसाहित्याचे स्वरूप , गोदावरी प्रकाशन प्रथम आवृत्ती १९७८ पृ.क्र.१७३

३) मोरजे गंगाधर – लोकवाङ्मयशास्त्र, पद्मगंधा प्रकाशन,पुणे प्रथमावृत्ती २००३ पृ.क्र.१११

४) मोरजे गंगाधर- तत्रैव, पृ.क्र.११२

५) मोरजे गंगाधर- तत्रैव, पृ.क्र.११३


◆◆◆

# सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांचे समाजपरिवर्तनाच्या चळवळीतील योगदान

**डॉ.राजेश्वर दुडूकनाळे**
सहयोगी प्राध्यापक
देगलूर महाविद्यालय, देगलूर

एकोणिसावे शतक भारताच्या इतिहासात प्रबोधनाचे, जागृतीचे शतक म्हणून ओळखले जाते. सन १८१८ मध्ये पेशवाईचा राजकीय अस्त झाला. परिणामी इंग्रजी साम्राज्यामुळे भारतीय समाज अनेक अंगांनी प्रभावित होऊ लागला. इंग्रजी साम्राज्याचे अनुषंगिक परिणाम म्हणून म्हणा किंवा इंग्रजी साम्राज्याची गरज म्हणून म्हणा भारतात त्यांनी शिक्षणाचे सार्वत्रीकरण केले. इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडलेली एक पिढी भारतीय समाजाचा नव्याने विचार करू लागली. महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, राजा राममोहन रॉय, गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, राजर्षी शाहू महाराज आदी समाजसुधारकांनी या शतकात समाजजागृतीचे कार्य हाती घेतले. महात्मा फुले यांनी क्रांतिकारी समाजसुधारक म्हणून या एकोणिसाव्या शतकावर आपली नाममुद्रा उमटवली आहे.

आधुनिक काळातील भारतीय शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीचे प्रवर्तक म्हणून महात्मा जोतीराव फुले ओळखले जातात. फुले हे मानवी जीवनाचा वस्तुनिष्ठ, मूलगामी विचार करणारे तत्त्वचिंतक आहेत. छत्रपती शिवरायांच्या इतिहासातून प्रेरणा घेऊन आणि थॉमस पेनच्या 'राईट्स ऑफ मॅन' या ग्रंथाने प्रभावित होऊन त्यांनी आपल्या समाजकार्याला सुरुवात केली. सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध बंड पुकारले. मानवी स्वातंत्र्याचा जयघोष केला.

**सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती :**

सावित्रीबाई फुले यांच्या काळातील सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. १८१८ला पेशवाईचा राजकीय अस्त झाला होता. पेशवाईने वैदिक धर्मव्यवस्था मजबूत करण्याचे काम केले. त्यामुळे शेतकरी, कष्टकरी, महिला, वैदिक धर्मव्यवस्थेने घोषित केलेले शूद्रातिशूद्र अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेले होते. तत्कालीन समाजव्यवस्थेत ब्राह्मण परुष वगळता समाजातील इतर कोणत्याही घटकाला शिक्षण घेण्याचा, ज्ञान संपादन करण्याचा अधिकार नव्हता. तथाकथित धर्मशास्त्रानुसार अध्ययनाचा आणि मार्गदर्शन करण्याचा अधिकार पुरोहीत वर्गाकडे होता. परिणामी बहुसंख्य समाज ज्ञानापासून वंचित राहिला. धार्मिक आणि जातीय द्वेषाने समाजाला ग्रासलेले होते. शूद्र, अस्पृश्य आणि महिला वर्गाला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा नैसर्गिक हक्कच नाकारण्यात आलेला होता. अर्थातच, या शोषित वर्गाच्या शैक्षणिक, सामाजिक मागासलेपणाची कारणं पुरोहितांच्या धर्मशास्त्रामध्ये आहेत, याची जाणीव सावित्रीबाई फुले यांना झाली.

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले :**

भारताच्या परिवर्तनवादी इतिहासातील अनमोल रत्न म्हणजे सावित्रीबाई फुले. ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील खंडोजी नवसे हे नायगावचे इनामदार होते. माळी समाजामध्ये जन्मलेल्या सावित्रीबाईवर बालपणी आई-वडीलांकडून चांगले संस्कार झाले. त्या

काळातल्या रीतिरीवाजाप्रमाणे १८४० साली त्यांचा जोतीराव फुल्यांशी विवाह झाला. सावित्रीबाई फुले या खऱ्या अर्थाने भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीच्या प्रणेत्या ठरतात. कारण त्यांनी महात्मा फुल्यांच्या खांद्याला खांदा लावून स्वतःला समाजकार्यात पूर्णपणे झोकून दिले.

ह्या परिवर्तनाच्या चळवळीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे योगदानही अनन्यसाधारण आहे. भारतीय समाजातील पहिली शिक्षिका म्हणून बहुजनांच्या उन्नतीसाठी केलेले समाजकार्य अत्यंत क्रांतिकारी आहे. मूल्यसंपन्न समाजनिर्मितीसाठी केलेली धर्मचिकित्सा, विद्रोही जाणिवा व्यक्त करणाऱ्या साहित्याची निर्मिती, गुलामीला आपल्या कृतीतून दिलेले उत्तर, विद्रोही विचारधारेला संपन्न करणारे ठरते. सावित्रीबाई फुले यांच्या अध्यापनातून घडलेल्या मुक्ता साळवे नावाच्या मुलीने १८५५ मध्ये मांग-महार यांच्या दुःखाविषयी निबंध लिहून बंडाची भूमिका घेतली. १८८५ मध्ये ताराबाई शिंदे यांनी लिहिलेला 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंधही विद्रोही परंपरेला सशक्त बनविणारा आहे. या निबंधातून लेखिकेने मांडलेले विचार अत्यंत क्रांतिकारक आहेत. प्रस्थापित शोषणवादी, पुरुषप्रधान व्यवस्थेला आव्हान देणारे आहेत. स्त्रीला 'देवी' किंवा 'दासी' समजणाऱ्या भारतीय समाजाला तिच्या 'माणूस' असण्याची जाणीव त्यांनी या निबंधातून करून दिली आहे. महात्मा फुले यांनी यामुळेच या निबंधाचा गौरव केला.

**काळाच्या पुढे जाऊन विचार करणारे व्यक्तिमत्त्व :**

ज्ञानभाषा म्हणून सर्वत्र इंग्रजीचा बोलबाला आहे. त्यामुळे पहिलीपासून इंग्रजी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. दीडशे वर्षापूर्वी इंग्रजी भाषेचे महत्त्व सांगताना सावित्रीबाई फुले म्हणतात,

"स्वावलंबनाचा । उद्योग प्रपंच || ज्ञान धन संच | करी यत्ने ।।
विद्येविण गेले । वाया गेले पशू ।। स्वस्थ नका बसू । विद्या घेणे ।।
शुद्र अतिशुद्र दुःख निवाराया । इंग्रजी शिकाया संधि आली ।।
इंग्रजी शिकूनी जातीभेद मोडा। भटजी भारुडा | फेकुनिया || "[१]

सावित्रीबाईंच्या प्रस्तुत कवितेचा आशय काळाची पाऊले ओळखणारा आहे. ज्ञानाचे महत्त्व ओळखणारा आहे. या देशातल्या शूद्रातिशूद्रांना वर्णव्यवस्थेतून मुक्त करावयाचे असल्यास इंग्रजी शिक्षणावाचून पर्याय नाही, अशी त्यांची ठाम भूमिका होती. म्हणून सावित्रीबाईंच्या कवितेचा आशय कर्मकांड गाडणारा आणि नवी मूल्ये निर्माण करणारा आहे.

**वर्णव्यवस्थेचा धिक्कार, समतेचा पुरस्कार :**

सावित्रीबाई फुले सामाजिक विषमतेचा धिक्कार आणि समतेचा हीरारीने पुरस्कार करतात. भारतातील बहुजन समाजाच्या सर्वांगीण मागासलेपणाची पाळमूळ ब्राह्मणी धर्मव्यवस्थेमध्ये आहेत, हे सावित्रीबाईंनी चांगलेच ओळखले होते. त्यामुळे काव्याच्या माध्यमातून त्यांनी विषमतावादी, वैदिक संस्कृतीवर जोरदार हल्ला चढवला आहे. शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांवर या व्यवस्थेने कसा जुलूम केला हे सांगताना त्या म्हणतात...

"टिळा लावला आर्य जेते म्हणूनी । म्हणे उच्च आम्ही, कडू शूद्र योनी ।।
गुलामी रुढी लादूनी, धर्म सांगे । पशुतुल्य जिणे स्त्रिया शूद्र भोगे ।।"[२]

'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' ह्या सावित्रीबाईंच्या काव्यसंग्रहाला सामाजिक, धार्मिक वास्तवाचा भक्कम असा आधार आहे. जणू एकोणिसाव्या शतकातला सामाजिक इतिहास त्यांनी या काव्यसंग्रहातून मांडला आहे.

**विज्ञानवादाचा स्वीकार - मूर्तिपूजेचा धिक्कार :**

सावित्रीबाईंनी दैववादावर हल्ला चढवला आहे. देव - दैवाचे भांडवल करुन जगणाऱ्या ऐतखाऊ लोकांची स्वार्थी वृत्ती उघडी पाडली आहे. अर्थात मूर्तिपूजेचा धिक्कार करताना, कर्मकांड नाकारताना सावित्रीबाई निखळ अशा विज्ञानवादाचा स्वीकार करतात.

"धोंडे मुले देती | नवसा पावती ।

लग्न का करती । नारी-नर?"३

असा प्रश्न त्या विचारतात. माणसामध्ये देव शोधण्याचा वास्तववादी संदेश त्या देतात. मूर्तिपूजेने बहुजन समाजाचे कधीच भले होणार नाही त्याची जाणीव त्यांना होती. मूर्तिपूजा हे वैदिक धर्माने बहुजनांना लुबाडण्यासाठी निर्माण केलेले साधन आहे; हे वास्तव त्यांना माहित होते. म्हणून सावित्रीबाई दैववादावर, मूर्तिपूजेवर आसूड ओढतात आणि प्रयत्नवादाचा स्वीकार करतात.

सावित्रीबाईच्या काळामध्ये अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्रय, वैचारिक मागासलेपण, केशवपणाची चाल, बालाविवाहाची प्रथा, जरठविवाह, अस्पृश्यता, महिलांचे शोषण अशा अनेक समस्या अस्तित्त्वात होत्या. किंबहुना सनातनी लोकांनी यालाच धर्म म्हणून धर्मशास्त्रामध्ये मान्यता दिली होती. बालविधवांचा प्रश्न आणि केशवपणाची चाल या स्त्रियांच्या प्रश्नाविरुद्ध सावित्रीबाईंनी आवाज उठवला. १८५१ च्या आसपास चार वर्षे वय असणाऱ्या बालविधवांची संख्या १३,८७८ इतकी प्रचंड होती. हे सावित्रीबाईंना पाहवले नाही. एवढ्या लहान वयात विधवा झाल्या नंतर सक्तीने केशवपण केले जाई. या प्रथेच्या विरोधात सावित्रीबाई आवाज उठवतात. एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्रियांचे प्रश्न मांडण्यासाठी त्यांनी काव्यलेखन केले. त्यांची ही कविता नव्या जीवनजाणिवा व्यक्त करणारी आणि सामाजिक सुधारणांचा आग्रह धरणारी आहे.

**परिवर्तनासाठी प्राणही देऊ ! :**

महात्मा फुल्यांना सावित्रीबाईंनी तीन पत्रे लिहिली आहेत. या त्यांच्या पत्रांमधून समाजकार्यावर, समाज परिवर्तनावर त्यांची असलेली ठाम भूमिका प्रत्ययाला येते. धर्मांध आणि सनातनी लोकांना सावित्रीबाईंचा हा पुरोगामी, समता- स्वातंत्र्यवादी विचार पचणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी त्यांचा छळ सुरू केला. सावित्रीबाईंनी या छळाला भीक घातली नाही. उलट त्या अधिक खंबीर होत गेल्या. १० ऑक्टोबर १८५६ला ज्योतीरावांना लिहिलेल्या पत्रामध्ये त्या म्हणतात "यावरून तुमच्या ध्यानात येईल की पुण्यात "आपल्या विषयी" दुष्टावा माजविणारे विदूषक पुष्कळ आहेत. तसेच येथेही आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे? सदासर्वदा कामात गुंतावे. भविष्यातले यश आपलेच आहे."४ यातून सावित्रीबाईंची समाज सुधारणेची तळमळ लक्षात येते. अर्थात सावित्रीबाई या फक्त बोलक्या लेखिका नव्हत्या. 'आधी केले मग सांगितले' अशी त्यांची वृत्ती होती. म्हणून त्यांच्या प्रत्यक्ष समाजकार्याचे प्रतिबिंब म्हणजेच त्यांचे हे लेखन होय.

**सावित्रीबाईंचे सामाजिक कार्य :**

सामाजिक, शैक्षणिक विकासाच्या दृष्टिकोनातून सावित्रीबाईंचे कार्य अनन्यसाधारण आहे. अनाथ बालकांसाठी आश्रम काढला, विधवा महिलांची बाळंतपण स्वतः केली. शूद्रातिशूद्रांना समाजाच्या मुख्य

प्रवाहामध्ये आणण्यासाठी, त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करण्यासाठी अनेक शाळा काढल्या. दुष्काळ निवारणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. बालहत्त्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. भारतामध्ये सगळीकडे सामाजिक विषमतेचे थैमान माजलेले असताना सावित्रीबाईंनी मात्र या वर्णवादाच्या विरोधात निर्णायक लढा दिला.

सावित्रीबाईंच्या या सामाजिक, शैक्षणिक कार्याचा परिणाम म्हणून अनेक महिला लेखिका, सुधारक उदयाला आल्या. सत्यशोधक समाजाच्या सभासद वजुबाई निंबणकरीण, पंडिता रमाबाई, डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावरही या कार्याचा परिणाम जाणवतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सावित्रीबाईंच्या शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकणारी मुक्ता साळवे १८५५ साली 'मांगमहारांच्या दुःखाविषयी निबंध' लिहून आमचा धर्म कोणता ? असा प्रश्न विचारते. १८८२ साली ताराबाई शिंदे 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध लिहून वैदिक व्यवस्थेला हादरा देतात. सावित्रीबाई रोडे १९११ साली सत्यशोधक समाजाचे नेतृत्व करतात. १९०७ साली तान्हाबाई बिर्जे 'दीनबंधू' च्या संपादनाची जबाबदारी घेतात. ही सर्व सावित्रीबाईंचा कार्याची फळं आहेत.

सावित्रीबाईंच्या शिक्षणास १८४१ला प्रारंभ झाला. १८४७ मध्ये त्यांनी नॉर्मल स्कूलमधून अध्यापनासाठी प्रशिक्षण घेतले. १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथे भिडेवाड्यात मुलींच्या पहिली शाळा सुरू झाल्यानंतर त्या शिक्षिका म्हणून अध्यापन कार्य करू लागल्या. १ मे १८४९ पुणे येथे उस्मान शेख यांच्यावाड्यात प्रौढांसाठी शाळा सुरू झाल्यानंतर सावित्रीबाईंनी अध्यापन कार्य केले. १८४९-५० पुणे-सातारा-नगर या जिल्ह्यातील शाळांमध्ये अध्यापन केले. १८५२ ला शाळांची तपासणी झाली. त्यामध्ये आदर्श शिक्षिका म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला. १२ फेब्रुवारी १८५३ मेजर कॅन्डी यांच्या हस्ते फुले दांपत्याचा विश्रामबाग वाड्यात गौरव करण्यात आला.

१८५३ मध्ये बालहत्त्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून उपेक्षित महिलावर्गाला न्याय दिला. १८५५ साली शेतकरी व मजूर स्त्री-पुरुषांसाठी रात्रशाळा सुरू करून अध्यापन कार्य केले. १८६४ सालीं अनाथ बालकाश्रम चालविला. १८७५ ते १८७७ पुणे परिसरात ५२ अन्नछत्रे उघडून सत्यशोधक समाजातर्फे चालवलेल्या दुष्काळ निवारण कार्याचे त्यांनी नेतृत्व केले. ४ फेब्रुवारी १८८९ दत्तकपुत्र यशवंतरावांचा ससाण्यांच्या मुलीशी मिश्र विवाह घडवून आणला. १० मार्च १८९७ रोजी प्लेगमुळे त्यांचा मृत्यू झाला. भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे हे समाजकार्य लक्षात घेता सावित्रीबाईचं खऱ्या अर्थाने विद्येच्या प्रेरणाशक्ती ठरतात.

**फातिमा शेख :**

भारताच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील समाजसुधारक म्हणून फातिमा शेख यांचा उल्लेख करावा लागतो. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या त्या सहकारी होत्या. फुले दांपत्याने शिक्षिका तयार करण्यासाठी जे 'नॉर्मल स्कूल' काढले त्यात प्रशिक्षण घेतलेल्या त्या पहिल्या शिक्षिका होत्या. आधुनिक भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका म्हणून त्यांची असलेली ओळखही अत्यंत महत्त्वाची आहे. फातिमा शेख यांचा जन्म ९ जानेवारी १८३१ मध्ये पुण्यात झाला असे मानले जाते. उस्मान शेख हे त्यांचे भाऊ होते.

१ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली. या शाळेत फातिमा शेख या शिक्षिका म्हणून कार्य करू लागल्या. ही बाब काळाचा विचार करता अत्यंत क्रांतिकारी होती. ही शाळा सुरू करून समाजपरिवर्तनाचा वसा घेतल्यानंतर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना गृहत्याग करावा लागला. अशा कठीण प्रसंगी त्यांना फातिमा शेख आणि उस्मान शेख यांनी साथ दिली. फुले दांपत्याने उस्मान शेख यांच्या घरी वास्तव्य केले. फातिमा शेख यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्यानं शिक्षणाच्या कामाला सुरुवात केली. त्यांनी सर्व धर्माच्या आणि जातीच्या मुला-मुलींना शिकवले.

फातिमा शेख यांनी आयुष्यभर मानवतेसाठी काम केलं. त्यांनी लोकांच्या घरोघरी जाऊन उपेक्षित वर्गाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यामुळे कर्मठ लोकांकडून त्रासही सहन करावा लागला. सत्यशोधक समाजाच्या कामात देखील त्यांनी सहभाग घेतला. सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांनी मिळून दलित, मुस्लिम स्त्रिया आणि बालके यांच्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता त्यांना शिक्षित करण्याची जबाबदारी घेतली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात स्थापन केलेल्या पाच शाळांमध्ये त्यांनी अध्यापनाचे काम केले.

सावित्रीबाईंचा फातिमा शेख यांच्यावर किती विश्वास होता, ते एका पत्रातून समजते. सावित्रीबाईंनी महात्मा फुल्यांना १० ऑक्टोबर १८५६ रोजी लिहिलेल्या एका पत्रात त्या म्हणतात की, "मी परिपूर्ण दुरुस्त होताच पुण्यास येईन. काळजीत असू नये. फातिमास त्रास पडत असेल पण ती कुरकुर करणार नाही."[५] **माहेरी असताना सावित्रीबाई आजारी पडल्या. याकाळात त्यांनी पत्राद्वारे आपल्या भावना व्यक्त केल्या. आपल्या अनुपस्थितीमध्ये फातिमा शेख आपल्या सर्व सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळतील, याची खात्री त्यांना होती.** फातिमा शेख या सावित्रीबाईंच्या खांद्याला खांदा लावून वंचिताच्या हक्कासाठी अखेरपर्यंत लढल्या. त्याकाळातील सामाजिक आणि धार्मिक भेदाभेदाच्या पुढे जाऊन फातिमा यांनी मानवतेची सेवा करण्याचे महान कार्य केले आहे.

बीबीसी मराठीने 'सावित्रीच्या सोबतीनी' या सदराखाली दहा भागांची खास मालिका चालवली. त्यात फातिमा शेख यांचाही समावेश आहे. उपेक्षित महानायीकांचे जीवनकार्य यातून लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न बीबीसीने केला आहे. २०१४ मध्ये भारत सरकारने फातिमा शेख यांच्यांवरील धडा आणि छायाचित्र उर्दू पुस्तकांमध्ये समाविष्ट केले होते. तसेच ९ जानेवारी २०२२ रोजी गुगलने फातिमा शेख यांना त्यांच्या १९ व्या जयंतीनिमित्त डूडलद्वारे सन्मानित केले आहे.

**संदर्भ सूची :**

१. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय : डॉ. मा. गो. माळी (सं.), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पाचवी आवृत्ती २०११, पृ. क्र. ८० (काव्यफुले-२३)
२. तत्रैव : पृ. क्र. १३५ (बावनकशी सुबोध रत्नाकर -८२)
३. तत्रैव : पृ. क्र. ७९ (काव्यफुले-२२)
४. तत्रैव : पृ. क्र. १२९ (सावित्रीबाईंची पत्रे -७४)
५. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय : डॉ. मा. गो. माळी (सं.), उपनि. पृ. क्र. ७३ (सावित्रीबाईंची पत्रे)

◆◆◆

# lar jfonklkP;k thoudk;kZph eksSfydrk

**MkW- xtkuu ukenso tk/ko**
**izkpk;Z] Jh f'kokth dyk] dkf.kT; o foKku egkfo|ky;] eksrkG**

**प्रस्तावना :**

संत या संज्ञेला धार्मिक, ऐतिहासिक आणि सामाजिक दृष्टीने विशिष्ट असा अर्थ आहे. संत हे समाजाला दिशा दाखवतात. चुकलेल्या व अज्ञ, अडाणी समाजाला सतत मार्गदर्शन करतात. संतांचे कार्य समाज उद्धारासाठी सतत काम करीत असते. संतांची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करतांना सांगोवेसे वाटते की, संत हे गीतेतील भक्त, ज्ञानी, स्थितप्रज्ञ असतात. हिच संतांची लक्षणे बघावयास मिळतात. हीच संतांची गुणवैशिष्ट्ये आहेत. भारतीय भाषातही कबीर, मीरा, नरसी मेहता यांच्यासाठी संत ही संज्ञा उपयोगात आणली जाते.

महाराष्ट्रात निवृत्तीनाथापासून निळोबारायापर्यंत अनेक संत होवून गेले. २३ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे कार्य सुरू होते. ही एक प्रकारे फार मोठी भक्तिचळवळ होती. या चळवळीत अनेक जातींचे, धर्माचे संत सहभागी झाले होते. महाराष्ट्राप्रमाणे भारतातही संतांनी धार्मिक प्रबोधनाचे कार्य पार पाडण्यासाठी एक मोठे, व्यापक भक्तीआंदोलन सुरू केले होते. संतांनी जनसामान्यांना खोट्या धर्मश्रद्धांकडून डोळस धर्मनिष्ठांकडे वळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. जातिधर्माच्या नावाखाली समाजांची होणारी अंतर्गत फाळणी टाळण्यासाठी संतांच्या शिकवणुकीचा मोठा हातभार लागला.

अशातच उत्तर भारतात संत कबीर, संत रवीदास, नरसी मेहता यांचा काळ चौदाव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत मानण्यात येतो. या शतकातील आपण केवळ संत रविदास यांचे जीवनकार्य व त्यांच्या कार्याची मौलिकता प्रस्तुत लेखात अभ्यास, चिंतनासाठी, व विवेचनासाठी घेतलेली आहे. संत रविदास यांचे जीवनकार्य फारच प्रेरणादायी व बहुकल्याणकारी आहे. संत रविदास यांनी आपल्या वैयक्तिक जीवनात व अवतीभवतीच्या लोकांच्या जीवनात महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. संत रविदास यांच्या कार्यामुळे संत वाङ्मयात एका नव्या युगाची सुरूवात आपणास बघावयास मिळते.

**उत्तर भारतातील संतांची परंपरा आणि संत रैदास:**

स्वामी रामानंद हे १५ व्या शतकातील १ ले संत. ते भक्ती संप्रदायातील थोर संत होते. या संत परंपरेत संत रविदासाचा समावेश असल्याचे आढळून येते.

महाराष्ट्रात संत रविदास अथवा रोहीदास या नावाने ओळखले जाणारे संत उत्तर भारतात संत रैदास या नावाने ओळखले जातात. संत रविदास यांचे जीवन खुपच प्रेरणादायी आणि महत्त्वपूर्ण होते. त्यांनी आपल्या जीवनात असे काम केले आहे की, त्यांनी समाजात एका नव्या युगाची सुरूवात केली आहे. यामुळे संत रविदास यांचे कार्य महाराष्ट्र, पंजाब, गुजरात व राजस्थान या प्रांतात आढळून येते.

जगातील महान संत, संत मिराबाई तर त्यांना गुरूच मानत असे. संत रविदास यांची 'रविदास की बानी' या त्यांच्या रचनांचा संग्रह प्रसिद्ध आहे. सत्संगतीचा परिणाम झाल्यामुळे ते वयाच्या १२ व्या वर्षापासून रामाची पुजा करू लागले. त्यांचे जीवन अनासक्त होते. त्यांना त्यांच्या जीवनात विरक्ती आलेली होती. संत रविदास सतत देवपुजा करीत. त्यांचे अनेक वर्ष काशी, वाराणशी या परिसरात गेले. संत रविदासाची ईश्वराप्रतीची श्रद्धा व प्रार्थना ही उच्चप्रतीची व श्रेष्ठ होती. त्यांचे सामाजिक व आध्यात्मिक कार्य बघून लोक त्यांच्यापुढे नतमस्तक होत. संत

रविदासांनी गरीब व असाहाय्य लोकांसाठी कार्य केले. त्यांना मदत केली व त्यांना सन्मान मिळेल असे कार्य केले. जातिव्यवस्थेच्या विरूद्ध आवाज उठविला. जाति व्यवस्थेच्या विरूद्ध आवाज उठविला. जातिव्यवस्थेच्या विरूद्ध आवाज उठवणारे ते महान क्रांतिकारी संत आहेत. संत रविदास नेहेमीच सांगत की, सर्वच लोक ही देवाचीच लेकरं आहेत. त्यामुळे कुणीही भेदभाव करू नये. त्यासाठी त्यांनी आध्यात्मिक कार्य केले. संत रविदासाचे प्रभावित करणारे कार्य हे निर्मळ, शुद्ध, पवित्र व परोपकारी होते. ते मोठ्या मनाचे व उदार अंत:करणाचे देवहृदयी व निष्काम कर्मयोगी होते.

**संत रविदासाची विचारसरणी व त्यांचे आध्यात्मिक कार्य :**

प्रभू की महिमा गावो
रविदास प्रभू की महीमा गावो।
प्रभु की महीमा से ही
सारा जगत उपजा है।
आत्मग्यान की प्राप्ती हो तो
प्रभू की महिमा को समझो
आत्मग्यान से ही प्रभु की महीमा को प्राप्त करो।

प्रेम की राह पर चलो
प्रभु की महिमा को गावो
प्रेम से ही
प्रभु की महिमा को प्राप्त करो

एकता की राह पर चलो
प्रभु महिमा से गावो
एकता से ही
प्रभु की महिमा को प्राप्त करो।

ईश्वर हेच अंतिम सत्य आहे. आत्मज्ञानासाठी प्रत्येकाने स्वत:तील अहंकार, राग, लोभ सोडला पाहिजे. देवाचे रूप अविनाशी व अवर्णनीय आहे. देवाच्या रूपाला बघण्यासाठी, देवास प्राप्त करण्यासाठी जीवनातील काठीण्य कमी करण्यासाठी आपल्यातील वाईट गोष्टीचे विसर्जन केले पाहिजे. देवाची भक्ती केली पाहिजे. त्या भक्तीत साधना, आराधना, प्रार्थना करण्यासाठी तुमची विचारशक्ती खुपच महत्त्वाची असते. तुमच्या विचारसरणीत शुद्धता व पवित्रता असावी. संत रविदास म्हणतात की, जोपर्यंत नदी सागरात विलीन होत नाही तोपर्यंत नदीच्या ठिकाणी खळखळाट असतो. हा खळखळाट म्हणजे पोक्तपणा नसतो तर तो एक प्रकारे उथळपणा असतो. मानवाने मानवावर प्रेम केले पाहिजे. तसे वागणे म्हणजे ईश्वर प्राप्त करणे होय. संत रविदास म्हणतात की, चर्मकर्म करणे हाच माझा धर्म आहे. याने माझा चरितार्थ चालतो. जीवन तरून जाण्यासाठी भवसागर पार करण्यासाठी ईश्वराची मदत लागते. म्हणून ते एक थोर संत होते, कवी होते. त्यामुळेच त्यांनी समाजसेवा केली. त्यांच्या जगण्यात आणि

जीवनात परमार्थ पदोपदी जाणवतो. ते धर्म आदेश करीत. माणसाचे मोठेपण अधोरेखित करतांना संत रविदास म्हणतात की, मानवी जीवन हे जीवनमूल्यांवर आधारित असावे. जीवन जगतांना एक पक्की विचारधारा असावी. विचारधारेतून मूल्यात्मक जीवन समाजापुढे उभे करता यावे. त्याच मूल्यात्मक विचारांचा प्रत्यय साहित्यातून, कवितेतून व्यक्त व्हावा. तसा प्रत्यय आपणास त्यांच्या कवितेतून आल्याशिवाय रहात नाही.

**संत रविदासाची उत्कट भक्ती :**

संत रविदास यांच्या भक्तीचे विशेष पैलू सांगतांना अतिशय प्रेरणादायी उदाहरण देता येतील. संत रविदासाच्या भक्तीचा महिमा, प्रेम आणि समर्पण, आत्मनिरीक्षण, ज्ञान व अनुभव, सेवा आणि ध्यान, सत्य आणि विलय असे भक्ती अष्टांग मार्ग त्यांनी सूचविले. देव चराचरात आहे. देव प्राप्तीसाठी ज्ञान प्राप्त करावे. ईश्वराशी एकरूप होण्यासाठी प्रार्थना करावी. देवास शरण जावे. अहंकार, क्रोध, मत्सर, द्वेष सोडावा, प्रेम समर्पण भाव याचा जास्तीत जास्त योग्य वापर करावा. देवाची प्राप्ती हीच आपली मुक्ती आहे. जीवनात व संसारात आसक्ती नको, देवाची खरी आस असावी. त्यासाठी भक्तीची कास सोडू नये.

अब कैसे रामरत लगी
प्रभुजी तूम चंदन हम पानी
जाकी अंग अंग बास समानी।।
प्रभूजी तूम घन हम बन मोरा
जैसे चित्तवन चंद चकोरा।।
प्रभूजी तुम दीपक हम बाती
जाकि ज्योति बरे दिप ताती
प्रभुजी तुम मोती हम धागा
जैसे सोनाही मीलन सुहागा
प्रभुजी तुम स्वामी हम दासा
ऐसी भगति करे रैदासा।।

अशा प्रकारे मध्ययुगीन काळात, विपरित परिस्थितीत लोकांना वाईट मार्गाला जाणाऱ्या समाजाला, भक्तीच्या मार्गावर आणण्यासाठी माणसाला देव माणूस बनवण्यासाठी संत रविदासाचे कार्य अजरामर आहे. संत रविदास महान मानवतावादी संत होते. मानवी जीवनातील विषमता नष्ट करण्यासाठी शोषण, अन्याय व अस्पृश्यता संपविण्यासाठी साडेपाचशे वर्षांपूर्वी कठोर प्रहार केले. समाजात देवभावना, प्रेमभावना, सत्य व एकात्मता आणि मानवतेची शिकवण त्यांनी दिली.

संत रविदास बुद्धीवादी, समाजसुधारक, समतावादी, तत्वचिंतक व ईश्वरभक्त होते. त्यांचे जीवनकार्य असे आगळेवेगळे व मौलिक होते, यात शंका नाही.

**निष्कर्ष :**

१. उत्तर भारताच्या संत परंपरेत रामानंदाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आणि क्रांतिकार स्वरूपाचे होते.
२. त्यांच्या विचारात उदारता, निर्भयता, मानवता आणि जातिवर्णभेद न मानणारा संत रविदास.
३. त्यांच्या संप्रदायात जे १२ प्रमुख शिष्य होते, त्यात संत रविदासाचा समावेश केला आहे.

४. महाराष्ट्रात रविदास किंवा रोहीदास या नावाने ओळखले जाणारे संत रैदास हे उत्तर भारतीय व मध्ययुगीन एक मोठे संत होते.

५. त्यांनी स्थापन केलेल्या रैदासी संताचे महाराष्ट्र, पंजाब, गुजरात, राजस्थानभर कार्य होते.

६. त्यांनी भक्तीमार्गाचा यथोचित वापर केला. स्वत:ची एक अष्टांग साधना प्रचलित केली.

७. ईश्वर अंतीम सत्य आहे. प्रत्येक जीवाने देवाशी समरस व्हावे, असा त्यांचा आग्रह होता.

८. प्रत्येकाने जगण्यासाठी नेक कमाई केली पाहिजे. त्याशिवाय समाजात, सुख, शांत, समृद्धी नांदू शकत नाही.

९. संत रविदास भक्त, कवी, समाजसुधारक, तत्त्वचिंतक आणि धर्मोपदेशक होते.

१०. संत रविदासांनी विषमता, शोषण, अन्याय, अस्पृश्यता यावर कठोर प्रहार केले आणि हीच त्यांच्या जीवनकार्याची खरी मौलिकता आहे.

**संदर्भ :**

१. रैदास–धर्मपाल मैनी (हिंदी), साहित्य अकादमी, विभागीय कार्यालय, मुंबई, प्रथम संस्करण – १९७९. पुर्नमुद्रण २००२.

२. रैदास–आ.ह.साळुंखे (मराठी विश्कोशातील नोंद), खंड १५ वा मा.रा.मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई १९९५. प्रमुख संपादक–तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

३. मराठी साहत्याची प्रस्तुतता, रत्नाकर बापुराव मंचरकर, नवअनुष्टुभ, जानेवारी–फेब्रुवारी २००७. पृ. २०.

४. देशीवाद : समाज आणि साहित्य, डॉ.रावसाहेब कसबे या पुस्तकातील प्रकरण – संताची चळवळ : हिंदू व्यवस्थेविरूद्ध पहिला विद्रोह, पृ. १३२ ते १९४.

५. क्रांतिकारी संत गुरू रविदास – पुरूषोत्तम जाधव, शब्द पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती–फेब्रुवारी २०१३.

◆◆◆

# चरी शेतकरी संप: यशस्वी संघटनात्मक संघर्षाचे प्रतिक

**प्रा.महेश बिऱ्हाडे**
को.ए.सो.लक्ष्मी शालिनी महिला महाविद्यालय पेझारी - रायगड

साधारणपणे असे म्हटले जाते कि इतिहासापासून आपण शिकले पाहिजे परंतु आपल्या भागाचा इतिहासच माहित नसेल किंवा माहित करून घेण्याची तयारी नसेल तर आपण काय शिकणार ? म्हणून इतिहास समजून घेणे, इतिहासाचा अभिमान बाळगणे ,इतिहासातील पराक्रम आणि ऐतिहासिक चुका यांचा सखोल अभ्यास करून त्यापासून नवी स्फूर्ती मिळवावी असे विचारवंत लोक नेहमी सांगत असतात त्यामुळे आज अशाच एका ऐतिहासिक घटनेचा स्मरण करण्याचा दिवस आहे ती घटना म्हणजे तब्बल सात वर्ष चाललेला चरी येथील शेतकरी संप होय , ज्या संपामुळे शासनाला कसेल त्याची जमीन हा कायदा करण्यास भाग पडले आणि कष्टकरी शेतकरी बांधवांचा आवाज बुलंद केला ,अशा चरी शेतकरी संपाबद्दल लिहित असतांना मला या चरी भागात विविध कामास्तव भेट देता आली तेव्हा चरी, कोपरवासीय यांनी विशेषत: आगरी समाजाच्या पुढाकाराने सर्व जातीच्या शेतकरी कुळांनी जो ऐतिहासिक संघर्ष केला होता त्याचे चित्रण समोर येऊन अभिमानाने उर भरून आला होता आणि हीच ती भूमी जिने महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे सान्निध्य अनुभवले आणि क्रांतीयोद्धा आप्पासाहेब नारायण नागू पाटील यांचे नेतृत्व प्राप्त केले होते अशा भूमीला वंदन केले होते .

भारतात अगोदर राजेशाही होती त्याकाळात सर्व जमीन राजाची असायची ती जमीन राजा रयतेला वाटून द्यायचा आणि त्याबदल्यात राजा काही कर रूपाने धान्य किंवा अन्य स्वरुपात वसूल करत असे ,या कर वसुलीसाठी राजाने काही अधिकारी नेमलेले असायचे परंतु राजेशाही मध्ये कायमच परिस्थिती सारखी नसायची आक्रमणामुळे राजाच बदलून जायचा परंतु शेतकरीवर्गाकडून कर वसूल करणारे कायम असायचे, खोत म्हणजे मोठे जमीनदार किंवा वतनदार. पेशव्यांच्या काळापासून खोती हे सरकारी वतन असे. सरकारी सारा वसूल करणं आणि तो सरकार दरबारी जमा करणं हे प्रामुख्यानं खोताचं काम असे. ज्या गावात खोत असतं, त्या गावाला 'खोती गाव' म्हणून ओळखलं जाई. कालांतराने ब्रिटीश राजवट आली या राजवटीने फक्त कर मिळण्याची व्यवस्था म्हणून या परिस्थितीकडे पाहिले अशा अस्थिर वातावरणचा फायदा काही वसुली अधिकारी यांनी घेतला परिणामी खोती , जमीनदारी आणि सावकारीची पाळेमुळे रुजली अशी खोती जमीनदारी सुरु झाल्यानंतर काही खोतांनी जे वसुली अधिकारी म्हणून काम करायचे ते मालक बनले आणि वसुली अधिकाराच्या जोरावर ते शेतजमीन कसणाऱ्या लोकांना ,ज्यांना कुळ असे म्हटले जायचे कुळ म्हणजे दुसऱ्याची जमीन कसणारा किंवा त्या जमिनीवर प्रत्यक्ष कष्ट करणारा माणूस.अशांची मनमानेल तशी पिळवणूक करायचे ,अगतिक असलेल्या कुळांना खोतांचा अत्याचार निमूट सहन करावा लागत असे खोताविरुद्ध हिम्मत कुणाचींच नसायची कारण सर्व शेतकरी कुळे,

अशिक्षित, दारिद्रयाने गाजलेली असायची खोताने काय गडबड केली या गरिब शेतकऱ्यांना समजत देखील नसे अशा या परिस्थितीचा गैर फायदा या खोत लोकांनी अनेक प्रकारे घेतला अनेक प्रकारचे अत्याचार शेती कसणाऱ्या कुळांवर करायचे याबाबत सविस्तर खालील प्रमाण सांगता येईल.

**अ..कबुलायत :** खोत स्वत:ला सरकार समजून गरीब कुळांची लूट करायाचे वर्षभर राब राब राबून अखेर अन्नधान्य खोताच्या पदरी पडत असे. केवळ एवढेच नव्हे, तर खोत या कुळांना स्वत:कडेही राबवून घ्यायचे. शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणाचाही खोत फायदा घेत असत. कबुलायत नावाचा खोतांनी सुरू केलेला प्रकार असाच होता. कबुलायत म्हणजे जमिनीची ११ महिन्याची भाडेपट्टी लिहून घेतली जात असे. एक एकरामागे खंडीभर भात मक्ता म्हणून खोत घेत. सुरवातीला हा मक्ता ७ - १३ असा होता म्हणजे ७ मण सावकाराला आणि १३ मण शेतकऱ्याला अशी व्यवस्था होती नंतर खोत सावकार यांना हाव सुटली त्यांनी १३-७ अशी उलट पद्धती सुरु केली कुणी शेतकरी हे देऊ शकला नाही, किंवा दुष्काळ पिकांवर रोगराई झाली तर आणि शेतात काही पिकले नाही तर तर मग पुढच्या वर्षी दीडपटीने वसूल केलं जाई.अन्यथा दुसऱ्याला शेत कसायला देतो असे सांगितले जाई बिचारा हतबल शेतकरी ,त्यामुळे जमीन कसूनही शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडायचं नाही.परिणामी वर्षभर राबूनही कुळांच्या हाती काही राहत नसे परिणामी खोत सावकारी करून पुन्हा कुळांना लुटायला मोकळा राहत असे .

**ब. पोशा फरा आणि नाड्या फरा :** सामान्य कुलांकडे किंवा शेतकरी समुदायाकडे भात शिल्लक नसायचा कारण तो त्यांना पोटापुरताच मिळायचा परिणामी आगामी पावसाळ्यात शेत पेरणी करण्यासाठी शेतकरी वर्गाला सावकाराकडे किंवा खोताकडे दीड पट परत देण्याच्या बोलीवर भात बियाणे घ्यावे लागायचे परंतु हे बियाणे कुळांना देण्यसाठी सावकार जे माप किंवा फरा वापरायचा ते दोन प्रकारचे असायचे सावकार ज्या मापाने किंवा फऱ्याने कुळांना बियाणे द्यायचा तो बारा पायल्यांचा नवीन फरा असायचा तो बारा पायली भात मावणारा डोळ्यादेखत शेतकऱ्यांना नाडणारा नाड्या फरा असायचा आणि जेव्हा पिक येऊन केलेल्या बोली प्रमाणे बियाणे म्हणून घेतलेला भात परत घेतांना सावकार ते दीड पट तर घ्यायचाच पण त्यासाठीजे माप किंवा फरा वापरला जायचा तो जुना झालेला आणि १४ पायली भात मावणारा फरा असायचा यामुळे शेतकरी पूर्ण लुबाडला जायचा आणि सावकार पोसला जायचा म्हणून शेतकरी त्या फरास पोशा फरा म्हणायचे थोडक्यात प्रत्येक मापामागे २ पायली भात सावकार लुटायचा अगदी डोळ्यांदेखात त्यामुळे शेतकरी कुळ अधिकच भरडला जायचा

**क.फसकी :** केवळ अधिकच भात वसूल करून सावकाराचे भागायचे नाही तो कुलांकडून जेव्हा खळ्यात मळणी व्हायची तेव्हा त्याच्या साथीदारांसह हजर व्हायचा व पहिल्यांदा बियाणे म्हणून दिलेला भट वसूल करायचा तेव्हा पाहिला मण देवाचा म्हणून फुकटचा भात स्वताच्या ताब्यात घ्यायचा नंतर मोजणी मोजणी करतांना पत्येक मणामागे मोठे पसाभर धान्य (फसकी) म्ह्नुन उगाचच घ्यायचा असे धान्य वीस मणामागे

२ मण उगाचच फसवून खोत सावकार घेत असत त्यामुळे शेतकरी कुळांची अतोनात हाल होऊन डोळ्यांदेखत होणारी फसवणूक हताशपणे बघत राहण्याशिवाय कुळांना पर्याय नसायचा कारण गरीब हतबल दारिद्र्याने पिचलेले लोक जुलुमी खोत सावकारांविरुद्ध काही करू शकत नसत

ड.पंच मंडळात कुळांना स्थान नाही: त्याकाळी समाजात शांतता सुव्यवस्था राहावी यासाठी गाव पातळीवर पंच ,मंडळ कार्य करत असे आणि हे पंचमंडळ गावकर्यांनी निवडावे असे संकेत असत परतू खोत सावकार मंडली अशी योजना कपटाने तयार करत असत कि त्यामध्ये खोत सावकारांशिवाय दुसरा कोणीही त्यात येणार नाही त्यामुळे कुलांचा प्रतिनिधी कुणीही त्या पंचा मंडळीत नसायचा जर गावात खोत सावकर विरुद्ध शेतकरी असा संघर्ष झाला तर खोत सावकार यांच्या बाजूने निकाल जायचा ,शिवाय खोतांची अशी धारणा होती कि शेतकरी कुळ म्हणजे त्यांचे बटिक त्यांचा माणसासोबत पंच म्हणून राहणे म्हणजे खालच्या स्तरातील लोकांची बरोबरी स्वताचा अपमान, म्हणून प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी हे खोत लोक कोणत्याही कुळ व्यक्तिला पंच मंडळात येऊ देत नसत ,वास्तविक तो कुलांवर अन्याय करण्याचा एक मार्ग होता.

**इ.वेठबिगारी ;** सावकार लोक गरीब शेतकरी कुळांना कर्जाऊ पैसे देत असत दिलेल्या पैशावर अधिकचे शून्य वाढवून त्यावर अशिक्षित अशा गरीब लोकांचे अंगठ्यांचे ठसे उमटवून तसे करार पत्र बनवून घेत असत परंतु ते कुळांना त्यवेळेस वाचून दाखवत नसत व त्यानुसार कुलांकडून वसुली घेतली जात असे कुळाने वसुली नीट दिली नाही, तर प्रसंगी कुळातील संपूर्ण कुटुंबाला गुलाम किवा वेठबिगार म्हणून वागवलं जाई त्यांना सावकाराच्या घरी किंवा मळ्यात दिवसभर विना मोबदला सक्तीने काम करावे लागे. अशी अमानवी पद्धतत्यावेळी संपूर्ण कोकणात लागू होती. वेठ म्हणून कामाला जाणाऱ्या महिला व मुलींवर सावकार व त्याची माणसे यांची वाईट नजर असे प्रसंगी अत्याचारही होत असत त्याविरुद्ध दाद कोणी अन कुठे मागणार असा प्रश्न असायचा कारण कुळांना सावकारांनी आपल्या जबरी कचाट्यात ठेवले होते पोलीस सरकार यांतही सावकार पुढेच होते त्यामुळे अत्याचार व पिळवणूक यांचे प्रमाण जास्त होते

**ई सावकार खोतांचे जुलुमी कायदे :** खोती गावाचे खोत सावकार स्वताला त्यागावाचे राजे समजायचे त्यांचा गावात मोठा सन्मान मिळावा असे त्यांचे वर्तन असायचे कुळांना ते कुचकामी मानायचे एखादा कुळ जर चालत असेल तर आणि सामोरून सावकार चालत आला तर कुळाने स्वताच्या पायातली चप्पल काढून डोक्यावर ठेवायची आणि खोत समोरून जाईपर्यंत चप्पल डोक्यावरच ठेवायची असे नाही केले तर खोत सावकार त्याकुळला आपल्या बंगलीवर बोलवून चाबकाचे आसूड ओढत असे ,गावात फक्त सावकाराचे घर कौलाचे असे कुळाला कौल टाकायची असतील तर सावकाराला कौलकर द्यावा लागे , कुलांकडे मुल जन्मालाआले तर दोईकर सावकाराला द्यावा लागे ,कुणाकडे लग्न असेल तर लग्नात

सावकार खोताला मानपान मोठा करावा लागे अन्यथा तो लग्न थांबवायचा .कुळाच्या शेतीमधील भाजीची मालकी खोतांची असे. कुळाने जर शेतामध्ये आंब्याचे झाड, नारळ किंवा फणसाचे झाड लावले असेल, तर झाडांच्या फळांवर खोतांचा हक्क असे. तसा अलिखित करार होता. कुळाच्या गावातील जमीन गावाच्या सामूहिक मालकीची असली तरी अप्रत्यक्षपणे खोत त्यावर मालकी हक्क सांगत असे. खोत शेत मजुरांकडून, कुळांकडून सर्व खासगी कामे व जमिनीच्या मशागतीची कामे धाकदपटशाने करून घेत असत

अशाप्रकारचे अनेक अन्याय अत्याचार खोत सावकारांकडून होत असत .याविरुद्ध आवाज उठवणे गरजेचे होते या खोती पद्धतीला एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून ठिकठिकाणी विरोध झाला. कधी रत्नागिरीतल्या खेड तालुक्यात, तर कधी रायगडमधील पेण तालुक्यात. पण त्या त्या वेळी हा विरोध मोडून काढला जाई.असेच छोटे-मोठे संप १९२१ ते १९२३ या कालावधीत खोतांविरोधात रायगडमध्ये झाले, मात्र तेही मोडून काढण्यात आले. मात्र, या सर्व घडामोडी नारायण नागू पाटील पाहत होते आणि त्यानंतर यासाठी आवाज उठवण्याचा विचार करत नारायण नागू पाटलांनी शेतकरी वस्त्यांना भेटी द्यायला सुरुवात केली.खोतांना विरोध करण्यासाठी अखेर १९२७ साली 'कोकण प्रांत शेतकरी संघ' स्थापन करण्यात आला. भाई अनंत चित्रे या संघाचे सचिव होते. या कोकण प्रांत शेतकरी संघाने खोती पद्धतीविरोधात रायगड-रत्नागिरी जिल्ह्यात सभांचा धडाका लावला.त्यांच्या सभा उधळून लावण्याचेही प्रयत्न झाले. अनेकदा नारायण नागू पाटील आणि भाई अनंत चित्रे यांच्यावर भाषणबंदीही लादण्यात आली. मात्र, तरीही शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढत गेला.

या संपाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची परिषद २५ डिसेंबर १९३० रोजी पेण तालुक्यात पार पडली. कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद असं या परिषदेचं नाव होते . कुलाबा हे रायगड जिल्ह्याचे तत्कालीन नाव. या परिषदेचं नेतृत्त्व नारायण नागू पाटील आणि भाई अनंत चित्रे यांनी केलं होतं. या परिषदेत मंजूर झालेले ठराव, हे पुढील संपासाठी प्रेरक ठरले.खोती पद्धती नष्ट झाली पाहिजे, जमिनीची मालकी शेतकऱ्यांची व्हावी, मक्ते आणि व्याज कमी करावे, कबुलायतचा नमुना बदलला पाहिजे इत्यादी २८ मागण्यांचा हा ठराव झाला.या परिषदेनंतर नारायण नागू पाटील आणि भाई अनंत चित्रे यांनी सभांचा धडाका लावला आणि शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली. तत्कालीन कुलाबा (आताचा रायगड) जिल्ह्यातील खेड, तळा, माणगाव, रोहा, पेण अशा ठिकाणी हजारोंच्या गर्दीत सभा झाल्या.या जनजागृतीची आणि खोती पद्धतीविरोधी भावना १९३३ साली ऐतिहासिक संपात परावर्तित झाली..आणि ऐतिहासिक संपाची घोषणा झाली

१९३१ ते १९३३ या सालांदरम्यान नारायण नागू पाटील आणि भाई अनंत चित्रे यांच्या सभा आणि एकूणच चळवळीवर निर्बंध लादले गेले. परिणामी चळवळही मंदावली. मात्र, १९३३ साली बंदी उठवल्यानंतर अलिबाग तालुक्यातील चरी परिसरातील २५ गावांची एक सभा झाली. या चरी गावातच ऐतिहासिक संपाची घोषणा झाली. नारायण नागू पाटील हे चरीच्या सभेचे संघटक होते.शेतकऱ्यांना उत्पादनातील

योग्य वाटा मिळत नसल्यानं शेतकऱ्यांनी संपावर जावं, अशी घोषणा झाली आणि त्याच दिवसापासून संपाला सुरुवात झाली. कुळांनी जमीनदारांच्या जमिनी कसायच्या नाहीत, अन्न पिकवायचं नाही, असा निर्णय झाला.

हा संप मोडून काढण्यासाठी खोतांकडून आणलेला दबावही परतवून लावण्यात हे शेतकरी यशस्वी झाले खरे, मात्र, शेतीच न केल्यानं आलेली उपासमारी कशी परतवून लावणार ह हा प्रश्न होताच तरीही १९३२ ते १९३९ पर्यंत हा संप चालला. म्हणजे तब्बल सात वर्षे. या संपात चरीसह एकूण २५ गावं सहभागी झाली होती. जो काही फटका बसला तो याच गावांना बसला.

या संपादरम्यान शेतकऱ्यांची ससेहोलपट झाली. जंगलामधील लाकूड-फाटा तोडून दिवस काढावे लागले, करवंद, कांदा-बटाटा विकून,मासेमारी करून जगावं लागलं. प्रसंगी उपासमारीही झालीमात्र, तरीही शेतकरी संपावरून मागे हटले नाहीत.या संपादरम्यान रायगड जिल्ह्यातील 'कुलाबा समाचार'सारख्या वृत्तपत्रांनी संपावर प्रश्न उपस्थित केले. "कुलाबा समाचारमध्ये 'जमीनदार आणि कुळे यांच्यात बेबनाव करण्याचा प्रयत्न' अशा मथळ्यांखाली अग्रलेख लिहिले गेले. संपाच्या हेतूबद्दल शंका उपस्थित केल्या गेल्या." .भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही या संपाला जाहीर पाठिंबा दिला होता. त्यासठी स्वतः बाबासाहेब चरीला आले होते व त्यांनी संपकरी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केला होते हा शेतकरी संप सुरू असताना १९३४ साली आणखी एक शेतकरी परिषद भरवण्यात आली होती आणि या परिषदेचं अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे देण्यात आलं होतं. स्वत: भाई अनंत चित्र बाबासाहेबांना आणण्यासाठी मुंबईत गेले होते." 'खोतशाही नष्ट करा, सावकारशाही नष्ट करा' अशा घोषणाही या परिषदेतच देण्यात आल्या. बाबासाहेबांनी शेतकरी मजूर पक्षाची घोषणा याच परिषदेत केली. तर पुढे शंकरराव मोरेंसारख्या मंडळींनी स्थापन केलेला शेतकरी कामगार पक्षाची बिजं सुद्धा चरीच्या शेतकरी संपात असल्याचं बोललं जातं. सावकारांविरोधात या परिषदेत भाषणं झाली. आधीपासूनच संपाविरोधात असलेल्या कुलाबा समाचारने त्यावेळी लेख छापला आणि त्याला मथळा दिला 'सावकार तितका तुडवावा'.जगातील शेतक?यांच्या इतिहासात नोंद झालेल्या महाराष्ट्रातील शेतक?यांच्या या निर्धाराला 'चरीचा शेतकरी संप' म्हणून ओळखलं जातं. कोकणातील खोती पद्धतीविरोधात हे शेतकरी मोठ्या धैर्याने एकवटले होते. रायगड जिल्ह्यातील अलिबागजवळील चरी या कृषीप्रधान ग्रामीण पट्ट्यात आजपासून सुमारे ९२ वर्षांपूर्वी हा संप झाला होता. . पण बाबासाहेबांच्या भेटीनंतर चर्चेलाही वेग आला. २५ ऑगस्ट १९३५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी कुळ आणि खोतांमध्ये चर्चा घडवून आणली. पण त्यातून काहीच निष्पन्न झालं नाही आणि संप सुरूच राहिला.पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजदूर पक्षाच्या १४ आमदारांच्या पाठिंब्यावर १७ सप्टेंबर १९३९ रोजी खोती पद्धत बंद करण्याचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. त्यानंतर सरकारला जाग आली आणि मोरारजी देसाईंना संपकऱ्यांना भेटण्यासाठी पाठवण्यात

आलं बाळासाहेब खेर हे मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री होते. त्यांनी मंत्रिमंडळातील महसूलमंत्री असलेल्या मोरारजी देसाईंना चरीला जाऊन आढावा घ्यायला सांगितलं. त्यावेळी मोरारजींनी दिलेले आश्वासन नारायण नागू पाटलांना पटलं होतं. नारायण नागू पाटील 'कथा एका संघर्षाची' या स्व.प्रभाकर पाटील संपादित ग्रंथात असे म्हणतात, "मोरारजीभाईंनी लवादनाम्याद्वारे दिलेला निकाल माझ्या अपेक्षेपेक्षाही नि:पक्षपाती आणि समतोल होता. शेतकऱ्यांच्या काही मागण्या मान्य झाल्या. शेतकऱ्यांचा विजय झाला होता." यानंतर संपाचं वातावरण निवळू लागलं आणि दुसरीकडे शेतकरीही संपाने त्रासले होते. हाता-तोंडाची गाठभेट होत नव्हती, इतकं संकट आलं होतं. पण अशा स्थितीतही हा संप सहा वर्षे टिकला.१९३९ साली सरकारने कुळांना संरक्षण देण्याची घोषणा केली आणि २७ ऑक्टोबर १९३३ पासून सुरू असलेला संप अखेर मिटला.कूळ कायद्याचा जन्म या संपामुळेच झाला महाराष्ट्रात १९३९ साली कुळांना अधिकृत संरक्षण मिळालं. कसेल त्याची जमीन हे तत्त्व मान्य केलं आणि प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळांना जमिनीची मालकी मिळण्याची तरतूद करण्यात आली.तत्कालीन इंग्रज सरकारला झुकवणा?्या या संपाचं नेतृत्त्व केलं होतं शेतकरी-कामगार नेते नारायण नागू पाटील यांनी. आणि याच संपामुळे पुढे महाराष्ट्रात कुळ कायदा लागू झाला.या एहिहासिक संपाच्या वर्धापन दिनानिमित्त चरी संपाचे क्रांतीयोद्धे स्व.आप्पासाहेब नारायण नागू पाटील आणि समस्त चरी कोपर येथील बहाद्दर शेतकरी यांना एक संघटनात्मक परतू अहिंसक मार्गानेचालविलेला यशस्वी लढा भविष्यातील अनेक पिढ्यांना पेरणादायी ठरेल यात शंका नाही अशा संपाच्या मानकऱ्यांना त्रिवार मानाचा मुजरा .

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. कथा एका संघर्षाची संपादक :प्रभाकर पाटील नागेश पब्लिशर्स अलिबाग

२. आगरी बोली व लोक संस्कृती : डॉक्टर अविनाश पाटील

३. चरी संप :शंकर सखाराम

४. खोतांचा कर्दनकाळ नारायण नागू पाटील :संजय घरत

५. गाथा आगरी संस्कृतीची ;अनंत रघुनाथ पाटील ,जाणीव प्रकाशन वाशी

६. फसकी (कादंबरी): कैलास पिंगळे विघ्नेश पुस्तक भांडार, कणकवली


◆◆◆

# ''ज्ञानेश्वरीतील दैवासूर संपत्तीचा कलात्मक आविष्कार''

प्राचार्य डॉ. गजानन जाधव
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा

**प्रस्तावना :**

संत ज्ञानेश्वर महाराजांची 'ज्ञानेश्वरी' ही गीतेवरील टीका आहे. आता जवळ—जवळ 735 वर्षे (अंदाजे) ज्ञानेश्वरी रचनेला पूर्ण होत आहे. आजपर्यंत सर्व टीकांमध्ये 'ज्ञानेश्वरी' ही सर्वश्रेष्ठ गीताटीका आहे. या ग्रंथाला संत ज्ञानेश्वरांनी अत्यंत नम्रतेने 'भावार्थदीपीका' असे म्हटले आहे. याच ग्रंथाचा 'देशीकार लेणे' असा गौरव केला जातो. संत साहित्यातील व वारकरी परंपरेतील थोर संत, संत नामदेवांनी ज्ञानेश्वरीला श्रेष्ठ ग्रंथ असे नमूद केलेले आहे. 'एक तरी ओवी अनुभवावी' असे आवाहन सर्वांना केले आहे. संत नामदेवांनी ज्ञानेश्वरीचा 'ज्ञानदेवी' असा उल्लेख केला आहे.

थोडक्यात गुरूदेव रानडे म्हणतात, ज्ञानेश्वरी सर्वश्रेष्ठ गीताटिका आहे. ज्ञानेश्वरी अथवा भावार्थदीपीका, तसेच देशीकार लेणे या नावाने ज्ञानेश्वरी सुपरिचीत आहे. ज्ञानेश्वरी हा एक अलौकिक, अनन्यसाधारण असा मराठी भाषेतील सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. काव्य, तत्वज्ञान यांचा सुरेख समन्वय या ग्रंथात आढळून येतो. वास्तविक अध्यात्मविद्या आणि अलंकारशास्त्र हे विषय परस्पर विरोधी आहेत. परंतू ज्ञानदेवाचे मोठेपण हे की, त्यांनी त्यांच्यातील शत्रुत्वभाव नष्ट केला. ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेत अतिशय रसाळ स्वरूपात ब्रह्म विद्येचा सुकळा केला.

**ज्ञानेश्वरीचे स्वरूप थोडक्यात :**

मराठी संत साहित्यातील रूढ समजुतीप्रमाणे ज्ञानेश्वरी हा गीतेवरील टीका ग्रंथ आहे. ज्ञानेश्वरी ही गीतेवरील टिका नसून मराठी गीताच आहे. कारण ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेत गीतार्थाची दिव्य अनुभूती प्रकट केली आहे. ही गीतार्थ अनुभूती प्रकट करतांना त्यांनी श्रोत्यांनाही विश्वासात घेतले आहे. ज्ञानेश्वर माऊलींचे गुरूप्रेम सर्वश्रुत व सर्व परिचित आहे. ज्ञानेश्वरांचे जेष्ठ बंधू संत निवृत्तीनाथ हेच त्यांचे गुरू होते. त्यांनी ज्ञानेश्वरीतील सर्व अध्यायात अनेक ठिकाणी गुरूंची थोरवी व्यक्त केली आहे. ज्ञानेश्वरी या ग्रंथातील 16 व्या अध्यायातील त्यांची गुरूभक्ती विविध अंगांनी उचंबळून आली आहे. त्यासाठी त्यांनी सुरूवातीला त्याचाही 80 ओव्या लिहिल्या आहेत. त्यांनी गुरूवर चित्सुर्याचे रूपक केले आहे. गुरू हे साक्षात 'ज्ञानसूर्य' आहेत. तो साधकाची अज्ञानरूपी रात्र नाहीशी करून आत्मबोधाचा अखंड दिवस वरदान म्हणून देतो. ज्ञानेश्वर आपल्या गुरूकडे एक व्यक्तीविशेष म्हणून पहात नाही. त्यांना गुरू साक्षात परब्रह्म वाटतो. केवळ गुरूंच्याा कृपेनेच आपण हे ज्ञानयज्ञाचे कार्य पूर्ण करीत आहोत. याचे ज्ञानेश्वरांना भान आहे. याचा अर्थ ज्ञानेश्वरांची गुरूभक्ती, बंधुप्रेमाने आंधळी बनी नाही. तरी ती पुर्णपणे डोळस व दीपस्तंभासारखी पथदर्शी आहे, यात मुळीच शंका नाही.

**ज्ञानेश्वरांची समाजाच्या उद्धाराची तळमळ :**

ज्ञानेश्वरी या ग्रंथात संत श्री ज्ञानंश्वरांची समाज उद्धार करण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. संपूर्ण समाजात अज्ञान, अंधःकार, अन्याय आणि असमानता दूर करण्यासाठी ज्ञानेश्वरांच्या

मनातील तळमळ दिसून येते. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत संत सज्जनांसाठी आवाहन केले आहे. संत हे अलांछित चंद्र आणि तापहीन मार्तंड असतात, असे ज्ञानेश्वर म्हणतात. संतांचा मुळ स्वभाव शीतल, आल्हाददायक व परोपकी असतो. संत हे स्वहिताबरोबर दुसऱ्याचे आत्महीत साधतात. सोळाव्या अध्यायात त्यांनी ओवी क्रमांक 199 ते 202 मध्ये संतांची थोरवी कथन केलेली आहे. लोकांच्या उद्धाराची तळमळ हाच ज्ञानेश्वरांचा वसा आणि वारसा होता. ज्ञानेश्वराची व त्यांच्या भावंडांच्या तत्कालीन धर्ममार्तंडांनी खुपच छळ केला. तयांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला. परंतु त्यांनी हा छळ सहन केला. कुणाचे वाईट चिंतीले नाही. आपल्या एकूणच वाङ्मयात त्याबद्दल अवाक्षरही काढले नाही. याउलट प्रपंच करीत असतांना, जीवनावादी झगडणाऱ्या सामान्य माणसाला आयुष्यात कसा समतोल साधावा लागतो, याचे मार्गदर्शन त्यांनी केले. याचाच अर्थ ज्ञानेश्वरांच्या जीवनदृष्टीत व ज्ञानेश्वरीत समाज उद्धाराची तळमळ दिसून येते.

**दैवासूर संपत्तीचे विभागयोग :**

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथात दैवासूर संपत्ती यास दोन भागात विभाजीत केले आहे.

1) दैवी संपत्ती : दैवी संपत्तीमध्ये खालील गुणांमध्ये सामील केलेले आहे.

दिव्यज्ञान

निर्मलता / स्वच्छता / पवित्रता

करूणा आणि दया

साहस शक्ती

2) सुर संपत्ती : सूर संपत्तीचे गुणांचे खालीलप्रमाणे वर्णन केलेले आहे.

अज्ञान, अन्यायाचा विरोध

सत्य आणि न्यायाची रक्षा

सामाजिक न्याय व समानतेची स्थापना

मानवाची सेवा आणि त्यांचे कल्याण

**दैवासूर संपत्तीचा अर्थ :**

संत ज्ञानेश्वरांनी दैवासूर संपत्तीचे दोन शब्दात विभाजन केले आहे. 'दैव' आणि 'सूर' दैवाचा अर्थ म्हणजे 'दिव्य' आणि 'सूर'चा अर्थ म्हणजे शक्तीशाली व साहसी, दैवासूर संपत्तीचे विश्लेषण ज्ञानेश्वरांनी पुढीलप्रमाणे केलेले आहे.

1. दिव्य ज्ञान : दैवासूर संपत्तीवाले व्यक्तीकडे दिव्य ज्ञानाची प्राप्ती असते.
2. साहस आणि शक्ती : दैवासूर व्यक्तीकडे साहस व शक्तीचे भांडार असते.
3. शुद्धता आणि पवित्रता : दैवासूर व्यक्तीकडे शुद्धता आणि पवित्रता प्राप्त असते.
4. करूणा आणि दया : दैवापूर व्यक्तीकडे करूणा व दया ओतप्रोत भरलेली असते.

गीतेतील आणि ज्ञानेश्वरीतील 16 व्या अध्यायायचे नाव 'दैवासूर संपत्ती विभागयोग' असे म्हटले आहे. प्रस्तुत 16 व्या अध्यायात गीतेच्या 29 श्लोकांवर भाष्य करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी 473 ओव्या लिहिल्या आहेत. ह्या अध्यायात प्रामुख्याने दैवी व आसुरी संपत्तीच्या गुणांचे वर्णन केले आहे. दैवी

संपत्ती हितकारक व कल्याणकारक असते. तिच्यामुळे माणसाच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो. त्याचे मानसिक आरोग्य चांगले राहते. दैवासूर संपत्ती माणसातील सत्वगुणांचा विकास करेल. ज्ञानेश्वरांनी दैवी संपत्तीचे 26 गुण सांगितले आहेत. भीती बाळगु नये, दान करावे, मनावर संयम ठेवावा, त्याग करावा, ज्ञान मिळवावे, मन–बुद्धीचे–आत्म्याचे संतुलन राखावे, योग करावा. त्यांच्या मते सत्य, अहिंसा, शांती, सावधानता, स्वाध्याय, तप, दया, मार्दव, तेज, क्षमा, धैर्य गुणांचाही दैवी गुणात समावेश होतो. सर्वाबद्धण समान भाव बाळगावा, चंचलता कमी करावी, अंतर्बाह्य शुद्धी करावी. मान, दांभिकता व स्वार्थाचा त्याग करावा. अशाप्रकारे ज्ञानेश्वरांनी दैवी संपत्तीची लक्षणे सांगितली. मुळ गीतेत दैवी संपत्तीचे वर्णन केवळ तीन श्लोकात केले आहे. ज्ञानेश्वरांनी त्यासाठी 144 ओव्या रचल्या आहेत. ही दैवी संपत्ती कल्याणकारक कशी आहे, यासाठी अनेक दृष्टांत सांगितले आहे. ज्ञानेश्वरांच्या वाणीत प्रसाद, माधुर्य आणि ओज ह्या तीनही गुणांचे निरंतर प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही.

**5. आसुरी संपत्तीची लक्षणे :**

ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायात आसुरी संपत्तीचे 6 अवगुण सांगितले आहेत. गर्व, अहंकार, अज्ञान, क्रोध, कठोर वाणी आणि धर्माचे अवडंबर हे ते दुर्गुण. हे सहा अवगुण असणारी माणसे दुष्ट व क्रुर असतात. त्यांच्याकडे आपण दुर्लक्ष केले पाहिजे. त्यांचे गैरवर्तन मनावर घेऊ नये, हे सांगतांना त्यांनी समर्पक असा व दृष्टांताचा वापर केला आहे. दैवी संपत्तीत 26 गुण आहेत आणि आसुरी संपत्तीत 6 अवगुण आहेत. सापाचे शरीर लहान पण विष भयंकर असते तसे आसुरी संपत्ती संख्येने कमी पण दृष्ट वर्तनाची हमी देणारी असते.

**आसुरी संपत्तीचे गुण :**

आसुरी संपत्तीचा अर्थ अज्ञान, अन्याय आणि असमानता याला बळ देणे, हे या संपत्तीचे लक्षण आहे. अज्ञानता ही आसुरी संपत्तीवाल्या व्यक्तीमुळे ही प्रवृत्ती मोठ्याा प्रमाणात असते. ज्ञान आणि समजदारीच्या कमतरतेमुळे चुकीचे निर्णय घेतले जाते. अन्याय हा गुण आसुरी संपत्तीकडे अन्याय प्रवृत्ती असते. ते कायमचे दुसऱ्यावर अन्याय करतात. दुसऱ्याचे अधिकार हिसकवतात. त्याचे नुकसान करतात. असे लोक स्वार्थी असतात. असमानता आणि अहंकार ही व्यक्ती कायम गलत व्यवहार करणे, भेदभाव करणे, स्वार्थासाठीच काम करणे, अहंकार बाळगणे, दुसऱ्यास कनिष्ठ व स्वतःला श्रेष्ठ समजणे व कायमच राग करणे, क्रोध बाळगणे, दुसऱ्यांना तुच्छ वागणूक देणे. समाजात हिंसा करणे, घातपात करणे, अशा व्यक्तीकडे नैतिकता नसते.

**निष्कर्ष :**

1. अशाप्रकारे ज्ञानेवरीतील सोळाव्या अध्यायाचे स्वरूप तत्वज्ञानात्मक असून ते तत्वज्ञान वैयक्तिक आणि सामाजिक स्वरूपाचे असते.
2. या अध्यायात ज्ञानेश्वरांनी दैवी आणि आसुरी संपत्तीची लक्षण सांगितली आहेत.
3. या ठिकाणी प्रारंभी त्यांनी गुरूप्रेमाचा उत्कट आविष्कार केला आहे.
4. ज्ञानी भक्ताचे सोदाहरण दर्शन घडविले आहेत.

5. स्तांचा यथोचित गौरव करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी येथे अनेक उपमा, अलंकार, दृष्टांतांची योजना केली आहे.
6. दुर्गुणांचे निर्दालन करावे आणि लोकोद्धाराचा वसा घ्यावा, असा त्यांचा दृढ मानस आणि संकल्प असल्याचे याठिकाणी जाणवते.
7. दैवी संपत्ती आणि आसुरी अवगुणांचे सोदाहरणे प्रतिवादन करणे हे या लेखाचे प्रतिपाद्य आहे. याच आशयसूत्राचा येथे परामर्श घेण्यात आला आहे.
8. ज्ञानेश्वरीतील इतर अध्यायाप्रमाणेच या अध्यायातही काम आणि तत्वज्ञान यांचा संगम असल्याचे आढळून`यते.
9. दैवी संपत्तीत 26 गुण आणि आसुरी संपत्तीत 6 अवगुण असूनही त्यांचीच जास्त चर्चा प्रस्तुत लेखात आलेली आहे.
10. साधी–सोपी बोलीभाषा, समर्पक उपमा व दृष्टांताचा समाजउपयोगी व तात्विक विचार प्रस्तुत लेखात आलेला आहे. दैवासूर संपत्ती योग म्हणजे सामाजिक नीतीशास्त्राचा आविष्कार आहे, असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**


1. राजवाडे, अध्यात्म सोळावा, राजवाडे प्रत, महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई.
2. सार्थ श्री ज्ञानेश्वरी, श्री मामासाहेब दांडेकर, प्रास्ताविक प्रत श्रीक्षेत्र आळंदी देवाची जि. पुणे. आवृत्ती नववी, 2018.
3. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, गं. बा. सरदार, लोकवाङ्मय गृहप्रकाशन, मुंबई, आठवी आवृत्ती 2010.
4. श्री ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी विशेषांक, लोकराज्य मासिक, वर्ष 46, अंक 13 वा, 16–30 नोव्हेंबर 1990, संपा. दिवाकर गंधे.
5. स्तकविता : एक दृष्टीकोन, डॉ. प्रकाश देशपांडे केजकर, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती 2006.
6. भक्तिशोभा, डॉ. विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती 2007.


◆◆◆

# सामाजिक समता : क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तौलनिक विचार

**संशोधक :**

**शि.भ.प.श्री. शिवशरण जी. रटकलकर**

भारतभूमी ही संतांची व महापुरूषांची जननी आहे. कोणतेही महापुरूष, कोणत्याही काळात जन्माला आले, तरी त्यांनी अखिल मानवजातीच्या उध्दारासाठी जे महत्कार्य केले ते त्रिकालाबाधीत वंदनिय ठरले.

थोर संत अथवा महापुरूष कोणत्या धर्मात, जातीत किंवा पंथात जन्माला आले यावरून त्यांचे महत्व वाढले नाही तर त्यांनी केलेल्या अतुलनीय कार्यामुळे ते महान ठरले. सामाजिक विषमता, आर्थिक विषमता, जीवन जगण्याच्या मार्गातील अडथळे पाहून महापुरूषांची मने विषन्न झाली, खिन्न झाली, अतीव दु:खाने होरपळली. ही विषमता दूर करण्यासाठीच त्यांनी आजीवन संघर्ष केला, क्रांतीकारी पाऊले उचलली व अवघ्या विश्वाला जीवनविषयक नवीन दृष्टीकोन प्रदान केला. यामुळेच ते मार्गदर्शक तेजोनिधी म्हणून किंवा महात्मा म्हणून नाव लौकिकास पावले. अशा तेजश्वी नररत्नांपैकी मला भावलेल्या क्रांतीसूर्य समतानायक जगज्जोती महात्मा बसवेश्वर व भारतरत्न, बोधिसत्व, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक व सामाजिक विचारांचा परामर्श घेण्याचा सुसंकल्प करून या लेखाव्दारे आपल्याशी सुसंवाद साधण्याचा मानस आहे.

**जगज्जोती महात्मा बसवेश्वर व डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा :-**

बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात महात्मा बसवेश्वरांनी कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावात जन्म घेतला. त्यांच्या जन्माच्या वेळी भारताचे संपूर्ण प्रभुत्व अनेक राजवंशांमध्ये वाटले गेले होते. आपसातील कलह व संघर्षामुळे भारत एक रणक्षेत्र, युध्दभूमीच बनला होता. धर्माच्या नावावर माणसामाणसांत भेद केला जात होता.जाती जातीत भेद मत्सर केला जात होता. स्पृश्यास्पृश्य भाव अतिव धारदार झाला होता. कर्मठ, अंध:श्रध्दा पसरविणारे पुरोहितशहा विषमतेची बीजे रोपीत होते. त्यामुळे समाजमन पोखरल्या जात होते. वर्णव्यवस्था, उच्चनीचता, आर्थिक दुर्बलता, दैववाद यामुळे निष्क्रीय होऊन नशिबालाच दोष देणाऱ्या मानव जातीला १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी आपल्या क्रांतीकारी विचारांनी जगण्याचा नवा मार्ग दाखविला. 'कायक वे कैलास' म्हणजे' कर्महिच ईश्वराची पूजा', आणि 'दासोहम् ' म्हणजे प्रामाणिकपणे आपले नित्यकर्म करावे व अनाठायी संग्रह करण्यापेक्षा आपल्या स्वकष्टार्जीत कमाईचा काही भाग समाजासाठी, राष्ट्राच्या उन्नतीसाठी प्रदान केला पाहिजे.वापरला पाहिजे हा मोलाचा संदेश महात्मा बसवेश्वरांनी दिला. आणि स्वतःला कुचकामी समजणारा, कमनशिबी समजणारा कामगार वर्ग बारा बलुतेदार वर्ग उद्योगशील बनवला. कातडी कमावणे, चर्मोद्योग - जोडे बनवणे, कलाकूसर करणे

इत्यादी कामात स्वतःला गुंतवून ठेवू लागला. स्वच्छतेची कामे करणारा अस्पृश्य वर्ग महात्मा बसवेश्वरांच्या' कायक वे कैलास' या संकल्पनेमुळे नव्या जोमाने कामाला लागला. स्वतःचा चरितार्थ स्वाभिमानाने चालवू लागला. आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे समाजात सन्मानाचे स्थान मिळवू लागला हे विशेष.

अशाच प्रकारची अस्पृश्यता निवारणाची, दलीतोध्दाराची नवप्रेरणा देणारे, नवचैतन्य प्रदान करणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म एकोनिसाव्या (१९ व्या) शतकाच्या शेवटच्या दशकात मध्यप्रदेशातील इंदौर जिल्ह्यातील महू या गावी १४ एप्रिल १८९१ मध्ये झाला. त्यांच्या जन्माच्या वेळीही दीन - दलीतांच्या जीवनात पसरलेला अंधःकारही एवढा भयानक होता की ; त्याचे केवळ स्मरण केले तरी अंगावर रोमांच उभे राहतात. श्रमिकांना व महिलांना मिळणारी हीनत्वाची वागणूक, अस्पृश्य समजून केली जाणारी उपेक्षा जीवाचा थरकाप उडवणारी होती. सामाजिक आणि आर्थिक विषमतेची वागणुक या सर्व बाबींनी बाबासाहेबांना विलक्षण बेचैन केले होते.

स्वतः उच्च शिक्षण घेवून आपल्या ज्ञात अज्ञात समाजबांधवांना अज्ञानाच्या व विषमतेच्या अंधःकारातून प्रकाशाकडे घेवून जाणारे डॉ. बाबासाहेब दीन - दलीतांसाठी तेजोनिधी दीपस्तंभच बणले.

ऐन उमेदीच्या काळात उच्च शिक्षण घेऊन विलायतेहून भारतात परतल्यानंतर छत्रपती शाहू महाराजा, महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्यासारख्या न्यायप्रिय, प्रज्ञाशील राजे महाराज्यांच्या आश्रयाने - अभयदानाने डॉ. बाबासाहेबांनी अनेक समाजहितकारी संकल्पना राबविल्या. त्यांनी स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभा, समता सैनिक दल, स्वतंत्र मजूर पक्ष, डिप्रेस्ड क्लास एज्युकेशन सोसायटी, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, पीपल्स एज्युकेशन सोसायटी इत्यादी सामाजिक संघटनांव्दारे दलीतोध्दार करणारे डॉ.बाबासाहेब महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक समतावादी विचारांनी प्रेरित झाल्या सारखेच वाटतात.

**सामाजिक समतेचा विचार :-**

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी मानणसामाणसांतील भेद कमी करण्यासाठी तत्कालीन कन्नड बोली भाषेतील वचन साहित्याने विषमतावादी समाजरचनेचा प्रखर विरोध केला. आपल्या अशाच एका वचनात ते म्हणतात,

"हा कुणाचा, हा कुणाचा,हा कुणाचा असे म्हणवू नका देवा!
हा आमचा, हा आमचा, हा आमचा ऐसेची म्हणवावे माझ्या कूडलसंगमदेवा, तुमच्या घरचा पुत्र म्हणव तू मला ! "

असेच काहिसे विचार डॉ. बाबासाहेब आम्हाला देतात, "माणसाने माणसाला स्पर्श केला, तर गोमूत्र अंगावर घेता, कुत्र्या -मांजरांचा स्पर्श तुम्हाला चालतो मग माणसाचा विटाळ कसला ?"
हे वैचारिक साम्य म.बसवेश्वर आणि डॉ.बाबासाहेबांना खरे महान ठरविते.

ज्या कुळात जन्म घेतला, ते कुळ स्पृश्य अस्पृश्यता मानणारे आहे. याचा म.बसवेश्वरांना अत्यंत

खेद वाटतो. त्याचा धिक्कार करण्यासाठी ते एका वचनात सांगतात.

"पिता ढोर कक्कय्या होऊन आजोबा मातंग चन्नय्या झाल्यास
मी वाचणार नाही का ?
आणि श्वपचय्यांच्या सानिद्ध्यात
भक्तीचे सद्गुण मी जाणेन... कूडलसंगमदेवा || "

सर्वांचा पिता - विश्वाचा निर्माता एकच असताना परस्परांना कमी अधिक समजणारे आम्ही कोण? असे त्यांना वाटायचे.

आणखी दुसरे एक समतावादी विचारांची रुजवण करणारे अत्यंत बोलके वचन पाहुयात -

महारवाडा आणि शिवलयाची जमीन एकच आहे.
शौच आणि आचमनाचे पाणी एकच आहे.
स्वतःला जाणून घेणाऱ्यांचे कुळ एकच आहे.
षड्दर्शनाने मिळणाऱ्याचे मुक्तीफळ एक आहे.
कूडलसंगमदेवाला जाणून घेणाऱ्यांचे व्यक्तित्व एकच आहे.

असा विशाल समतावाद महात्मा बसवेश्वरांनी त्याकाळी रुजवला.

महात्मा बसवेश्वरांच्या याच जाती उच्चाटनाला पुढे विसाव्या शतकात बळ देण्याचे व समुळ उच्चाटनाचे कार्य डॉ. बाबासाहेबांनी पूर्ण केल्याचे दिसून येते. आपल्या सावलीमुळे हिंदू भ्रष्ट होऊ नयेत म्हणून पेशवाईत अस्पृशांना रस्त्यावर फिरायलाही बंदी होती. रस्त्यावर थुंकू नयेत म्हणून त्यांच्या गळयात मडके बांधले जायचे.तर चालतांना पाठीमागे फडा (झाडू) बांधल्या जायचा. हातात ओळख म्हणून काळा दोरा बांधल्या जायचा.

डॉ. बाबासाहेबांनी 'जात' या विनाशक संकल्पनेची चिकित्सा करून तिचा शोध घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला. "जात ही श्रमविभागणीवरही अवलंबून नाही आणि ती नैसर्गीक कल व जनमानस यावरही आधारीत नाही, व्यक्तीची कामे जात आधीच तयार करते. मूळ कुवतीच्या आधारे नव्हे तर जन्मानुसार किंवा आई- वडलांच्या सामाजिक स्थानानुसार. यामुळे जातीपातीची बंधने झुगारून स्वकर्मनिष्ठा वाढवावी व कर्माने श्रेष्ठ व्हावे." - असे डॉ. बाबासाहेबांना नेहमी वाटायचे. एकीकडे महात्मा बसवेश्वरांचा ' कायक वे कैलास' हा सिद्धान्तही याचेच प्रतिपादन करतो. ' दासोहम', 'दया धर्मदमूलवैय्या' हा सिद्धान्त व्यक्तीला कार्यप्रवण करतो तर दुसरीकडे डॉ.बाबासाहेबांचा 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा !' हा नारा जीवनाचा दीव्यमार्ग प्रदान करतो.

धर्मानुसार व जाती-वर्णानुसार समाजाची अनेक तुकड्यांत विभागणी करून श्रेष्ठ कनिष्ठत्व मानणाऱ्या वेद शास्त्र पुराणांचा धिक्कार करतांना महात्मा बसवेश्वर एका वचनात सांगतात ,

"वेदांना बासनात गुंडाळून, अडगळीत टाकतो.
शास्त्रांच्या पायात बेड्या ठोकतो.
तर्काच्या पाठीवर वार करतो
आणि आगमांचे नाक कापतो !"

विषमतेचे पोषण करून, जातीयता वाढविणारे, साहित्याच्या नावावर समाजाला दैववादी, नशिबवादी, कर्मठ बणविणारे वेद, शास्त्र, पुराण, पोथ्या आमचा उध्दार करणार नाहीत. तर आम्ही कार्यप्रवण होवून, आमचा आत्मोद्धार साधला पाहिजे असे त्यांना वाटायचे. जगद्गुरू तुकोबारायांसारख्या संतांनी सुद्धा विषमतावादी वेदांची निर्भरस्त्नाच केलेली दिसते. त्यांचे प्रसिद्ध अभंगापैकी एक - वेद अनंत बरळला, अर्थ इतुकाची काढीला |
विठोबाशी शरण जावे, नीज निष्ठे नाम घ्यावे ||

डॉ. बाबासाहेबांनी सुध्दा अनेक शास्त्रांचा साकल्याने अभ्यास केला. धर्म, शास्त्र, पुराण माणसामाणसात भेद करते. ते संपविणे गरजेचे आहे म्हणून त्यांनी अनेक आंदोलने केली.

'कौमार्ये रक्षीती पिता....... न स्त्री स्वातंत्र्य अर्हति..." अशी वल्गना करणाऱ्या मनुस्मृतीचा त्यांनी जाहीरपणे धिक्कार केला व दहन केले. यापेक्षा समाजशास्त्र, अर्यशास्त्र, कायदा, राजकारण, मानववंशशास्त्र, घटनाशास्त्र,पत्रकारिता, इतिहास, शिक्षण, तत्त्वज्ञान यांचा अस्त्रान्सारखा प्रभावी वापर केला. मुकनायक, बहिस्कृत भारत, समता, जनता, प्रबुध्द भारत यासारख्या वैचारिक अंदोलनातून सामाजिक समता प्रस्थापित करण्यामध्ये डॉ. बाबासाहेबांनी दीव्यक्रांती केली.

जातीभेदानुसार नगररचना व वास्तव्यास दिली जाणारी भूमी वा कुळवाडी श्रेष्ठकनिष्ठ ठरत नाही असे सांगताना महात्मा बसवेश्वर एक प्रभावी व विद्रोही वचन मांडतात-

"आवळा, लिंबू, आंबा, करवंदे यांना आंबट पाणी कोणी घातले ?
ऊस, केळी, फणस, नारळ यांना गोड पाणी कोणी घातले ?
साळी, कस्तुरी, गुग्गुळ यांना तुरट पाणी कोणी घातले ?
मखा, मोगरा या फुलझाडांना सुगंधी पाणी कोणी घातले ?

या सर्वांना जल एकच, जमीन एकच, आकाशही एकच, जल, जमीन, द्रव्यक्षार सर्व शोषुनी वनस्पती आपली भिन्नता दाखविते त्याप्रमाणे माझा देव चन्नमल्लिकार्जून अनेकात मिसळला तरी त्याची एकताच वेगळी."

अशी अनेकानेक प्रभावी वचने मानवतेचे दर्शन घडवितात. महात्मा बसवेश्वरांच्या संवेदनशील हृदयाची जाणीव करवून देतात. तोच मृदुपणा आणि मनाचा हळवेपणा डॉ. बाबासाहेबांकडे दिसून येतो. या वचनांचे तात्पर्य डॉ. बाबासाहेबांच्या पाहण्यात आले असते तर त्यांनी म. बसवेश्वरांच्या वचनांचा

स्वीकार केला असता. डॉ. बाबासाहेबांची सामाजिक परिवर्तनाची भूमिका सर्वसमावेशक होती. समाजातील परिवर्तनाचा पाया दडपणाऱ्या समुहांना बरोबर घेण्यावर त्यांचा भर होता. डॉ. बाबासाहेबांनी तयार केलेल्या भारतीय संविधानाचे अनेक पैलू महात्मा बसवेश्वरांच्या स्वातंत्र्य, समता, स्त्री पुरूष समानता, आर्थिक समृध्दता, श्रमप्रतिष्ठा, वैश्विक बंधूता इत्यादी महत्त्वपूर्ण विचारांवर आधारलेले आहेत असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

महात्मा गौतम बुध्द, महात्मा बसवेश्वर, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भौतिक देह जरी कालवश होऊन पंचमहाभूतात विलीन झाले असले तरी त्यांचे प्रभावी विचार आचंद्रसूर्य अंधारात चाचपडणाऱ्या जीवांना सदैव प्रेरणादायी व जागृत ठेवणारे ठरतील.

अशा या महामानवांना कोटी कोटी प्रणाम !

त्रिवार वंदन !

◆◆◆